
# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



श्रीसाईलीला
ऑगस्ट १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

श्री. रा. द. बन्ने

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

प्रा. सौ. इंदिरा खेर
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

श्री. सदानंद चेंदवणकर
(मराठी आवृत्ती)

वर्ष ६५ वे] किमत एक रुपया [अंक ५ वा

दूरध्वनीः ४१२ २५ ६१

: कार्यालय :

'साईनिकेतन'', प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



## श्री साई वाक्सुधा

साधूंचे व्हावें संरक्षण।
असाधूंचे समूळ निर्दळण।
एतदर्थीचि ईश्वरावतरण।
संत हे विलक्षण यापरते।। ४ ।।

साधु असाधु संतांसमान।
एक मोठा एक ऊन।
हे जाणेना जयांचे मन।
समसमान उभयां जे।। ५ ।।

ईश्वराहूनि संत मोठे।
असाधूंसी आधी लाविती वाटे।
मन जयांचे तिळतिळ तुटे।
प्रेम दाटे दीनार्थ।। ६ ।।

भव सागराचे हे अगस्ति।
अज्ञानतमाचे हे गमस्ति।
परमात्म्याची एथेंच वस्ती।
वस्तुतः हे तदभिन्न।। ७ ।।

ऐशातील हा साई माझा।
अवतरला भक्तकाजा।
मूर्तिमंत ज्ञानराजा।
कैवल्य तेजाधिष्ठित।। ८ ।।

— श्री साई सच्चरित् अध्याय १० वा

## सुविचार

औषधे निन्तयेद विष्णुभोजनेच जनार्दनम्।
शयने पद्मनाभं च विवाहे च प्रजापतिम्।।
युद्धे चक्रधरं देवं प्रवासे च त्रिविक्रमम्।
नारायणं तनुत्यागे श्रीधरं प्रियसङ्गमे।।

★

औषध सेवन करताना विष्णूचे, जेवणाचे वेळी जनार्दनाचे, निद्रेच्या समयी पद्मनाभाचे आणि विवाह प्रसंगी प्रजापती विष्णूचे स्मरण करावे. तसेच युद्धात चक्रधर विष्णूचे, प्रवासात त्रिविक्रमाचे, शरीर त्याग करताना नारायणाचे व प्रिय व्यक्तीच्या भेटसमयी श्रीधराचे चिंतन करावे.

या मासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक सहमत आहेतच असे नाही.


# श्री साईलीला — ऑगस्ट १९८६

## अनुक्रमणिका


| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | संतांची सुवचने | — सौ. नीता जाधव | ६ |
| ३ | आत्मदर्शन म्हणजे अध्यात्मिक सिंधुतील बिंदू | — डॉ. रा.सी. कापडी | ७ |
| ४ | श्री साई गायत्री मंत्र | — डॉ. अ.का. पाठक | ११ |
| ५ | श्रद्धा आणि सबूरी | — प्रा. गिरीश जोशी | १४ |
| ६ | श्रीबाबांचा लाडका सूरदास | — सौ. उषा अधिकारी | १८ |
| ७ | बाबांची वीट | — डॉ. सुमन खानवीलकर | २० |
| ८ | श्री गुरुपुजा | — शालिनी देसाई | २३ |
| ९ | श्री साईनाथांची शिरडी | — श्री.सुधाकर एम्. चव्हाण | ३४ |
| १० | देवास जागृत करा | — प्रा. र.श्री. पुजारी | ३६ |
| ११ | साई महिमा | — सौ. वसुधा गानू | ३८ |
| १२ | श्री साईनाथांचा शरणार्थी (१५) | — श्री. विश्वास खेर | ३९ |
| १३ | साक्षात्कारी स्वप्ने | — श्रीमती ताराबाई मांजरेकर | ४२ |
| १४ | आरती श्री साईची | — डॉ. सुनंदा कुलकर्णी | ४३ |
| १५ | खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी | — साईनंद | ४४ |
| १६ | साईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर | — | ४७ |
| १७ | संत सावतामाळी बाल साई भक्तांसाठी | — | ५६ |
| १८ | साईनाम ते गावे | — श्री. गजानन कुळकर्णी | ५९ |
| १९ | नमस्कार साष्टांग श्री साईबाबा | — श्री. जनार्दन बांदेकर | ६० |
| २० | सर्वज्ञ, सर्वसाक्षी श्री साईबाबा! | — श्री. मधुसूदन अंबाडे | ६१ |
| २१ | शिरडी वृत्त | — | ६४ |

# प्रार्थनेचा महिमा

## संपादकीय



साईभक्तानों तुम्ही साईदेवाची पूजा-अर्चा-पाठ नित्यनेमाने करीत असणार. काही भक्त तर बाबांना नैवेद्य ठेवल्याशिवाय तोंडात पाणीही घेत नाहीत. काहींच्या घरी गुरुवारी किंवा उत्सवप्रसंगी चार मंडळी जमून पूजा-प्रार्थना-आरती करण्याचा परिपाठ आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आपण या ना त्या रूपात आपल्या इष्ट देव-देवतेची प्रार्थना करतो. त्यामध्ये प्रामुख्याने संकट निवारण हाच हेतू असतो. परमेश्वराने आपल्याला सुखी व समृद्ध ठेवावे हीच प्रार्थना करणाऱ्यांची सदिच्छा असते. काहीजण प्रार्थनेकडे धार्मिक जीवन मार्गाचे एक अंग म्हणून पहातात, तर काही जण आपण आपल्या गरजांची परमेश्वराला आठवण करून द्यावी व त्याचे लक्ष आपल्याकडे वेधावे म्हणूनही प्रार्थना करतात. काही जण तर परमेश्वराची गैरमर्जी ओढवून घेऊ नये ते सूज्ञ माणसास तरी परवडणारे नाही, त्यापेक्षा परमेश्वराचे मर्जीमध्ये राहिलेले बरे अशा मतलबातून तडजोड वृत्तीतून प्रार्थनेकडे बघतात. यापेक्षाही आणखीन एक प्रकारचा समज करून घेणारे काही महाभाग आहेत. त्यांचे असे म्हणणे की एकदा परमेश्वराची प्रार्थना आटोपली की त्याबरोबर मागील काल पर्यंत केलेली सर्व ती पापे नष्ट झाली. नव्या प्रार्थनेनंतर आपण पुन्हा नवीन पापे करण्यास मोकळे झालो. जसे गंगेत स्नान करणारे महाभाग समजतात आपली सर्व आत्तापर्यंतची पापे डुबकी मारल्याबरोबर नष्ट झाली आता गंगा स्नान केल्यावर पुन्हा नव्याने पापकृत्ये करण्यास आपण मोकळे झालो आहोत अगदी तसेच. जुन्या पापांचा आपल्यावर आता कोणताच परिणाम होणार नाही. थोडक्यात सांगायचे म्हणजे आपण प्रार्थना आटोपण्याचे कर्तव्य केलेले आहे आता सत्कर्मासाठी आपल्याला प्रेरणा व सद्‌बुद्धी देण्याचे परमेश्वराचेच कर्तव्य नाही का असा त्यांचा सवाल. पण या सर्वांहून एक छोटासाच असा वर्ग आहे की त्यांना परमेश्वराची प्रार्थना करण्यातच रस आहे, आवड आहे.

प्रत्येक धर्मात परमेश्वराची प्रार्थना आहेच आहे. मग तो धर्म पौर्वात्य असो वा पाश्चिमात्य असो. प्रार्थनेचे सामर्थ्य किती आहे हे समजावून सांगणारी पुस्तकेही प्रत्येक धर्मात आहेत. पण भक्तांनो, प्रार्थनेने परमेश्वराची मदत मागणाऱ्या अशा मोठ्या वर्गाची तक्रार आहे की त्यांच्या प्रार्थनेस परमेश्वरी प्रतिसाद मिळत नाही. या उलट सुलट मनप्रवाहामुळे सर्वसामान्य माणूस गोंधळून जातो त्याचा निश्चय होत नाही, तो ढळतो.

पण प्रार्थनेचे महत्व खरोखरच जाणणाऱ्यांची अशी श्रद्धा आहे की प्रार्थनेमुळे आपला त्या सर्वश्रेष्ठ अशा परमेश्वर शक्तीशी संपर्क पोहोचतो, व तो आपल्याला जे वांछिलेले

असते ते तृप्त करण्याची कृपा करते.

काही जणांचा पवित्रा बचावात्मक असतो. त्यात ते परमेश्वराला आपल्या प्रेमाची ग्वाही त्याला देतात व म्हणून आपल्या छोट्याशा विनंतीची कदर करण्याचा मोबदला मागतात. या सौदेबाजी वृत्तीने काहीही उपयोग होत नाही. कारण खऱ्या प्रेमाचा सौदा व व्यापार होऊच शकत नाही. काही भक्तांची मखलाशी उदारतेच्या बुरख्याखाली दडलेली असते. अखिल मानव जातीच्या कल्याणाची त्यात प्रार्थना असते. प्रत्येकाने चांगले असावे, पहावे, कार्य करावे इत्यादी. अर्थात् हे आदर्श आहे यात शंकाच नाही. पण ही अशी प्रार्थना कोठपर्यंत? आपले स्वतःचे क्षेम कुशल ठीक आहे तो पर्यंत. पण आपले क्वचित दुर्दैव सुरू झाले, आजारपण आले, संकटे कोसळली तर हे विशाल हृदय विदीर्ण होते. थोडक्यात पहिल्या प्रार्थनेतील सर्व आर्तता, कळकळ आटून गेलेली असते.

भक्तांनो, आपण प्रार्थना कां करतो? परमेश्वर ही एक शक्ती या जगात आहे. ती सर्व शक्तिमान आहे. त्या शक्तीची कृपा आपल्यावर व्हावी. परमेश्वर उदारधि आहे तो आपली चिंता वाहतो म्हणूनच. या विचारांच्या पार्श्वभूमीकेमुळेच आपण प्रार्थना चिंता करतो. त्याचेशी प्रार्थनेच्या माध्यमातून संपर्क साधण्याचा प्रयत्न करतो. पण हा संपर्क साधण्याच्या पाठीमागे निष्ठा व कळकळ हवीच हवी हे कधीही विसरू नका.

इस्लाम मध्ये पाच वेळा प्रार्थनेच्या वेळा सांगितल्या आहेत. तर हिंदू धर्मात त्रिकाळ संध्येचे प्रयोजन आहे. इतर धर्मात निदान दोनदा-सांजसकाळ प्रार्थनेचे महत्व विषद केलेले आहे. प्रार्थनेच्या या शुभवेळी प्रार्थना करणाऱ्याने आपल्या अंतःकरणाची कवाडे उघडी करून परमेश्वराने त्यात प्रवेश करण्याकरिता आवाहन करायचे, व ती गोष्ट म्हणजे प्रार्थना. प्रार्थना करण्याकरिता शब्द व जुळणी आपणच ज्याने त्यानेच करावयाची असते. प्रार्थना करताना एकचित्तता हवीच हवी.

आंग्ल कवी टेनिसनने या प्रार्थना संबंधात म्हटले आहे की, माणसातील देव व देवातील माणूस ज्या उदात्त क्षणी एकरूप होतात तो क्षण म्हणजे प्रार्थना.

परमपूज्य महात्मा गांधीजी प्रार्थनेच्या संदर्भात म्हणत, "प्रार्थना हे माझ्या जीविताचे व श्रमाचे साफल्य नसून तो त्याचा पाया आहे. मी अन्नावाचून पुष्कळ दिवस राहू शकतो. पण प्रार्थनेवाचून माझा एकही दिवस गेलेला नाही."

असो, पेटणारी एक मेणबत्ती असंख्य मेणबत्त्या पेटवू शकते व प्रकाशाचा झगमगाट करू शकते. परमेश्वर भक्तीचे, प्रार्थनेचे तसेच आहे. ईश कृपेने ज्याला भक्तिज्ञानाचा लाभ झालेला आहे. प्रार्थनेचे मर्म ज्याला कळले आहे. त्याने हे मर्म न समजलेल्यांना समजावून देण्यात आपले परम पवित्र कर्तव्य आहे हे जाणून ते आचरणात आणण्याचे ठरविले तर श्री साईबाबांच्या तत्वज्ञानाचे पालन केल्यासारखे होणार आहे हे कार्य जो करील त्यावर श्री साईनाथ अक्षरशः प्रसन्न होत रहातील यात शंकाच नको. मात्र हे पवित्र कार्य करीत असतांना दुसऱ्याच्या श्रमाचे, बुद्धिचे, धनाचे अगर भावनेचे कोणत्याही प्रकारे अपहरण होता कामा नये. तरच हे पवित्र कार्य बजावले असे होणार आहे —

।।देव सर्वांठायी वसे। परि न दिसे अभाविकां।।
।।जळी स्थळी तो पाषाणी भरला। रिता ठाव न कोठे उरला।।
।।जिकडे पहावे तिकडे देव। अभाविकां दिसे वाव।।
।।एका जनार्दनी नाही भाव। तंव तया न दिसे देव।।

# संतांची सुवचने

संग्राहिका
— सौ. नीता उल्हास जाधव
सरेकर आळी, महाड.

परमपूज्य गोंदवलकर महाराजांनी लोकांना नामरूपी ईश्वराची भक्ती करण्याचा मार्ग दाखविला. त्यांनी लोकांना सांगितलेली कांही सुवचने —

१) भगवंताच्या नामाशिवाय मला कांही कळत नाही असे ज्याला कळले त्याला सर्व कांही कळले.

२) प्रपंचाची आवड असू नये. पण प्रपंचातील कर्तव्याची आवड असावी. देहाने ते कर्तव्य करावे आणि मनाने मात्र स्वस्वरूपी अनुसंधान ठेवावे.

३) भगवंताच्या देखत आपल्याला करायला लाज वाटणार नाही अशीच कृती आपण नेहमी करावी व नेहमी त्याचे स्मरण ठेवावे.

४) जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला आणि जेथे वासना संपली तेथे भगवंताची कृपा झाली.

५) देहाने नुसते तीर्थस्नान, पूजापाठ वगैरे करून परमार्थ घडत नाही, आपली वृत्ती भगवंताच्या ठिकाणी चिकटली पाहिजे.

६) भगवंताकडे आपण एकच मागावे की, भगवंता, प्रारब्धाने आलेले भोग येवू दे. पण त्यामध्ये तुझा विसर पडू देवू नकोस.

७) प्रारब्धाने आलेले भोग भोगावेच लागतात पण भगवंताचा पाठिंबा ज्याला आहे तो मागेपुढे सोईनी भोग भोगू शकतो.

८) कर्तव्याची जाणीव व भगवंताचे अखंड अनुसंधान हेच सर्व पोथ्यांचे सार आहे.

९) झाडाच्या मुळांना पाणी घातले की त्याच्या सर्व भागांना ते पोचते. तसे भगवंताचा विसर न पडू दिला तर सर्व कांही व्यवस्थित होते.

१०) भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण या शिवाय दुसरी कोणतीही गोष्ट प्रिय नाही. म्हणून आपल्या हृदयामध्ये अखंड नामाची ज्योत तेवत ठेवा.

# आत्मदर्शन म्हणजे आध्यात्मिक सिंधुतील बिंदू

डॉ. रा. सी. कापडी
एम. बी. बी. एस्
राजारामपुरी, कोल्हापूर

तद्विद्धि प्राणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्व दर्शिनः (अ.४-३४)

वरील उपदेशात सांगितल्याप्रमाणे आत्मसाक्षात्कारी लोक ज्ञानाचा उपदेश करतात. ज्ञानाचा म्हणजे आत्मज्ञानाचा उपदेश करतात.

पण ही शेवटची पायरी आहे. त्याच्या अगोदर साधकाला आत्मदर्शन व्हायला पाहिजे. आत्मदर्शन आणि आत्मसाक्षात्कार या दोन शब्दात फरक आहे. आत्मसाक्षात्कार व्हायला फार सायास पडतात. संतांचे दर्शन घेऊन, त्यांना नमस्कार करून, त्यांना प्रश्न विचारून त्यांची सेवा करून, जेंव्हा साधक गुरूच्या कसोटीला उतरतात, तेंव्हा गुरू भक्तावर प्रसन्न होऊन त्यांना आत्मसाक्षात्कारी बनवितात. या क्रियेला शक्तिपात म्हणतात. सर्व संतांची म्हणजे सद्गुरूची शक्तिपात करण्याची क्रिया सारखी नसते. कोणी स्पर्श करून, कोणी मस्तकावर वरदहस्त ठेवून, कोणी दृष्टीक्षेपाने, कोणी स्वप्नात येऊन शक्तिपात करतात. रामकृष्ण परमहंसांनी स्वामी विवेकानंदाला नुसत्या स्पर्शाने शक्तिपात केला. सिद्धरूपानी परमपूज्य माताजी कलावती देवीला वरदहस्त ठेवून काही प्रहर समाधी अवस्थेत ठेविले. तुकाराम महाराजांना स्वप्नावस्थेत गुरूचा सदुपदेश झाला.

सद्गुरूच्या कृपेने आत्मसाक्षात्कारी झालेले महात्मे पूर्वजन्मीच्या पुण्याईने तात्काळ त्या अवस्थेत पोहचतात. जमीन तयार झालेली होती. बी पेरण्याचा अवकाश, पर्जन्याच्या नुसत्या शिडकाव्याने रोप दिसायला लागते. गुरूच्या स्पर्शाचे नुसते निमित्त ठरते. पण असे लोक विरळा!

शिर्डीच्या साईबाबांना एका भक्ताने विचारले, आत्मज्ञान म्हणजे काय? लगेच त्याला उत्तर मिळाले, "मी देह नसून हृदयस्थ परमेश्वर आहे, त्याचे ज्ञान होणे म्हणजेच आत्मज्ञान."

हुबळीच्या सिद्धारूढांना एका शिष्याने "तुम्ही हृदयस्थ परमेश्वर म्हणजे आत्मा असे वारंवार सांगता. पण तो कोणाला दिसत नाही. "देव कसा कोठे आहे, हे ठाऊक न तुला मला।" असे एक कवी म्हणतो, तरी कृपया त्याची प्रचिती तुम्ही आम्हाला करून दिलीत, तर आमचे समाधान होईल."

सिद्धारूढ म्हणाले, "तुमचे वडील तुम्ही पाहिले आहेत काय?" "होय" "तुमचे आजोबा" "होय" तुमचे "पणजोबा" "नाही". "मग ते होते हे कशावरून समजतां?" "वडीलांच्या सांगी वरून" "मग वडीलांच्या शब्दावर तुम्ही विश्वास ठेवता ना?" "होय" तशी आध्यात्मिक मार्गाने वाटचाल सुरू झाल्यावर कोणावर तरी श्रद्धा ठेवली पाहिजे. तुमच्या अंगावर आताच गार वाऱ्याची झुळूक लागली. अंग थरारले. ते कशाने विचारले असता? तुम्ही काय सांगाल? "वाऱ्याने" वारा तुम्ही पाहिला आहे काय? "नाही"

असे असून सुद्धा तुम्ही वाऱ्यावर विश्वास ठेवता ना? मग साधुसंत सांगतील त्यावर विश्वास ठेवायला नको का? सद्गुरूंच्या शब्दावर श्रद्धा ठेवून तुम्हाला वाट पहावयासच पाहिजे. लगेच निर्णायक उत्तर मिळणार नाही. शिर्डीच्या साईबाबांची "श्रद्धा" आणि सबूरी हे दोन शब्द वेद वाक्याप्रमाणे प्रसिद्ध आहेत.

"श्रद्धा" म्हणजे विश्वास आणि "सबूरी" म्हणजे वाट पहाणे. एकदम उतावीळ न होणे. श्रद्धा हा दोन अक्षरी शब्द आहे पण त्याचे सामर्थ्य महान आहे. चार वेदांची सुद्धा अशी महान वाक्ये आहेत. अयमाया ब्रह्म! (अथर्ववेद), प्रज्ञान्मानंद ब्रह्म (ऋगवेद), अहं ब्रह्मासि (यजुर्वेद), तत्वमसि (सामवेद)

वरील महावाक्यावर आपण हिंदु लोक श्रद्धेने विश्वास ठेवतो. तसेच आत्मा म्हणजे चैतन्य. सर्व प्राणीमात्राची हालचाल ज्याने होते ते चैतन्य!

या आत्म्याची म्हणजे चैतन्याची ओळख करून घ्या — घ्यायला सद्गुरूला शरण गेले पाहिजे. सद्गुरूच्या कसोटीला तो पूर्णपणे उतरला पाहिजे. पूर्व पुण्याईचे गाठोडे बरोबर आणलेले असेल तर ह्या गोष्टी चटकन घडून येतात. नाहीतर अपार कष्ट पडतात.

जे ज्ञानाचा कुरूण, सेवा हा दार वंटा।
तो स्वाधीन करी सुभरा ओळंगोनी। (ज्ञानेश्वरी)

सद्गुरू ज्ञानाचे माहेर-घर आहे. सेवाधर्म हा त्या घराचा उंबरठा आहे. तो सेवाधर्माने तू आपल्या स्वाधीन करून घे.

सेवा कशी करायची हे पण ज्ञानोबाराय माऊलीने सांगितले आहे.

तनु मनु जिवे चरणाशी लागावें।
अगर्वता करावें हास्य सकळ

सातारा जिल्ह्यातील ब्रह्मचैतन्य महाराज म्हणजेच गोंदवलेकर महाराज यांनी अगदी लहान वयात आपल्या गुरूची तुकामाईची सेवा कशी केली हे पहाणे मनावर ठसणारी गोष्ट आहे. एकदा तुकामाईने गोंदवलेकरांना रानात लाकडे जमा करण्याच्या निमित्ताबरोबर घेतले. जाता जाता वाटेवर एक वडाचा प्रचंड वृक्ष आढळला. त्यावर चढून वडाची पाने काढण्यास गुरूनी सांगितले. शिष्याने वर चढून शेकडो पाने खाली टाकली. पानांच्या देठातून चीक टपटप गळू लागला. ते पाहून गुरू म्हणाले "अरेरे! हे काय केलेस तो वृक्ष रडत आहे. ती सगळी पानं गोळा कर आणि होती तशी पूर्ववत चिकटून लाव. शिष्याने हूं की चूं न करता ती सर्व पाने गोळा केली आणि पूर्ववत चिकटून लावली. आश्चर्य असे की ती पाने जागच्या जागी इतकी बेमालूम चिकटली की ती तोडलेली होती हे सुद्धा कोणाला कळणार नाही.

या एकाच गोष्टीवरून दोन गोष्टी घडून आल्या. शिष्य गुरूच्या परीक्षेला उतरला आणि शिष्याला गुरूबद्दल आदर द्विगुणीत झाला. अगर्वता दास्य कसें करायचे हे कळून येईल.

आत्म्याची ओळख ज्ञानोबा रायाने हरीपाठ अभंग मध्ये पूर्णपणे करून दिली आहे.

समबुद्धि घेतां समान श्रीहरी।
रामदमावरी हरी आला ॥
सर्वांघरी राम देहादेही एक।
सूर्य प्रकाशक सहस्त्र रश्मी ॥

व्यापक दृष्टीने पहाता सर्व प्राणीमात्रात आत्मा म्हणजे ईश्वराचा अंश एकच आहे. अनेक घट पाण्याने भरून दोन प्रहरी उन्हात ठेविले, तर सूर्याचे पडलेले प्रतिबिंब एकच आहे असे दिसून येईल. तसे देहादेही म्हणजे सर्व प्राण्यांच्या देहात चैतन्य म्हणजे आत्मा एकच आहे. रामादमावरी हरी झाला. सर्व मनोंद्रिये आणि कर्मेंद्रिय यावर जर जय मिळविला तर तो मानव प्रत्यक्ष परमेश्वराच्या रूपात दिसेल.

देहादेही एक यावर भाष्य करताना साईबाबांनी

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽऽर्जुन।
सुखं वा यदिवा दुःख स योगी परमोमतः (गीता ६/३२)

या गीतावचनावर प्रात्यक्षिक करून दाखविले.

साईबाबांच्या दरबारात 'लक्ष्मीबाई' या नावाची बाई अकस्मात आली. तिच्याकडे पाहून बाबा म्हणाले "लक्ष्मी! मला भूक लागली आहे. हे शब्द बाबांच्या तोंडून बाहेर पडताच लक्ष्मीबाई म्हणाली" थांबा बाबा! आताच भाकऱ्या भाजून आणते. थोड्याच वेळात बाई ताज्या भाकऱ्या भाजून वर झुणका ठेवून आली. ताट बाबांच्या पुढे ठेविले. बाबांच्या पायाशी एक कुत्रा भुकेने निपचित पडलेला होता. त्याच्यापुढे ते भरलेले ताट साईबाबांनी सरकविले. त्या कुत्र्याने ताटातील वस्तुवर अधाशाप्रमाणे यथेच्छ भूक भागविली. हे कृत्य पाहून लक्ष्मी म्हणाली — "बाबा! हे काय केलेत? एक चतकोर तुकडा तरी घ्यायचा होता?" ती कष्टी झालेली पाहून बाबा म्हणाले "लक्ष्मी तू कष्टी होऊ नको. त्या कुत्र्याची आणि माझी भूक एकच आहे. तो संतुष्ट झालेला पाहून मला समाधान झाले. माझी भूक शमली." सुख|दुःख भूक तहान मानवाप्रमाणे सर्व प्राण्यांना सारखीच लागते.

वरील विवेचनावरून आत्मा देहादेही आहे हे सिद्ध झाले. परंतु त्याचे दर्शन कसे घडावे?

मुंबई येथील जोगेश्वरीच्या गणेशपुरी आश्रमातील स्वामी मुक्तानंद हे ध्यान समाधीत गेल्यावर त्यांना जे आत्मदर्शन होई त्याचे वर्णन त्यांनी चित्तशक्ती विलास या पुस्तकात खालील प्रमाणें केले आहे त्यावरून आपणास कांही बोध होतो काय ते पाहू.

ध्यान करतां करतां नासाग्री किंवा दोन भ्रूकटीच्या मध्ये चित्र स्थीर होताच अनेक रंगाची वलये दिसतात. अगदी बाहेरील वलय रक्तवर्णाचे असून ते बरेच विस्तृत असते. त्याला त्यांनी रक्तेश्वरी हे नाव दिलेले दिसते. हे वलय स्थूल देहाचे प्रतीक आहे. त्याच्या आत श्वेतेश्वरी (श्वेत रंगाचे) वलय दिसते. ते सूक्ष्म देहाचे प्रतीक होय. त्याच्या आत कृष्णेश्वरी (कारण देहाचे प्रतीक), नंतर पितेश्वरी, निलेश्वरी (महाकारण) अशी आत आत वलये दिसतात. निलेश्वरीच्या आत मधोमध अगदी लहान, तिळा एवढा नील बिंदू किंवा ज्योतीबिंदू दिसतो." हा बिंदू सुरवातीला क्षणात दिसतो, क्षणात नाहीसा होतो. तुकाराम महाराजांनी खालील अभंगात 'हरीहराच्या मूर्ती। बिंबल्यात येती जाती' असे म्हटले आहे.

तिळा एवढे बांधिले घर। आंत राहे विश्वंभर ॥१ ॥
तिळा इतके बिंदुले। तेणें त्रिभुवन कोंदाटले ॥२ ॥
हरीहराच्या मूर्ती। बिंबल्यांत येती जाती ॥३ ॥
तुका म्हणे हे बिंदुले। तेणें त्रिभुवन कोंदाटले ॥४ ॥

ज्ञानदेव माऊलीने निल बिंदू बद्दल म्हटले आहे —

डोळ्याची पहा डोळा। शून्याचा शेवट ॥
नील बिंदु नीट नीट लखलखती ॥१ ॥
विसावें नाले, घातलें चैतन्य तेथें।
पाहे पहा निरूते। अनुभवें ॥२ ॥
पार्वती लागी आदीनाथ दानिले।
ज्ञानदेवा फावले निवृत्ती कृपा ॥३ ॥

अर्थ — आपल्या नयनाचाही नयन जेथे शून्याचा शेवट होतो तोच निलबिंदू। तेथे चैत्यनाला विश्रांती मिळते. नीलबिंदू! हेंच चैतन्य आत्म्याचे परमस्थान आहे. अनुभवलेले हे गुप्त रहस्य शंकराने पार्वतीला सांगितले आहे ज्ञानोबाराय माऊली म्हणते सद्गुरू निवृत्ती नाथाच्या कृपेने मी ते पाहिले.

ज्ञानदेवाला सुद्धा गुरूच्या कृपेशिवाय ते दिसले नाही. म्हणून गुरूकृपा होईपर्यंत हरीहराच्या मूर्ती बिंबल्यात येती जाती. हे रहाट गाडगे मानवाला गुरूकृपा होईपर्यंत अनेक जन्म असेच चालणार आहे.

शिर्डीच्या परमपूज्य साईबाबांनी

तद्विद्धि प्रणिपातेन परि प्रश्नेन सेवया। (अ. ४/३४)

या श्लोकावर ज्ञानावर आलेले भाष्य केल्याप्रमाणे अज्ञानाचे टरफल झाडून टाकल्याशिवाय अंतरात्माच्याची ओळख पटणार नाही. याच्यावर

द्वैताची झाडणी। गुरूवीण ज्ञान। तया कैंचे कीर्तन।
घडेल नामी। (हरीपाठ अभंग)

आत्मज्ञान झाल्यावर ज्ञानी लोकांना आत्मसाक्षात्कारी लोकांना सर्वज्ञान करतल आमलका प्रमाणे सहज साध्य होते.

साईबाबा कलीयुगातील अवतारच असल्यामुळे ते 'एकेन ज्ञानेन सर्वदा विज्ञान भवति' असे आहेत.

त्यांचा उपदेश न्यायरत्न दाभोलकरांच्या सच्चरित या ग्रंथात भरगच्च भरलेला आहे. त्यातील दररोज एक तरी अध्याय निदान कांही ओव्या वाचण्याचा परिपाठ ठेवावा.

जयासि वाटें सुखाचे असावे।
तेणे आत्मरूप ओळखावे।
स्वजनही सगळे त्यागावे। दुःखमूळ जे ॥
सद्गुरूशी शरण जावे।
आपले मूळरूप ओळखावे।
आनंद साम्राज्यपदी वसावे। हाचि परमार्थ ॥

# श्री साई-गायत्री मंत्र

— डॉ. अ. का. पाठक
पाठक निवास, [illegible]

श्री गायत्री-मंत्र हा विश्वातील सर्व मंत्रांचा चक्रवर्ती सम्राट आहे. सर्व [illegible] मंत्राचा प्रथम क्रमांक आहे. आर्यांच्या देव-देवतांमध्ये सूर्याला [illegible] जीव सृष्टीच्या दृष्टीकोनातून सूर्याचे स्थान प्रथम क्रमांकाचे आहे. [illegible] मुनी, ब्राम्हण वगैरे सर्व आर्य श्री सूर्यास स्नानानंतर प्रथम अर्घ्य [illegible] तर जगात जीव सृष्टी निर्माणच होणार नाही. जीवसृष्टी नसेल तर मानवाची [illegible] होऊ शकणार नाही. आर्यांना विज्ञान अवगत होते. ज्ञात होते. सुविद्य, [illegible] सूर्य देवतेस प्राधान्य दिले. आजही सकाळी उठून प्रथम सूर्याचे दर्शन व [illegible] घेऊन सुसंस्कृत भारतीय दिनचर्येची सुरवात करतो, व प्रार्थना करतो.

कराग्रे वसते लक्ष्मी
करमध्ये सरस्वती
करमूले तु गोविंदम्
प्रभाते कर दर्शनम्॥

'कर' म्हणजे सूर्य व 'कर' म्हणजे हात असे दोन्ही अर्थ या प्रार्थनेत [illegible] आहेत. सूर्याचे अत्यावश्यक महत्व ओळखून आर्यांनी गायत्री मंत्राची रचना केली आहे. [illegible] श्रेष्ठ आर्य, महर्षि विश्वामित्रांनी गायत्री मंत्राची रचना केली आहे. प्रती सृष्टी [illegible] करण्याची क्षमता असलेल्या विश्वामित्रांनी गायत्री मंत्राची रचना केली आहे.

महर्षी विश्वामित्रांनी ब्रह्मर्षी वशिष्ठांनी सरतेशेवटी ब्रह्मर्षीची उपाधी प्रदान केली. [illegible] देवर्षी नारद, ब्रम्हर्षी वशिष्ठ तद्वत् महर्षी विश्वामित्र सुप्रसिद्ध आहेत. [illegible] होते. आर्यांचे सर्वात मोठे चक्रवर्ती सम्राट राजे होते. प्रखर बुद्धीमान व [illegible] होते. त्यांना ज्ञान, विज्ञान व आत्मज्ञानाची गोडी लागली. त्यांनी [illegible] व तपश्चर्येस सुरवात केली. प्रती सृष्टी निर्माण केली. महर्षीपद प्राप्त केले. [illegible] आर्यश्रेष्ठ व ऋषीश्रेष्ठ विश्वामित्रास ऋषी समुदाय ब्रह्मर्षी पद प्रदान करण्यास [illegible] नाहीत.

ब्रम्हर्षि वशिष्ठांनी श्रीरामास सर्व ज्ञान, विद्या, कला, शिकविल्या [illegible] 'योगवाशिष्ठ'ही शिकविले. पण अनार्य चक्रवर्ती शिवभक्त रावणास [illegible] श्रीरामात निर्माण होणे आवश्यक होते. धनुर्विद्या पारंगत व आत्मज्ञानी [illegible] श्रीरामात जागृत करणे अत्यावश्यक होते. यास्तव श्रीरामाची [illegible] सर्वज्ञान, १४ विद्या, ६४ कला, विज्ञान, आत्मज्ञान देऊन श्रीरामास पूर्ण [illegible] देवत्व निर्माण करण्याची किमया विश्वामित्राने केली. ब्रम्हर्षीपद [illegible] विश्वामित्राने श्री गायत्री मंत्राची निर्मिती केली. श्रीरामांना [illegible] विश्वामित्रास ब्रम्हर्षी पद प्राप्त झाले नाही. यास्तव संतप्त विश्वामित्राने गायत्री [illegible]

गायत्री मंत्र निर्माण करून विश्वामित्राने प्रती सृष्टी निर्माण केली. ब्रम्हदेवास ते आव्हान वाटले. ब्रम्हदेव गायत्री मंत्राचा द्वेष करू लागले. त्यांनी गायत्री मंत्राला शाप दिला. आणि वशिष्ठांना वाटले की आता विश्वामित्र आपल्यापेक्षा वरचढ होतील. गायत्री मंत्राच्या सामर्थ्याने विश्वामित्र सर्वश्रेष्ठ होतील. विश्वामित्र क्षत्रिय आहेत. ते ब्राम्हण नाहीत विश्वामित्र आपल्यापेक्षा श्रेष्ठ होतील. तेंव्हा गायत्री मंत्राचे सामर्थ्य कमी केले पाहिजे. यास्तव वशिष्ठांनी गायत्री मंत्राला शाप दिला. अशा तऱ्हेने गायत्री मंत्रास विश्वामित्र, ब्रम्हदेव तथा वशिष्ठांनी शाप दिले आहेत.

ॐ सत्यं सत्यलोक पुरुषं। एवं ब्रम्हशाप द्विमुक्ता भव॥
ॐ स्व. स्वर्लोकं पुरुषं। त्वं वसिष्ठ शाप द्विमुक्ता भव॥
ॐ गायत्रीत्रय तर्पयामि। त्वं विश्वामित्र शापा द्विमुक्ता भवं॥

गायत्री मंत्र पठणापूर्वी गायत्री मंत्राच्या तीन शापांतून मंत्रास मुक्त करावे लागते. शापमुक्ती नंतर गायत्री मंत्राचा जप केल्यास शक्ति, सामर्थ्य, सिद्धी, प्राप्त होते गायत्री मंत्र हा शास्त्रशुद्ध मंत्रराज आहे. त्याचे पठणही शास्त्रशुद्धतेने करावे लागते.

माझ्यामते ब्रम्हदेव, वशिष्ठ व विश्वामित्रांनी मूळ गायत्री मंत्राचे सामर्थ्य वाढविण्यासाठी व मंत्रास शुद्ध करण्यासाठी योग्य सुधारणा केल्या असाव्यात. त्यांनी मूळ गायत्री मंत्राची टीका करून त्यात सुधारणा केल्या असाव्यात. सरते शेवटी विश्वामित्रांनी टीका ऐकल्यावर स्वतः तप-साधनेने गायत्री मंत्रास सुधारणा केली आहे. थोरामोठ्यांची मनेही मोठी असतात. आपण पुराणात वाचतो की रागाच्या भरात शाप देतात व काही कालानंतर विनंती केल्यावर उःशाप दिला जातो. त्याप्रमाणे ह्या श्रेष्ठ तपस्व्यांनी रागाने टीका केली व मग सुधारणा सुचविल्या असाव्यात. मग सुधारित, शुद्ध गायत्री मंत्राची निर्मिती करून विश्वामित्राने तप-साधना वाढविली आणि ब्रम्हर्षी पद प्राप्त केले. महर्षि विश्वामित्रांची सर्वश्रेष्ठ निर्मिती गायत्री मंत्र आहे. हा पहा श्री गायत्री मंत्र —

ॐ भुर्भुवः स्वः (मंत्रारंभी १ वेळा म्हणावे)
ॐ तत्सर्वितुवरेण्यं। भर्गो देवस्य धीमही।
धियो योनः प्रचोदयात्॥

**अर्थ** — जो सूर्य आमच्या बुद्धिला प्रेरणा देतो त्याच्या सर्वश्रेष्ठ तेजाची आम्ही उपासना करतो.

ॐ भूः, ॐ भवः, ॐ स्वः, ॐ महः, ॐ जनः,ॐ तपः, ॐ सत्यम् या सात व्या हती आहेत. त्या फक्त एक वेळ गायत्री मंत्रापूर्वी प्राणायामाच्या वेळी म्हणतात. 'ॐ भुर्भवः स्वः' या व्याहृती गायत्री मंत्राच्या जपाच्या आरंभी म्हणतात. मग मंत्राचा जप करतात. गायत्री मंत्राची अक्षरे २४ आहेत. बारा दुणे चोवीस होतात. २४ अक्षरांचा मंत्र तयार करण्यात विज्ञान व गणित शास्त्राचा संबंध असावा. प्रत्येक शास्त्राचा उपयोग करून मंत्र शास्त्रशुद्ध करण्यात आला आहे. गायत्री मंत्रराज सामर्थ्यशाली आहेच त्याशिवाय हा मंत्र हजारो वर्षे लोकमताच्या शिखरावर आहे. यास्तव तपस्वी तथा सामर्थ्यशाली भक्तांनी आपल्या लाडक्या देवदेवतांचे गायत्री मंत्र निर्माण केले आहेत. हे देव देवतांचे गायत्री मंत्र जनतेस सुप्रसिद्ध झाले आहेत.

श्री गायत्री मंत्रानंतर विविध देव देवतांचे गायत्री मंत्र निर्माण झाले. त्यापैकी काही मंत्र वाचकांच्या माहितीसाठी येथे सादर करतो. सर्वप्रथम श्री गणेशाचा गायत्री मंत्र सादर करतो कारण प्रथम श्री गणपतीचे पूजन करण्याचा परिपाठ भारतात आहे —

ॐ अेकदंताय विद्महे।
वक्रतुंडाय धीमहि।
तन्नो दन्ती प्रचोदयात्॥
ॐ नारायणाय विद्महे।
वासुदेवाय धीमहि।
तन्नो विष्णुः प्रचोदयात्॥
ॐ देव्यै ब्रम्हण्यै विद्महे।
महाशक्त्यैच धीमहि।
तन्नो लक्ष्मी प्रचोदयात्॥

ॐ दिगंबराय विद्महे।
अवधूताय धीमहि।
तन्नो दत्त प्रचोदयात॥

वरील विविध गायत्री मंत्र अभ्यासिल्यावर खालील (१) गायत्री मंत्र २४ अक्षरांचा असावा (२) प्रथम पंक्ती शेवटी विद्महे आणि द्वितीय पंक्ती शेवटी 'धीमही' शब्द अत्यावश्यक आहेत. (३) तिसऱ्या पंक्तीत सुरवातीला 'तन्नो' व शेवटी 'प्रचोदयात्' शब्द आवश्यक आहेत. (४) प्रत्येक पंक्तीत ८ अक्षरे व अशा ३ पंक्ती असाव्यात. (५) प्रत्येक पंक्तीत आराध्य दैवताचे नाव असावे.

जसे (i) दिगंबर, अवधूत, दत्त
(ii) नारायण, वासुदेव, विष्णु

हे पाच नियम लक्षात घेऊन जी व्यक्ती साधक, तपस्वी, आत्मज्ञानी तथा साईभक्त आहे अशी श्रेष्ठ व्यक्ति श्री साई गायत्री मंत्र निर्माण करू शकेल व त्या गायत्री मंत्राची साधना सफल होईल. त्याचप्रमाणे त्या साई गायत्री मंत्रावर टीका करण्याचा अधिकार वशिष्ठ, ब्रम्हदेवाप्रमाणे ज्ञानी व्यक्तीस रहातो. त्या टीकेनुसार श्री साई गायत्री मंत्रात सुधारणा यथायोग्य रित्या करावी. गायत्री मंत्र हा शास्त्रशुद्ध मंत्र आहे. हे माझे नम्र विवेचन अपूर्ण असू शकते त्यावर जाणकारांनी आपले भाष्य जरूर व्यक्त करावे.

२, ३ फेब्रुवारी, १९८६ रोजी लेखक कवी सम्मेलनात अनेक विद्वान साईभक्त लेखक कवींच्या बरोबर चर्चा करण्याची संधी मिळाली. त्यावेळी श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयाचे ज्येष्ठ अधिक्षक श्री. पाठक म्हणाले की श्री साईलीला मासिकात श्री साई-गायत्री मंत्र पूर्वीच प्रसिद्ध झाला आहे. काही साई भक्तांनी ही माहिती सत्य असल्याचे सांगितले व खाली श्री साई-गायत्री मंत्र नमूद केलेला सांगितला —

ॐ श्री साईनाथाय विद्महे।
गुरूदेवाय धीमहि।
तन्नो साई प्रचोदयात॥

साई भक्त लेखक-कवींच्या बरोबर चर्चा केल्यावर खालील श्री साई-गायत्री मंत्र निर्माण झाला —

ॐ श्री साईरामाय विद्महे।
साईरामाय धीमहि।
तन्नो साई प्रचोदयात॥

सम्मेलन प्रसंगी चक्रमुद्रित प्रती खाजगीरित्या वाटल्या गेल्या त्यामध्ये खालील मंत्र नमूद केला होता.

ॐ श्रद्धासबुरी विद्महे।
द्वारकामाई धीमहि।
तन्नो साई प्रचोदयात॥

मी वर नम्रपणे ५ मुद्दे कस लावण्यासाठी सुचविले आहेत. पण श्री साई गायत्री मंत्र निवडण्याचे व निर्माण करण्याचे कार्य श्रेष्ठ, तपस्वी, विद्वान साईभक्तांनी श्री साई आज्ञेने करायचे आहे. मी फक्त श्री साईगायत्री मंत्राबाबत माहिती वाचक-साईभक्तांसाठी सविनयतेने ह्या लेखात सादर केली आहे. श्री साई गायत्री मंत्र हा शास्त्रशुद्ध असावा. श्री. गायत्री मंत्र हा मंत्रांचा बादशहा आहे. मंत्रांचा शहेनशहा आहे. यास्तव शास्त्र शुद्धता पहाणे आवश्यक आहे केवळ भावना विवशतेने मंत्र निर्मिती करू नये. श्री साईनाथ आज लाखो, करोडो भक्तांचे आराध्य दैवत आहे. यास्तव सर्वमान्य, विद्वतमान्य व साईभक्त मान्य असा शास्त्र शुद्ध श्री साई गायत्री मंत्राची रचना करणे अत्यावश्यक आहे. श्री साईभक्त व साधकांचा तो महान साई-गायत्री मंत्र सिद्ध-चिंतामणी ठरेल.

जय साईराम। जय साईशाम.

# श्रद्धा आणि सबूरी

— प्रा. गिरीश जोशी
घाटकोपर मुंबई

साईबाबांच्या भक्तांना ह्या वरील शब्दातील सामर्थ्याची कल्पना आहेच. बाबांच्या शिकवणुकीचा हा गाभाच आहे. ह्या दोन शब्दांच्या प्रभावाने सबंध जीवनाला निश्चितपणे एक वेगळे वळण मिळू शकते.

मनुष्य हा नियतीच्या हातातील एक कळसूत्री बाहुले आहे. नियतीच्या इच्छेप्रमाणे त्याचे आयुष्य आकारत जाते. सागरातील एका लाटेने ज्याप्रमाणे दोन ओंडके एकत्र

येतात व दुसऱ्या लाटेने दूर होतात त्याप्रमाणे योगायोगाने भरलेले हे मानवी आयुष्य, अतिशय चंचल, अतर्क्य व अनाकलनीय असे हे जीवन स्थिर, सुबक, सुसह्य, तर्क्य आणि आकलनीय केवळ सत् श्रद्धेने होऊ शकते. सत् श्रद्धा हे मानवी जीवनाचे एक आवश्यक अंग आहे. प्रयत्नपूर्वक जीवनमार्गक्रमण करीत असताना श्रद्धेच्या आधारानेच आपण तिला सुलभ करू शकत असतो. श्रद्धेतूनच स्थिरतेचा उदय होतो. विनिततेचा जन्म होतो. श्रद्धा मग ती बुद्धीवर असो वा भक्तीवर असो, तर्कावर असो वा मनगटाच्या ताकदीवर असो त्याविना जीवनाला पूर्णत्व येत नाही.

प्रारंभी अशक्य असे वाटणारे कार्य श्रद्धा बळावरच यशस्वी होऊ शकते. खिलजीच्या स्वाऱ्यांनी खिळखिळा झालेला महाराष्ट्र देश वारकरी पंथामुळे धर्मजागृत होऊन एका श्रद्धेने तगू शकला. खुद्द वारकरी संप्रदायातही त्याकाळी तुकारामानंतर नाव घेण्याइतका मोठा संत झाला नसला तरी सर्वसामान्य माणसांनीच तो पंथ व समाज जगविला आणि जागविला. 'मुखी नाम हाती मोक्ष' अशी शिकवण देत देत, प्रपंचाचा त्याग न करता, अंगीकृत कर्तव्ये न टाळता जर आस्तिक बुद्धीने हरीस्मरण केले तर हा भवसागर आपण निश्चितपणे पार करू शकतो ही जाण त्यांनी निर्माण केली. प्रवृत्ती व निवृत्तीची सांगड घातली.

अज्ञानी, अशिक्षित, अर्धपोटी जनतेला हाताशी धरून बलाढ्य बादशाहांना शिवाजी महाराजांनी नमविले. एकट्या शिवाजीला विशेषतः प्रारंभी द्रव्यबळ नसताना हे कार्य करणे अतिशय अवघड होते. परंतु त्यांना त्यांच्यावर आणि स्वराज्यावर श्रद्धा ठेवणारी जी माणसे भेटली त्यातून स्वराज्याचे एक स्वप्न साकार झाले. प्रत्यक्षात आले.

ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीही मावळत नाही अशा बलाढ्य ब्रिटीशशाहीलाही गांधींजींनी आपल्या असंख्य अनुयायांच्या सहाय्याने, सत्याग्रहाच्या लढ्याने नमविले. बेचाळिसच्या सोनेरी दिवसांत प्रत्येक भारतवासी एका भव्य दिव्य कटरचनेने भारून गेला होता. नेत्यांच्या आदेशाला त्याने श्रद्धापूर्वक साथ केली. म्हणूनच तो लढा यशस्वी होऊ शकला. आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त झाले.

सर्वसामान्य मानवी आयुष्यातही असे अनेक प्रसंग येतात की आपल्याला काही वेळा नेमके काय करायचे हे सुचत नाही. आपत्ती ह्या एकदम अचानकच येतात. पण त्या ओलांडायला जर श्रद्धाबळ आपल्याकडे असेल तर त्या आपण सुखेनैव पार करू शकतो. पर्वताएवढे दुःख असलेल्या संसारात हे दुःखरूपी पहाड ओलांडायला मदत करते ती श्रद्धाच. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे'? ह्याचे उत्तर सामान्यतः नकारार्थीच येते. जरी सुख व दुःख हे मानण्यावर असले तरी सुख व दुःख भोगताना मनाची संतुलित अवस्था श्रद्धा निर्माण करते. सुखाने फुगून न जाता व दुःखाने खचून न जाता सारासारपणे जीवनाला सामोरे जाण्याची शिकवण श्रद्धाच मानवी मनात निर्माण करते. श्रद्धा मग ती सगुणावर असो वा निर्गुणावर असो, तर्कावर असो वा भावनेवर असो आपल्याला सांगते की आपल्यापेक्षा ह्या विश्वात अशी एक कोणतीतरी शक्ती आहे की ती सर्वव्यापी परिपूर्ण आणि सर्वापेक्षा दशांगुळे मोठी आहे. श्रद्धा निर्गुणाला साकार करते व मानवी मनाला विसावा देते. सांसारिक आपत्तींनी ग्रासलेल्या मनाला शीतलता,

शांतता देते. सगुणाद्वारे निर्गुणाचीच शिकवण देते. रक्ताची नातीगोती, समाज, माझेपण जे केवळ दुःखालाच जन्म देते, त्या सर्वातून श्रद्धा मानवाला तारते. पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे असणाऱ्या ह्या नाशिवंत जगतात श्रद्धेने सुसह्यता येते पण श्रद्धेचे फळ ताबडतोब मिळावे ही ही अपेक्षा बाळगणे व्यर्थ.

श्रद्धेला उत्कटता हवी. रामकृष्ण सांगतात की पाण्यात बुडालेला मनुष्य मोकळा श्वास घेण्यासाठी ज्या तीव्रतेने धडपडतो तेवढी तीव्रता व उत्कटता श्रद्धेत असावी. केवळ स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी वा दुसऱ्याच्या अहितासाठी नवस करून इच्छित फल प्राप्त करण्यास धडपडणे हे योग्य नव्हे. श्रद्धेच्या ठायी अनन्यता हवी. ज्ञानेश्वर जसे सांगतात की मेणाची बाहुली समुद्रात बुडविली की तिचे वेगळे असे अस्तित्व उरत नाही. तेवढी दृढ सामीप्यता श्रद्धेत असावी. गंगेत लाटा असतात पण लाटेत सर्व गंगा नसते. त्याप्रमाणे मीपणाला थारा न देता श्रद्धापूर्वक अंतःकरणाने जर आपण आपले कर्तव्यकर्म केले तर निश्चितपणे 'योगक्षेमम् वहामि अहम्' हा अनुभव श्रद्धा आपल्याला देते. पण तेथे पी हळद अन् हो गोरी ही अपेक्षा बाळगणे चुकीचे.

बाजारातून कोणतीही गोष्ट खरेदी करताना आपण ती खरेदी किती काळजीपूर्वक करत असतो. जशी काय ती आपल्याला सबंध आयुष्यभरच पुरणार असते. सर्वसामान्य गोष्टींबाबत जर आपला हा चिकित्सक दृष्टीकोन असतो तर तो परमेश्वर जरी आशुतोष असला तरी श्रद्धेची सत्यता पारखल्याशिवाय कसा प्रसन्न होईल? त्यासाठी सबूरी आवश्यक असते. त्यासाठी जप, तप, अनुष्ठान, कर्मकांड यांचे स्तोम अनावश्यक असते. निर्मळ मनाने, एकाग्रतेने आणि लीनतेने जर त्या सर्वसाक्षित्वाला आपण सामोरे गेलो तरच तो आपला होतो, किंबहुना आपण आणि तो असा भेद न उरता मी-तूपण विलयाला जाते व 'भक्त तोचि देव। देव तोचि भक्त' ही प्रचीती येते.

श्रद्धेने पांगळे न बनता सबूरीने धैर्याने आलेल्या प्रसंगाला तोंड देत श्रद्धेच्याच बळावर आयुष्याची वाटचाल करणे हाच परमधर्म. प्रत्येक गोष्ट नवीन शिकत असतानाचे होणारे कष्ट व ती गोष्ट आकलनाने सवयीची झाल्यावर त्यातील जाणवणारी सहजता आपण लक्षात घेतली पाहिजे. बाळपणी अक्षरे गिरविताना, एकेक अक्षर सुटेपणाने स्वतंत्रपणे लिहायला आले म्हणजे अत्यानंद होतो. त्यासाठी घेतलेल्या कष्टांची जाणीव उरत नाही व त्यानंतर कितीही वेगाने आपण लिहू शकतो, पण प्रथमतःच जर ती गिरविण्याचा कंटाळा केला तर लिहिता येणे अशक्य.

त्याचप्रमाणे मनाची शांती ढळू न देता, श्रद्धा व सबूरी हे दोन शब्द ध्यानात ठेवून, मी माझे, हे पार दवडून जर आपण आयुष्याला सामोरे गेलो तर तो 'परमसखा' 'ये यथा मां प्रपद्यन्ते तां तथैव भजामि अहम्' ह्या वचनाची ग्वाही देतो व 'न मे भक्तः प्रणश्यति' हा अनुभव देतो.

स्वतः बाबाही ह्या विषयी आपल्याला सांगतात की प्रथमतः त्यांच्या गुरूने त्यांच्याकडे दोन पैशांची दक्षिणा मागितली होती व ते दोन पैसे म्हणजे निष्ठा (श्रद्धा) व सबूरी ते त्यांनी केव्हाच त्यांना समर्पित केले होते. त्यामुळे ते त्यांच्यावर प्रसन्न झाले बाबा

धैर्य तीच गे बाई सबूरी। सांडू नको तिजला दूरी
पडतां केव्हांही जडभारी। हीच परपारी नेईल।। ५३ ।।
पुरूषांचे पौरुष ती ही सबूरी। पाप ताप दैन्यता निवारी।
युक्तिप्रयुक्ती आपत्ति वारी। बाजूस सारी भय भीती।। ५४ ।।
सबूरी सद्गुणाची खाणी। सव्दिचाररायाची हे राणी।
निष्ठा आणि ही सख्या बहिणी। जीव प्राण दोघींसी।। ५५ ।।
सबूरीवीण मनुष्यप्राणी। स्थिती तयाची दैन्यवाणी।
पंडित असो का मोठा सदगुणी। व्यर्थ जिणे हिजवीण।। ५६ ।।
श्री साईसच्चरित अध्याय १९

बाबांच्या भक्तांनाही ह्याबाबत अनेक अनुभव आले व येतात.

असावे निर्मळ श्रद्धाबळ। वदी प्रज्ञेचे बळ प्रबळ।
सबूरीची जोड अढळ। परमार्थ सबळ तयाचा।। १९२ ।।
श्री साईसच्चरित अध्याय २३

हे तत्व लक्षात घेऊन जे भक्ती करतात त्यांना गुरूप्रेम अवश्यमेव मिळते.

ह्या दृढ विश्वासानेच नारायणरावांनी आपल्या मित्राला वृश्चिकदंश झाल्यानंतर बाबांच्या छबीसमोर लावलेल्या उदबत्तीची रक्षा आयत्यावेळी उदी न सापडल्यामुळे ती उदीच आहे असे मानून लावली व साईनाममंत्राचा जप केला त्यायोगे त्यांची वेदना शमली.

नानासाहेब चांदोरकरांच्या कन्येला असह्य प्रसूतीव्यथा होत असता रामगीरबुवांच्या हस्ते उदी व आरती पाठवून तिचे क्लेश बाबांनी दूर केले.

कासवी जसे केवळ निजदृष्टीने आपल्या पिलांचे रक्षण करते त्याचप्रमाणे श्रद्धा व सबूरीने वागल्याने परमेश्वर भक्ताचे मनेप्सित पूर्ण करतो. वक्ता जरी साक्षात बृहस्पती असला तरी अंध व्यक्तिला हत्तीचे वर्णन ऐकवून त्याला हत्ती कसा दिसतो हे संपूर्णपणे साकारतेने कळविता येत नाही त्याचप्रमाणे श्रद्धा आणि सबूरीच्या विवेचनाबाबतही म्हणावेसे वाटते की ती प्रत्यक्ष अनुभवावीच लागते.

म्हणूनि श्रोत्यांस हीच प्रार्थना। करूनि साईप्रति वंदना।
आपणाचि आपुला अनुभव घ्यावा। इतुकेचि माना भव्दच।। २२ ।।
येथें नाहीं तर्काचे काम। पूज्यभाव व्हावा प्रकार ।
नलगे बुद्धिचापल्योक्रम। पाहिजे परम श्रद्धाळु।। २२९ ।।
श्रद्धाविहीन केवळ तार्किक। वादोन्मुख आणि चिकित्सक।
तमा न संत ज्ञान संम्यक। शुद्ध भाविक ते पाहिजे।। २२९ ।।
श्री साईसच्चरित अध्याय ३५

# श्रीबाबांचा लाडका सूरदास

— सौ. उषा अधिकारी
सावित्री सदन, बंदर रोड,
मु.पो. रत्नागिरी जि. सिंधुदुर्ग

श्रीबाबा शिरडीत आले. थोडे स्थीरस्थावर झाले. गोरगरिबांना मोफत औषधोपचार करू लागले. लोकांचे आजार बरे झाले. श्रीबाबांचे चमत्कार पाहून श्रीबाबा हे साधे हकीम नसून प्रत्यक्ष अवतार आहेत हे लोकांना पटू लागले. श्रीबाबांची कीर्ती दूरवर पसरू लागली. नाशिक जिल्ह्यात सिन्नर नजिक असलेल्या खेड्यात डोळ्यांची साथ आली. या साथीत खूप मुले माणसे सापडली पण लक्ष्मण आबाजी आवारे नावाचा एक मुलगा या साथीत सापडून त्याला जो त्रास झाला त्याला तोडच नाही. त्याच्या डोळ्यातून अखंड पाणी गळे. असह्य वेदनांनी तो व्याकुळ होई. त्याची आई गरीब बापडी. लोक सांगतील ती औषधे करीत होती पण उपयोग होत नव्हता. होता होता दिव्याचा व सूर्यप्रकाशही दिसेना. आता काय करावे! गरीब माऊलीला आपल्या एकुलत्या एक लेकराचे कसे होणार ही काळजी पडली. पण ज्या ईश्वराला दीनदुबळ्यांची काळजी आहे तो कुणाच्या तरी रूपाने योग्य सल्ला देतोच. एका गृहस्थाने त्या बाईला मुलाला घेऊन शिरडीस जायला सांगितले. ''सध्या शिरडीत एक अवलीया वास करून आहे, तो उत्तमप्रकारे औषधोपचार करतो किंवा त्याच्या उदीने आणि कृपा प्रसादाने कोणताही आजार बरा होतो तेव्हा प्रयत्न करायला काय हरकत आहे?'' असे तो म्हणाला. इतके उपाय झाले तेंव्हा हा पण करून पहावा म्हणून ती बाई आपल्या मुलासह शिरडीस आली. त्यावेळेला सभामंडपाचे काम सुरू होते. वार गुरूवार होता. श्रीबाबांचा दरबार गच्च भरून गेला होता. व्याकुळ झालेल्या मुलाने श्रीबाबांच्या परमकोमल पायावर डोळे टेकले. त्याच्या अंध डोळ्यातून श्रीबाबांच्या पायावर अश्रूंचा अभिषेक झाला. श्रीबाबांनी त्याचे मस्तक प्रेमाने थोपटले व अल्ला अच्छा करेगा म्हणून आशीर्वादही दिला. श्रीबाबांनी त्याच्या मस्तकावर हात ठेवताच त्याचा डोळ्याचा ठणका कमी झाला. पाणीही गळायचे थांबले. त्यामुळे भक्तीभावाने तो दर गुरूवारी शिरडीस जाऊ लागला आणि श्रीबाबांना 'आई' म्हणून हाक मारू लागला. मनापासून भक्ती सुरू झाल्याने त्याला प्रकाशाची थोडी तिरीपही दिसू लागली.

काही दिवस गेले आणि कुणीतरी त्याच्या आईच्या मनात विकल्प निर्माण केला. सदर गृहस्थ म्हणाला, ''अग वेडे, डॉक्टरकडे जायचं सोडून त्या फकिराच्या नादी कशाला लागलात? सहा महिने हा तिकडे जा ये करतोय. काही फरक आहे का? अग अशा नुसत्या दर्शनाने त्याचे डोळे बरे झाले असते तर या नगर जिल्ह्यातच नव्हे तर इतर ठिकाणीही कुणी आंधळे राहिले नसते. तेंव्हा तू त्या फकीराचा नाद सोड आणि मुंबईला जे.जे. हॉस्पिटलमध्ये नेऊन त्याला दाखव'' भोळ्या बाईला हे पटले. मुलाच्या मनात नसतानाही ती त्याला घेऊन जे.जे. हॉस्पिटलला गेली. ही दोघे जायला

निघाली तेंव्हा त्या मुलाच्या अंगावर मोठे मोठे फोड उठले. त्याला त्याच्या वेदना झाल्या आपण चुकतोय हे पटले पण आईपुढे त्याचे काही चालेना. मुकाट्याने तो डॉक्टरांना सामोरा गेला. त्यांनी एक तासभर त्याची कसून तपासणी केली पण याला कधीही दृष्टी येणार नाही असा निष्कर्ष सांगितला. मायमाऊलीला फार वाईट वाटले. मुलाला घेऊन ती घरी आली. लक्ष्मणाला मात्र काही वाटले नाही. त्याने मनाशी निश्चय केला की आता कुणी काही सांगितले तरी श्रीबाबांचे चरण सोडून कुठेही जायचे नाही. मग दृष्टी येवो अगर कायमची जावो. मनाशी निश्चय झाल्यावर अंमलात आणायला किती उशीर? तो आता एकटाच शिरडीत आला. सारखा श्रीबाबांच्या जवळपास राही. माधुकरी मागून त्यावर पोट भरी. श्रीबाबाही त्याला काहीना काही देत असत. आपले बाबा आपले परमदैवत आहे तेच आपल्याला बरे करतील आज ना उद्या आपणाला दिसू लागेल हा त्याचा विश्वास होता म्हणून तो बाबांच्या पुढे सावलीसारखा फिरे. बाबा, बाबा हा ध्यास त्याने घेतला होता. श्रीबाबांना आपण एकदा प्रत्यक्ष डोळे भरून कधी पाहू असे त्याला झाले होते. औषध काही नव्हते. एक बाबांचा अखंड सहवास आणि बाबांनी तोंड धुऊन पडलेले पाणी घेऊन डोळ्यांना लावणे हा उपाय चालू होता. एक महिना असे करताच थोडे थोडे दिसू लागले. आता तर श्रीबाबांवरचा विश्वास अधिकच वाढला. श्रीबाबा एक दिवसाआड चावडीत जात असत. एका सायंकाळी भक्तगण बरेच जमलेले होते त्यात लक्ष्मणही होता. श्रीबाबांनी त्याला पाहिले ते उठले त्याच्याजवळ गेले आणि त्याच्या छातीवर दोन्ही हातांनी जोरात थाप मारली. लोकांना बाबा हे काय करताहेत ते कळेना पण तो क्षण लक्ष्मणाच्या भाग्याचा होता. त्याचे सगळे जीवन उजळून टाकणारा होता. बाबांची थाप छातीवर पडली मात्र लक्ष्मणला स्वच्छ दिसू लागले. श्रीबाबांची मनोहारी, उंचीपुरी देखणी मूर्ती पहाताच त्याचा आनंद गगनात मावेना. अष्ट सात्विक भाव जागृत होऊन डोळ्यातून अखंड अश्रुधारा वाहू लागल्या. श्रीबाबांच्या परमकोमल चरणाला मिठी मारताच त्याला अखंड अपूर्व शांतीचा लाभ झाला. श्रीबाबांचा आशीर्वाद, त्यांची कृपा यामुळेच आपणाला दृष्टीचा लाभ झाला या विचाराने तो मनोमन बाबांना परमेश्वर मानू लागला.

त्याला दृष्टी आल्यावर लोकांनी पुन्हा आपल्या आईकडे जायचा सल्ला दिला पण त्याने तो मानला नाही. श्रीबाबाच आपली आई आहे, जीवनभरचा तोच एकमेव आधार आहे त्यांना सोडून कुठेही कधीही जाणार नाही असे त्याने निक्षून सांगितले. उलट दृष्टी आल्यावर पंपावर पाणी उपसायचे काम तो करू लागला. कुणीही काही काम सांगो हा कधीच नाही म्हणत नसे. श्रीबाबांच्या नावाने भक्तगण पार्सल पाठवीत त्यांची ने-आण करण्याचे काम तो आनंदाने करी. हे करताना तो कुणाचीही मदत घेत नसे. जे कुणी काही देईल त्यावर तो आपला उदरनिर्वाह करी. तो पूर्वी आंधळा असल्याने लोक त्याला सूरदास या नावाने हाक मारीत.

तो रोज भक्तीभावाने, श्रद्धेने श्रीबाबांची प्रार्थना करी. ही प्रार्थना करण्यात हेतु जरूर असे. पण तो काहीही न मागण्याचा. उलट मनात एवढेच म्हणायचे की असाच श्रीबाबांचा

नित्य सहवास लाभू दे आणि असेच प्रेम मिळावे ही मागणी असे.

सूरदास गरीब होता. साधा भोळा होता. श्रीबाबांच्या कृपेने दृष्टी आली तरी तो शेफारून गेला नाही. हलकीसलकी कामे त्याने हसतमुखाने केली. श्रीबाबा त्याची भक्ती जाणून होते. एकांतात तो आपली भजने आळवून म्हणतो हे श्रीबाबा जाणून होते. त्याचे कष्ट, त्याची वागणूक यावर श्रीबाबा खूष होते. त्यांची समाधी होईपर्यंत त्यांनी त्याला अपूर्व प्रेमाने सतत आपल्या सान्निध्यान ठेऊन परमेश्वराचा अखंड सहवास त्याला दिलाच त्यावर अकृत्रिम प्रेम केले आणि त्याला भक्तश्रेष्ठ मंडळींत वरच्या दर्जावर नेऊन बसवले. आणि 'माझा जो जाहला काया वाचा मनी तयाचा मी ऋणी सर्वकाळ' ही उक्ती सार्थ करून दाखवली. मला असं म्हणावसं वाटतं की —

"धन्य साईदास नित्य गीत गाई प्रभु साईराम प्रियतम आई
नितांत तयाची श्रद्धा जाणुनी प्रभु साई त्यासी जवळी घेई ॥

# बाबांची वीट

डॉ. सुमन खानवीलकर
बॉंबे पूना रोड
लोणावळा (पश्चिम)

वीट छोटासा शब्द आहे. पण त्याची महती मोठी आहे. अ हं! घाबरण्याचे कारण नाही. आपण पाहूया तर खरे कोणती कोणती महती आहे ती.

हे पहा एकवीत दीड वीत लांबी ६ ते ८ बोटे रूंद चार ते पाच बोटे उंचीची ही वस्तू साध्या माती पासून बनवलेली एका अडाणी कुंभाराने नंतर तिला जाळली भाताच्या कोंड्यात असा हिचा जन्म झालेला.

हिचा उपयोग, घरे, देवळे, तलाव थडगी समाधी बांधण्यासाठी केला जातो. हिच्यावर जेवणसुद्धा शिजवले जाते. स्वतः जळते पण दुसऱ्याला आश्रय देते. म्हणून काही बाबा तुम्ही हिला तुमच्या सहवासाचा लाभ दिलात. कारण तुमच्या सहवासाचा लाभ घेणारात हिचा मोठा वाटा आहे. रात्रभर झोपताना ती तुमच्या उशाशी असायची. बाबा काहो एवढे प्रेम करत होता. तुम्ही तिच्यावर सांगाल का मला?

अग वेडे पोरी ती माझी स्फूर्तीदायीनी होती. तिलाच विचार ती सांगेल तुला सारे!

काय तरीच काय बाबा सांगता. हे बघा हसलात असेच करता नेहमी. वीट आणि ती कधी कुणाशी बोलली आहे का?

बोलेल बेटा बोलेल विचारून तर पहा.

अग तुला काय वाटले मी बोलणार नाही. छे बाबांच्या सहवासात राहून मला इतकी शक्ती प्राप्त झाली नसती तर नवल! हे बघ बाराची आरती होतेना तेंव्हा बघ जाऊन द्वारकामाईत आरती सुरू झाली की इकडे घंटा नाद सुरू होतो नि लगेच तेथे असलेला कुत्रा वर तोंड करून भुंकू लागतो. कोणी सांगितले त्याला आरती सुरू झाली म्हणून पण बाबांना मानवंदना देत असतो तो. हो ग हो मीपण बरेच वेळा हे पाहिले आहे द्वारकामाईत.

हे बघ मला बाबांकडे येऊन बरीच वर्षे झाली. जन्म झाला कोणा कुंभाराकडे उद्धार झाला बाबांकडे. एका महात्म्याने मला हाता घेतली, आणि त्याचा शिष्य जो तुमचा आवडता त्याच्या अंगावर मला फेकली व त्याने मला जवळ केली त्याचा सहवास मी उपभोगत असतानाचा आनंद कसा सांगू? वर्णन करताच येत नाही मला. पण तुला एक गुपीत सांगते या मोठ्या देहापेक्षा माझ्या नावात फार मोठे रहस्य आहे. ते रहस्य सर्वांना माहित व्हावे यासाठी माझा साईनाथ सतत मला जवळ ठेवत असे.

इकडे बघ तुझे लक्ष बाबांकडे. मी बोलते ते नीट ऐक. वीट याचा दुसरा अर्थ असा की नकोसे होणे, नको नको वाटणे, मनाला कंटाळा येणे, एकाद्या गोष्टीची उबग येणे, कीळस येणे, डोळ्यासमोर नको वाटणे, मन तृप्त झाले तरी कधी परत परत घ्यावे लागते तेंव्हा कंटाळा येणे नको वाटणे आसक्ती सुटणे.

आता हा शब्द कुठे वापरला तर योग्य होईल? जीवन सुखी होईल? पाहूया तुम्ही या संसारी जीवनात इतके रमून गेला आहात की या शब्दाची तुम्हाला आठवणच नाही नि आठवण झाली तरी नको तेथे होते. संसाराच्या हावेमुळे संसारामुळे नव्हे माणूस परमार्थाला मुकतो संसारातल्या गोष्टीचा वीट येत नाही. वासनांचा वीट येत नाही. लोकनिंदा, व्यसन यांचा वीट येत नाही. त्यामुळे माणूस या संसारात अडकून पडतो. आणि परत परत जन्म मरणाच्या फेऱ्यांत अडकतो. जन्म मरणाच्या फेऱ्याचा सुद्धा वीट यायला पाहिजे तेंव्हाच माणूस तो चुकविण्यासाठी काय करायला हवे ते करू शकेल. पण माणसाला कथा कीर्तनाचा, नामस्मरणाचा, आदरातिथ्याचा, साधू संतांचा सत् संगतीचा वीट येतो पण लाचलुचपत, खोट्यानाट्या गोष्टी यांचा वीट येत नाही हे सारे माणसांचे जीणे बाबांनी पाहिले व या शब्दाची आठवण करून भक्तांना शहाणे करण्यापेक्षा आपल्या जवळ या नावाची वस्तू जवळ ठेवावी. तिला इतके जपावे की लोकांनी मला विचारावे. पण छे माणसच ती. संसारी सुख मागण्यात गुंग झालेली. शेवट पर्यंत याचा अर्थ काय कोणीच विचारले नाही. शेवटी मी फुटले. बाबा रडले का? अरे जीवानों बाबा विटेच्या तुकड्याच्या विरहाने रडले नाहीत रे ते तुमच्या अज्ञानी वृतीला रडले. त्यांच्या गुरूने दिली होती याचा अर्थ साईशाला षढरिपूचा वीट आहे. हे जगाला समजावे.

बाबा उषाला का घेऊन झोपत होते तुला ते तरी ऐकू दे मला

त्याचा अर्थ देहाचा मुख्य भाग डोके त्यात सर्वांना आज्ञा करणारे मेंदू बाबा. तेंव्हा त्याच्यात ठासून भरला पाहिजे संसारी मायेचा, षढरिपूचा वीट. येथे थोडीसुद्धा चलबिचल होता उपयोगाची नाही. अरे या संसारी जीवनाला इतके वीटा की संसारी जीवनातली कर्तव्ये निस्वार्थ बुद्धीने केली जातील अर्थात षढरिपूवर, मायेवर, वासनांवर विजय

मिळवाल त्या संसारातल्या मायेचा वीट उश्याला घेऊन प्रभूनाम स्मरणात निर्धास्त रहा.

वीट हा शब्द छोटा असला तरी तो तुम्हाला परमेश्वरापर्यंत नेवून पोचवू शकणारा आहे. मी लहान तोंडी मोठा घास घेऊन तुम्हां माणसांना सांगू शकले. कारण त्या महात्म्याचा सहवास, सहवासामुळे मला सारे मानू लागले नि जपणूक होऊ लागली, व आज तू मला इतक्या आदराने विचारपूस करत आहेस, तेंव्हा सर्वांनी संतसंगात रहावे.

याचे उदाहरण देवळाच्या पायरीला म्हणजे त्या दगडाला नमस्कार करतात मग देवाला नमस्कार करतात, तुळस साधे छोटेसे झाड पण त्याची पूजा करून नमस्कार करतात, कारण देवाची आवडती, धूळ जी कधी वाऱ्याने उडाली तरी झटकून टाकतो. तीचाच अंश संतांच्या चरणकमलाचे रज ते भाळी लावतो. अभिषेक केलेले पाणी तीर्थ म्हणून सन्माननीय होते. असा आहे सहवासाचा परिणाम. तेंव्हा प्रत्येकाने आयुष्याचे सार्थक करण्यासाठी नेहमी सत्संगती धरावी की आपोआप संसारी जीवनाचा या अशाश्वत जगाचा वीट येतो नि आपल्या जन्माचे सार्थक होते.

खरे आहे बाई तुझे म्हणणे पटले ग पण कळत नाहीं पण प्रयत्न जरूर करणार. बाबा तुम्ही कधीही बघा हासता. बाबा वीटेला इतके ज्ञान, भाग्य दिलेत. तेंव्हा आम्ही तुमच्या लेकरांनी काय करावे ही माया तर फारच सतावते बघा.

अग तुम्हाला माझ्याकडे यायचे म्हणजे परब्रह्माकडे यायचे ना मग प्रथम स्वार्थाचा वीट येऊ द्या, ते षढरिपू, वाईट विचारांचा, अहंपणाचा, संसारी प्रेमाचा, हावेचा वीट येऊ द्या. दुर्वासनांचा वीट येऊ द्या मग आपोआप तुम्ही साईचे व्हाल तुमचे मन या साऱ्या संसारी विश्वाला वीटले कीं आपोआप तुमचा देह, मन शुद्ध होऊ लागेल मनाला शांती मिळेल आणि खऱ्या सुखाची आस उत्पन्न होईल.

बाबा किती प्रेमळ आहांत तुम्ही. खरंच दयेचा सागर तुम्हाला ते योग्यच आहे. तुमचे व्हायचे तर काही गोष्टींचा त्याग करायला हवा व काही गोष्टी स्वीकारायला पाहिजेत. पटले नाथा तुमच्या कृपेचा हात असाच सदा डोक्यावर असू दे. ॐ शांती ॐ शांती ॐ शांती श्री सद्‌गुरू साईनाथाय नमः

ठेवा आता शीरी माझ्या कृपेचा करपंजर<br>
शोक चिंता निवारावी सुमन ही तव कींकर

प.पू. श्री. दासगणू यांचे कवित्व आहे —

## बाबांची वीट

बाबा तुमची ती वीट<br>
मार्ग दावीते हो नीट<br>
भक्तां करिते हो धीट<br>
आणीते की हो संसाराचा वीट<br>
काढीते जन्मजन्मांतरीचा कीट<br>
चुकवीते जन्ममरणाची किट कीट<br>
चाल म्हणते परमार्थाची वाट<br>
म्हणे श्रद्धा सबूरीचा हात धर तू नीट<br>
सांग अनाठायी करू नको वटवट<br>
भक्ती रस तू पिवूनी घे नीट<br>
सुमनचा मार्ग केला तिने नीट<br>
षढरिपूचा आलासे वीट<br>
साईनाथा पापाची होऊ दे घट<br>
मुखी लाव आत्मानंदाचा घट

# श्री गुरुपुजा

**शालिनी देसाई**
२१ राजस, ना.सी. फडके मार्ग,
अंधेरी मुंबई.

***उच्च विद्याविभूषित आणि अध्यात्मवादी लेखिका शालिनी देसाई यांनी हा लेख गुरुपौर्णिमा खास अंकाकरिता पाठविला खरा परंतु तो आम्हांस बऱ्याच उशिरा हाती मिळाला. विषयाचे महत्व जाणून तो या अंकी प्रकाशित करीत आहोत. — का.सं.***

आषाढ शुक्ल १५ ही व्यासपौर्णिमा, गुरुपौर्णिमा म्हणून मानली जाते. ज्यांच्यामुळे आजच्या या दिवसाला महत्व आहे त्या व्यास ऋषींच्या महतीचे आपण प्रथम थोडेसे ओझरते दर्शन घेऊ. आजचे जे वैदिक तत्वज्ञान आपण ऐकतो त्याचे मूलाधार गुरु म्हणून व्यासांना मान दिला जातो.

वेद हे कांही अक्षर वाङ्मय किंवा लिखित ग्रंथ म्हणून निर्माण झालेले नव्हते. ती अतिप्राचीन अपौरूषेय परमेश्वरी निःश्वसिते या विश्वांत नादब्रह्म म्हणून प्रतीत झाली आणि वेदाचा हा अमर्याद अतिप्राचीन नाद कित्येक कोटी वर्षे तसाच झंकारत होता. त्या नादातील प्रणवाच्या आधारे जप सामर्थ्याने ब्रह्मदेवांनी सृष्टि निर्माण केली प्रणव शक्तितून साकारला गेलेला सर्वोत्कृष्ट अविकृत प्राणी तो मानव म्हणूनच तो आपल्या उगमाचा प्रणवाचा आणि त्यायोगे प्राणाना सामर्थ्य देणाऱ्या त्या परमेश्वरी प्राण शक्तिचा विचार करीत त्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करू लागला. प्रणवाचा वेध घेणाऱ्या या मानवामधून स्वप्रयत्नाने स्वतःच्या सूक्ष्मतेच्या अत्युच्चतेवर अधिष्ठित होऊन त्या वेदनादाचा प्रत्यय घेणारा ऋषींचा समुदाय पृथ्वीवर केवळ उपकार करण्यासाठीच जणु अवतरला. ते वेदमंत्राचे द्रष्टे झाले; त्यांनी त्या नादाना अक्षरांच्या आणि तेथून पुढे भाषेच्या रूपात साकारले. सामान्य माणसाची बुद्धि या अति उच्चतम अवस्थेपर्यंत पोहोचु शकत नाही. त्यामुळे लोक तसेच अतृप्त राहून विश्वातील सर्वोच्च आनंदाला पारखे न व्हावेत या कल्याणकारी विचार करणाऱ्या आणि त्याप्रमाणे आचरण करणाऱ्या त्या महान् मन्त्रद्रष्ट्या ऋषींनी त्या नाद ब्रह्माला अक्षर, छंद, अर्थ आणि मन्त्र यात बद्ध केले. त्या मध्ये कधीही, कोणत्याही काळी आणि स्थळी जराही बदल होणार नाही, याची दक्षता घेतली म्हणून या मौल्यवान वैदिक वाङ्मयाचे श्रेष्ठत्व आणि ताजेपणा आजही अबाधित आहे. ज्या वेदांचे फलित म्हणजेच विश्वोत्पत्ति ते वेद म्हणजे ज्ञान अमर्याद आहे. या अमृतस्वरूपी वाङ्मयाचा अभ्यास करण्यासाठी अनेक ऋषीमुनींनी आपल्या आयुष्याचे, तपस्येचे आणि प्रदीर्घ प्रयत्नांचे प्रदान केले. वेदांना श्रुति या नावाने संबोधले जाते कारण जे श्रुत झाले (ऐकले गेले) ते तसेच्या तसे पुन्हा श्रुत केले गेले आणि यासाठी शुद्ध आचार, विचार, उच्चारण असणाऱ्या तपस्व्यांची मालिकाच निर्माण झाली. या 'ईश्वरनिष्ठांच्या

मांदियाळी'ने वेदांच्या विशालतेचे दर्शन सर्वांना घडविण्याचा जीवापाड यत्न केला. यांतील सर्वप्रथम गुरूमालिका म्हणजे ब्रह्मदेव-वसिष्ठ-शक्ति-पराशर-व्यास ही होय या गुरू-शिष्य संप्रदायाला ब्रह्म संप्रदाय असे म्हणतात. महर्षी व्यासांनी अध्ययन सुलभ व्हावे व सहजतेने वेदाचा अभ्यास करणे सोपे जावे म्हणून वेदांचे चार भाग करून आपल्या समर्थ शिष्यांना एकेक भाग देऊन त्याचे अध्ययन, मनन आणि आचार करण्याची अनुज्ञा दिली. ती विभागणी अशी ऋग्वेद-पैल, यजुर्वेद-वैशंपायन, सामवेद-जेमिनी आणि अथर्ववेद-सुमन्तु त्यामुळे वेदवाङ्मयाचा प्रसार अधिक जलद गतीने झाला. या तेजोमय गुरुपरंपरेला कारण ऋतंभरा प्रज्ञेचा प्रकाश असलेले तसेच भगवान नारायण आणि ब्रह्मदेव यांच्यापासून मिळालेल्या अथांग प्रज्ञा शक्तीचे प्रभुत्व असलेले गुरुदेव महर्षी व्यास होत. श्री. व्यासांना 'अचतुर्वदनो ब्रह्मा', 'अभाललोचनः शंभु', भगवान बादरायणः अशी विशेषणे त्यांच्या ईश्वरतुल्य तपस्येमुळेच त्यांच्याशी निगडित आहेत.

ज्याप्रमाणे वेद हे परमेश्वराची उच्छ्वसिते मानले जातात ('हा वेदांचा सागरु। जया निद्रिताचा घोरू' ज्ञाने.) त्याप्रमाणे सर्व प्रकट असलेले अक्षर वाङ्मय श्री व्यासगुरूंचे उच्छिष्ट मानले जाते. याचे कारण अथांग ज्ञानसागरात पोहणाऱ्या त्या व्यासऋषींचे गुरूसामर्थ्य आणि म्हणूनच पूर्णत्व प्राप्त झालेल्या आणि पूर्णत्वाचं दर्शन गुरूपरंपरेपासून घडवणाऱ्या व्यासऋषींना गुरूपौर्णिमेला सर्वप्रथम वन्दन केलं जातं.

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविंदायतपत्रनेत्र।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वलितो ज्ञानमयः प्रदीपः॥'

व्यासांनी लावलेल्या नंदादीपाने अनेक दीप लावले गेले, अनेक संप्रदाय निर्माण झाले. वेदांच्या शाखा उपशाखांचा अत्यंत काटेकोरपणे सांगोपांग अभ्यास करून 'धर्मस्य तत्वं निहितं गुहायाम्' असे गुह्य ज्ञान जगाच्या समोर मांडण्याचा अनेक तपस्व्यांनी प्रयत्न केला. त्यांची तर एक न संपणारी प्रदीर्घ मालिकाच होईल त्या सर्व गुरूशिष्य परिवारांनी या अभ्यासाला वाहूनच घेतले.

श्रुतितील विखुरलेल्या तत्वांचे एकीकरण करून त्यांना संकलित करून जी सूत्रे ग्रथित केली गेली त्यांना व्याससूत्रे किंवा 'ब्रह्मसूत्रे' म्हटले जाते आणि त्यानंतर रामायण महाभारत व निरनिराळी पुराणे, तत्वज्ञानाचे गूढ सहजतेने सर्वानांच खुले व्हावे म्हणून, अधिकतर सोप्या शब्दांत रचिली गेली. या ग्रंथांना 'स्मृति' असे म्हटले जाते. स्मृति म्हणजे स्मरण आयुष्याच्या अन्तापर्यंत काय स्मरणात ठेवायचे? 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा' हे अर्जुनाचे कृतकृत्य होऊन उमटलेले गीतेतील उद्गार आपणाला आज काय सांगत आहेत? कसले स्मरण करून देत आहेत? याचा सूक्ष्म विचार करताच लक्षात येईल 'मी कोण?' या प्रश्नाचे पहिले उत्तर 'मी देह नव्हे' याचे पक्के स्मरण किंवा स्मृति! ज्या उत्तराचा पूर्वार्ध म्हणजे स्मरण झाल्यावर 'स्थितोस्मि गतसंदेहः हा उत्तरार्ध गुरूकृपेमुळेच अनुभवास येतो. श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ महाभारतात भीष्मपर्वात (अध्याय २५-४२) उपाख्यान म्हणून आलेला असल्यामुळे स्मृतिग्रंथात मोडतो पण या ग्रंथाला त्याच्या आंगिक गुणांमुळे श्रुतीतील उपनिषदांच्या बरोबरीचे स्थान यास आहे. कारण यांत अर्जुनाचे

गुरुपद साक्षात् भगवान् श्रीकृष्णांनी भूषविलेले आहे. श्रुतीतील ज्ञानदर्शक उपनिषदे (वेदान्त), ब्रह्मसूत्रे आणि भगवद्‌गीता ह्या तीन मोक्षसंपादक सर्वोत्कृष्ट ग्रंथांना 'प्रस्थानत्रयी' अशी अन्वर्थक संज्ञा त्यातील तेजोमय गुरुवाणीमुळेच प्राप्त झाली आहे. या प्रस्थानत्रयीवर युगानुयुगे गुरू-शिष्य परंपरेच्या परंपरा काम करताहेत आणि नित्य नविन आत्मानुभूति ची ओळख आपल्या रसधारी वाङ्‌मयातून करून देण्याचा प्रयत्न करीत आहेत ज्यानी ज्यानी हे वैदिक ज्ञान पृथ्वीच्या कोनाकोपऱ्यांपर्यंत प्रसारित करण्याचा यत्न केला त्यातील श्री शंकराचार्य हे एक होत. श्री वेदव्यासांइतकेच भारताचे हे भाष्यकार ('भाष्यकारातें वाट पुसतु' — ज्ञानेश्वरी) पूज्य आहेत त्यामुळे सहसा गुरुपौर्णिमेच्या दिवशी महाभारतकर्ते भगवान श्रीव्यासाचे स्मरण केल्यावर पूजेच्या वेळेच्या संकल्पात 'श्रीकृष्णव्यासभाष्यकाराणां सपरिवाराणां' पूजनं करिष्ये असा संकल्प करण्याची प्रथा आहे.

ज्या नादब्रह्मातून सर्वज्ञतेच्या अथांग सागर लहरी उसळल्या अनेक उत्पत्ति झाली त्याची सुरूवात कोठून? ब्रह्मसूत्रातील 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' या पहिल्याच ब्रह्म सूत्रातील पहिलाच शब्द 'अथ' यावरच अनेक ग्रंथ निर्माण झाले. ऋग्वेदांतील दहाव्या मंडळातील नासदीय सूक्तही असेच अभ्यास करण्यासारखे, चिन्तन करून सूक्ष्मतेचा विवेक करण्यासारखे परिपोषक आहे खरे. परंतु 'जे साधने साधिता न ये। अभ्यासें अभ्यासितां न ये।' — ज्ञाने. ही ब्रह्म जिज्ञासेची तृप्ति केवळ गुरुकृपेनेच होत असते तो प्रत्यक्ष अनुभव असतो. जेथून प्रश्न उठतो तेथेच त्याचे उत्तर प्रतिष्ठित असते, आणि शेवटी त्यातच त्याचा लय होऊन स्तब्धता येऊन अखेरीस आपणच सर्वत्र कसे भरून उरलो आहोत ही प्रतीति येते. या प्रतीतिची प्रचिती करून देणारा जो गुरुसंप्रदाय या काळाच्या ओघांत उदय पावला तो नाथ संप्रदाय. न+अथ ते नाथ ज्याला आरंभ नाही प्रारभ शोधायला जाताच शोध संपतो मनाचा पूर्णपणे विलय होतो अशा केवळ ज्ञानी तपस्व्यांच्या सान्निध्यानेच ज्ञानदर्शन घडतेअशा नाथसंप्रदायाचे मूळ गुरु म्हणजे प्रत्यक्ष दत्तात्रेय ज्यांचे गुरु आदिनाथ शीव ज्यांच्या डमरूतील प्रणव ध्वनीतून अनंत कोटी ब्रह्मांडे उद्‌भूत झाली ज्या शीवाचे स्वरूप पहाण्याच्या प्रयत्नांतच जीव-शीव तादात्म्य होते ते अतीव गुह्य शीव तत्वज्ञानाची ओळख श्रीदत्तात्रेयांनी नाथपंथाकरवी समाजाला करून दिली.

महाराष्ट्रात हा नाथसंप्रदाय अत्यंत प्रिय ठरला याचे कारण ज्ञानेश्वरांनी ते गुह्य भांडार प्राकृत बोली भाषेच्या किल्लीने अगदी सरळ सरळ प्रतिज्ञेवर "हेच ते खरे हिरे होत अस जणु अननुभवी व्यक्तिला सांगावे तसे उघडपणे सांगून मोकळे झाले. असे 'उघड सत्य' जाणायला लावायला ज्ञानेश्वरांची प्राज्ञा होती याला कारण निवृत्तिनाथ गहनीनाथ या नाथसंप्रदायाची प्रचंड प्रज्ञाशक्ति त्यांच्यात उतरली होती त्यात निर्भयता होती अशा ओजस्वी नाथांचे मूल गुरु भगवान श्री दत्तात्रेय असल्यामुळे कोणत्याही गुरुचे पूजन हे श्री दत्तात्रेयाचेच पूजन समजून गुरुपौर्णिमेला त्याचेच पूजन केले जाते. भक्तश्रेष्ठ नारदानीही दत्तात्रेयाची स्तुती गुरुभावाने केलेली सर्वज्ञातच आहे. श्रीगुरूपूजेचे वैदिक मन्त्र 'ॐ यो नो' अग्ने....' वगैरे न म्हणता केवळ गुरुचरित्रान्तर्गत गुरुगीतेतील ध्यानमन्त्र

ॐ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः। गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥

सर्वत्र म्हटले जातात आसेतुहिमाचल गुरुपरंपरेतील गुरुपूजनाचा हा आद्यमंत्र समजला जातो. गुरुपूजनाचे वेळी गुरुस्थानी असलेल्या व्यक्तिचा गुरुपदेश घेतलेला असल्यास त्या जिवंत व्यक्तिची आणि दिवंगत असल्यास त्यांच्या प्रतीमांची वा पादुकांची पूजा करतात. ज्यांनी गुरुपदेश घेतलेला नसेल ते श्री दत्तात्रेयांना गुरु मानून गुरुमार्गासाठी दर्शनकृपा व्हावी म्हणून प्रार्थना करीतात. महाराष्ट्रात दत्तसंप्रदाय अतिप्रिय ठरण्याचे प्रमुख कारण निरलस, विनम्र, सेवाभाव ही शिष्यांची लक्षणे. गुरुवर प्रचंड प्रेम. 'नको ब्रह्मज्ञान। तू देव मी भक्त ऐसे करी गा देवा। असा रोख ठोक बाणा असलेल्या संतमंडळींचा प्रभाव. 'मना सज्जना भक्ती पंथेची जावे' म्हणून दाखवण्यात आलेल्या 'धोपट मार्गाची वहिवाट' असणारी सरळ साधी भोळी मराठी वृत्ति त्यामुळे गुरुभक्तिचे बीज येथे सहजपणे पेरले गेले आणि त्याचा 'वेलु गगनावरी' चढला. गुरुचा शब्द हेच वेदवचन अशी गुरुआज्ञेची व्रतं संभाळणाऱ्या केवळ भक्तिनेच ज्ञानांकित होणाऱ्या भाविकासाठी पुन्हा एकदा श्रीदत्तगुरु 'नाथ' होऊन अवतरले आणि हे निधर्मी नाथ साईनाथ. ज्यांनी केवळ इशाऱ्याने दूरदूरवरच्या आपल्या 'चिडिया' खेचून आणल्या. त्या प्रेममय करुणामूर्तींच्या सान्निध्यातच शिक्षित, अशिक्षित, सु/अ संस्कृत, सर्व धर्मीय, नाना वृत्तीचे लोक हेलावले. त्यांच्या अमृततुल्य प्रेमवाणीने तर कधी शिव्याशापाने त्या त्या वृत्तीनुसार असणाऱ्या भक्तगणाचे कल्याण केले. ज्या गुरुमध्ये ब्रह्मा विष्णु महेश या तिन्हीचे एकत्वाने दर्शन होते ते परब्रह्म आपले गुरू होत अशी अढळ निष्ठा असेल तरच आपणाला निश्चित मार्ग दिसू शकतो. निष्ठा आणि सबुरी ही साईबाबांनी भक्तांना दिलेली आयुष्याच्या प्रवासातील फार मोठी कधीहीं न संपणारी शिदोरी आहे. ही शिदोरी ज्याच्याकडे असेल, त्याला वेगळी दिक्षाच नको. श्रीगुरुदेवांची कृपा आणि शिष्याची पूर्ण श्रद्धा या दोन्हींचा पवित्र संगम म्हणजेच दीक्षा. साधकाची उपासना कोणत्याही देवतेची असो त्या देवतेची ओळख साधकाला सहजपणे होत नाही. त्यासाठी त्याला गुरुप्राप्ती व्हावी लागते. अर्थात् गुरु शोधून आपल्याला आवडेल त्याप्रमाणे मान्य करणे हे सद्गुरुंचे चिन्ह नव्हे तर श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात 'ऐसी कर्मसाम्यदशा। होय जेथ वीरेशा। तेथ सद्गुरु आपैसा। भेटेचि गा (ज्ञाने. १८।९६६) गुरुची भेट होण्याइतकी शिष्याची किंवा साधकाची तयारी असावी लागते. साधकाच्या तयारीशिवाय गुरुची भेट होत नाही. गुरुची भेट होण्यासाठी कर्मसाम्य दशा यावी लागते. एकदा साधकाने गुरुमार्गाचा अवलंब केला की त्याची आणि गुरुची आपोआप भेट होते. त्या भेटीबरोबर साधकाच्या बुद्धीचा मळवटा धुवून टाकून गुरु आपल्या शिष्याला गुरुपदवीला आणतात.

या मनुष्य शरीरात कोणी पशु-योनीतून आलेला असतो तर कोणी देव-योनीतून कोणी पूर्वजन्मामध्ये साधना संपन्न होऊन आलेला असतो तर कोणी नरक भोगून आलेला असतो. कुणाचं मन सुप्त तर कुणाच जागृत अशा स्थितीतील सगळ्यांना एकच मंत्र, एकच देवता किंवा एकच ध्यान पचनी पडू शकत नाही. सिद्ध, साधक, मंत्र आणि देवतांमध्ये एकच परमेश्वरी रूप प्रकट आहे. हे जरी खरे असले तरी ज्याच्या त्याच्या

हृदयात ज्या ज्या देवता आणि मंत्ररूपांची स्फूर्ति सहजतेने वास करीत असेल तर त्या भक्ताला त्या रूपाची स्फूर्ति देऊन ती शक्ति कार्यान्वित करणे हा दीक्षेचा हेतू असतो. या दीक्षेने भक्तांना अधिकारी बनवले जाते तो पुढे तीच परंपरा चालवतो. दीक्षा हजार वेळा दिली जात नाही. एक वेळ रस्ता पकडला की पुढचं ठिकाण आपोआपच मिळत जातं. शिष्यांच्या अधिकार पात्रतेच्या भिन्नतेनुसार मंत्र आणि देवतांचा भेद असतो. रोग निर्णयाविना औषध जसे उपयोगी नाही तसे साधकांच्या पात्रतेनुरूपच मंत्र देणे योग्य असते. श्रीसाईनाथांनी कुणा हटवादी वृद्धेला मंत्रच मुळी दिला नाही तर कुणा स्त्रीला हळू "राजाराम राजाराम" म्हण, असे सांगितले तर दाभोलकरांना केवळ ताकाचा प्याला लावून आधीच साईचरित्राची नांदी करून ठेवली. पण सर्वप्रकारच्या साधकांना लागू पडेल असा साईंनी दिलेला मंत्र म्हणजे 'निष्ठा आणि सबुरी' गुरुस्थानी असलेल्या ब्रह्मदेवांनी आपल्या तीन प्रकारच्या अपत्यतुल्य शिष्यवर्गालाही असाच एकाक्षरी मंत्र 'द' हा देऊन त्याना त्यावर १२ वर्षे तप करून मग भेटा असे सांगितले. जेंव्हा बारा वर्षे मनन चिन्तन तप करून ते तिघे परतले आणि गुरुदेवांना नमस्कार करून सर्वही एकमुखाने म्हणाले, "भगवन् आम्ही समजलो आम्ही आपल्या मंत्राक्षराच्या सामर्थ्याने कृतार्थ झालो आहोत. तेव्हा ब्रह्मदेवाने प्रथम देवांना विचारले, "देव हो, 'द' याचा अर्थ तुम्हाला काय समजला?" तसे देव म्हणाले, 'प्रभु तुम्ही 'द' मधून आम्हाला दमन करायला शिकवले. आम्ही सारे स्वर्ग सुखाच्या अतिरेकाने केवळ भोगी झाल्यामुळे परमेश्वरी तत्वापासून दुरावलो होतो. दमन हे इंद्रियसुखाला काबूत ठेवते त्यामुळे मनाचे शमन होऊन शाश्वत सुखाची शांती आम्ही अनुभवत आहोत. ब्रह्मदेवांनी नंतर दानवांना 'द' विषयी विचारले असता ते म्हणाले, "भगवन् आपण आम्हाला अगदी योग्य तोच मंत्र बहाल केलात. आमच्यात तामसी वृत्तीमुळे क्रौर्य फोफावले होते आम्ही आपल्या 'द' मंत्राक्षरातून द चा अर्थ दया समजलो. निरपराध जीवांचे बळी होण्यातच आमचे आयुष्य संपत होते. तुमच्यामुळे आम्हाला सुधारता आले आमच्यात जे नव्हते ते मिळाले. भगवन् आपल्या दयेने आम्ही सुखरूप झालो आहोत." त्यानंतर ब्रह्मदेवांनी मानवाला विचारले "मनुजा तुला काय कळले?" प्रणाम करीत मानव वदला, "गुरुदेव 'द' ने मला दानाचे महत्व समजले. अन्नदान, श्रमदान, धनदान, विद्यादान जे जे आपल्याला दुसऱ्याला देता येईल ते द्यावे आणि तसे करीत असताना घेणाऱ्याच्या मुखावरील प्रसन्नतेच्या प्रतिसादातच भगवन् आपलं दर्शन घडलं!" ब्रह्मदेवांना आपण दिलेला मंत्र सार्थकी लागलेला पाहून आनंद झाला त्यांनी सर्वांना ती परंपरा चालवायला सांगून ते स्वस्थानी निघून गेले. यावरूनच मंत्र एकच असला तरी शिष्याची ग्रहण शक्ति वेगवेगळी असते ती कार्यान्वित योग्य मार्गानेच व्हावी याची जबाबदारी गुरुवरच असते. भगवान श्री गुरुदेव दत्त यांचे महत्वही हेच आहे ते स्वतः अत्रिऋषींना ब्रह्मा विष्णु महेशानी दिले गेलेले वरदानच होय. न संपणाऱ्या दानाचा ओघ अव्याहतपणे सतत गुरु द्वारा चालूच असतो. त्यातूनच अनेक सन्त, महात्मे व त्या त्या जीवनकार्यानुसार अनेक संप्रदाय निर्माण होत असतात आणि हा स्त्रोत अखंड आहे. ज्या नंदादीपाच्या प्रकाशात

आम्ही बसतो तो कुणी, केव्हा कसा लावला हे आम्हाला माहित असतेच असे नाही पण दुसरा दीप प्रज्वलित करण्यासाठी आपणही तयारी करू हा निर्धार असला तरी चालण्यासारखे असते.

'वेद अनंत बोलला। परि अर्थ इतुकाचि साधला' असे श्री तुकाराम महाराज म्हणतात. कारण वेद समजण्यासाठी करावी लागणारी तपस्या सर्वा अंगी सारखीच असु शकत नाही म्हणून अशा वेळी गुरूवर्य काय करतात? तर तो बोध प्रिय शिष्यांना व्हावा यासाठी वेदाचं सार काढून हाती देतात सर्व संत शुद्धात्म्यांनी सर्वसामान्य समाजाला जे तत्वज्ञानाचं रहस्य करतलामलाकाप्रमाणे हाती आणून दिलं ते म्हणजे परमेश्वराचं नामस्मरण. श्री साईबाबांनीही शामाला ब्रह्मकर्माची खटपट करायला न लावता विष्णु सहस्त्रनाम मुखोद्गत करायला लावले. श्री ज्ञानदेवांनी सर्वसामान्य लोकांसाठी हरिपाठ सांगून 'राम कृष्ण हरी' हा सोपा मंत्र जपायला आवाहन केले. जेथे तीव्र ज्ञानपिपासा नसते पण भक्तिची पराकाष्ठा असते ते सर्व सहजतेने अशा गुरू मंत्राने तरतात. याला पाठिंबा म्हणून सहज सुचलेली गोष्ट अशी- एक महान् अत्यंत विद्वान थोर गुरु होते ते वेदाचे सर्वसंपन्न अधिकारी होते त्यामुळे त्यांच्याकडे येणारा ब्रह्मवृन्द जिज्ञासु असे. एके दिवशी कुणी एक कुणबी येथे काय चालले असावे म्हणून डोकावून पाहू लागला तसे ते गुरूदेव म्हणाले, 'काय हवे रे तुला?' तो बिचारा कुणबी म्हणाला, "देवानु, मला पण एक सबुद द्या की!" गुरू दिङ्मुख झाले. सहजतेने त्यांच्या मुखातुन उद्गार आले, "चल चल तर" तेच शब्द एकनिष्ठेने पाठ करीत तो कुणबी निघून गेला. कालांतराने आणि कर्मधर्मसंयोगाने त्या गुरूदेवाची मिरवणूक जन्मोत्सवासाठी जेव्हा एका गावी आली त्यावेळी तेथे त्या कुणब्याने आपल्या गुरूदेवांना पाहिले आपल्या सर्व शिष्यसंप्रदायाला घेऊन गुरूजींना नमस्कार करण्यासाठी आला. गुरूजींना त्यावेळी तेथील ओढ्यापलिकडे असलेल्या मंदिरात प्रवचनाला जायचं होतं पण एकाएकी ओढ्यावरचा बांध मोडकळीस आल्यामुळे तो पाण्याच्या ओघानं वाहून गेला. गुरूजी व त्यांचा शिष्यगण विचारात असताच कुणब्यानं त्यांना प्रणिपात केला तेंव्हा ते म्हणाले, "अरे आता तुझा नमस्कार काय तो राहू दे बाजुला मी आता पलिकडे कसा जाऊ ते आधी चटकन् सांग पाहू!" त्या निष्ठावन्त कुणब्यानं गुरुला पुन्हा एकदा मनोमन नमस्कार केला आपली घोंगडी काढून त्यावर गुरूदेवांना बसवून आपण पुढे बसला आणि त्यांनीच दिलेला तो 'सबुद' (मंत्र) म्हटला, "चल चल तर" आणि गुरूदेवांनाच त्यानं पैलतीराला पोहोचवलं! गुरूदेवांच्या डोळ्यांत कृतकृत्यतेचे आनंदाश्रू उभे राहिले. त्यांनी त्या शिष्याला प्रेमभावाने आलिंगन देत ते आपल्या शिष्याला म्हणाले, "पहा रे पहा गुरूला पार करणारा गुरुमय झालेला हा भक्त पहा जेंव्हा तुम्ही सहजतेने देता तेंव्हां हजारोपटीने ते तुम्हाला परत कसं मिळतं पहा. परमेश्वरी रूप ते हेच!" त्या ब्रह्मवृन्द शिष्यपरीवाराने गुरुंच्या आदेशाने त्या भक्ताचे पाय धरले. त्या गुरुप्रेमी निष्ठावंत भक्ताला काही समजत नव्हते आपल्याला गुरूदेवांची सेवा करायचं भाग्य मिळालं यातच त्याला अतीव समाधान होतं. गुरूनी आपणाला असं कसं निमित्तमात्र बनवलं याचच त्याला आश्चर्य वाटत होतं

त्यानं गुरूदेवांना लोटांगण घातलं आणि तो स्फुंदत म्हणाला, 'महाराज, मला तुमचं प्रेम द्या आणि काही नको!'' गुरूप्रेमाच्या सामर्थ्यानं आणि निष्ठेनच अंतीम उच्च गुरूतत्व उमगलं होतं.

भक्ति, ज्ञान आणि कर्म यांच्या त्रिविध वाटा आहेत आयुष्याच्या प्रवासात जेथून आपण वाटचाल करीत आहोत, जी आपणाला धार्जिणी असेल तीच धरावी. प्रिय वाटणारा मार्ग आणि श्रयस्कर असणारा मार्ग विवेकाने पहायचा असतो. साईबाबांनी दिलेली 'निष्ठा आणि सबुरी'ची शिदोरी घेऊन मी चालत होते. ती कठीण खडतर वाट खाच खळगे पाहिले पण शिदोरी सोडली नाही. आणि अचानक बाबांच्या कृपेने मला मिळाली ती 'अक्रम विज्ञानाची लिफ्ट' बाबांच्याच आदेशाने मला मोक्षमार्गी गुरू लाभले ते दादा भगवान त्यांच्याबद्दल आता मी येथे काहीच लिहीत नाही. कारण जे गुरु मला मोक्षदायी वाटतात ते सर्वनांच वाटतील असे नाही पण इतके मात्र खरे की सद्गुरू साई भक्तिमुळेच मला हितकारी गुरूदेव भेटले. मला समजलेलं साईतत्व (गुरूतत्व) सर्वांना समजावं म्हणून प्रथम साईप्रेरणेने गुरूदेवांना वन्दन करून ते बोधामृताचं तीर्थ सर्वांना विशेषतः साईप्रेमींना वाटायचा प्रयत्न करून पाहीन.

'अम्बालाल' गुरू नौमि। 'पटेल' नाम विश्रुतम्
येषां चरण सान्निध्यात्। जीवा मुक्ता भवन्ति हि॥

'समिध् हस्तम् गुरू गच्छेत्' या न्यायाने बाबांच्या लाडक्या साईलीला वाचक वर्गाला गुरूतत्वाचा परिचय करून देण्याचं मी साहस करणं म्हणजेच मुळी एक साईलीला!

बाबांनी आपणा सर्वांना दोन पैसे दिलेले आहेत ज्यांच्याकडे आहेत ते भाग्यवान, ज्यांनी हरवले ते प्रथम मिळवा पाहू अगोदर. माझ्याकडचे हे २ निष्ठा आणि सबूरीचे पैसे काढून घेण्याचा, कोणी हिसकावून घेण्याचा तर कोणी गोडीगुलाबीने फसवून, माझ्या हातून घेण्याचा प्रयत्न अनेक वेळी अनेक जणांनी केला हीच तर बाबांनी घेतलेली कसोटी होती सर्वांना गुंगारा कसा काय द्यायचा? ''बाबा, हे तर मोठं विक्षिप्तच काम म्हणायचं?'' ''माझे साधे २ पैसे तुला संभाळता येत नसतील तर चैतन्यस्वरूप जिवन्त गुरुंनी दिलेली करोडो रूपयांहून अधिक मोठी असलेली 'सत् चित् आनंदाची गठडी कशी काय संभाळणार वेडे? ''बाबा, मला कांही समजत नाही तुम्हीच संभाळा मला या सर्व तिजोरीसहीत!'' करूणा भाकीत मी म्हटले आणि एकदाचे दादा भगवान भेटले त्यांनी माझ्या हाती गुरुदेवांचे लाखमोलाचे २ पैसे पाहून कानांत 'आप्तवाणी'चे गुफ्तगु केले. मी देहभानावर आले तसे पाहिले त्या २ अनमोल पैशाबरोबर आणि २ दुर्मिळ रत्ने दादा भगवंताच्या मुठीत होती. लाखो रूपयांहून अधिक किंमतीच्या त्या रत्नाची नांव होती (१) 'हुं कअी जाणू नथी' (मी कांही जाणत नाही किंवा मला कांही येत नाही हा भाव) (२) परम विनय (परमोच्च विनम्रता) ही २ रत्नं त्यांनी सर्वांनाच दिली होती आणि ज्यांना त्याची पारख झाली त्यांना समजला त्यांच्या दिव्यवाणीचा अननुभूत स्पर्श!

'गुरू लाखाचं बोलला
अर्थ इतुकाचि साधला॥'

श्री गुरूचं रूप ज्ञानेश्वरांनी सांगितलय - ज्यासि नाही भेद। ब्रह्मी एकाकार। म्हणजे ज्ञानेश्वर। तोचि गुरू॥ गुरूगीतेत गुरूला जी नमने वाहिली आहेत त्यातील महत्त्वपूर्ण एक नमन असे —

अखंडमंडलाकारं व्याप्तं येन चराचरम्।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः॥

अर्थ :— ज्याने हे संपूर्ण चराचर विश्व व्यापलेले आहे त्या परमेश्वराच्या चरणांचे दर्शन घडविणाऱ्या श्रीगुरुला नमन असो श्री गुरुंना अभेदतेने एकमेव अद्वितीय स्वरूपाने नमन करीत असता भिन्न शरीर मर्यादेतून होणारे वन्दन हे गुरुपरंपरेचे तसेच वैदिक मूल्ये जतन करणारे विनम्रतेचे द्योतक ठरत असते.

नुसत्या पांडित्याचे जोरावर शास्त्रीय ग्रंथाचे केंव्हाही आकलन होत नसते त्यासाठी गुरूकृपा ही हवीच ईशावास्य उपनिषदाचे श्री दासगणूंना पडलेले कोडे बाबांनी काकांच्या कामवालीकडूनच त्यांना सोडवून दिले गुरुच्या प्रसन्नतेनेच शिष्याला दुर्गम कार्य सुगम होते एकनाथ महाराजांनी जागोजागी साधकांना प्रतिपादन केलं आहे.

किमर्थ करावे शास्त्रज्ञान। किमर्थ करावे वृथा ध्यान
चालते बोलते पूर्ण ब्रह्म। सद्‌गुरूचरण साधकां॥

सर्वांनाच ज्ञानी सद्‌गुरू लाभतातच असे नव्हे. म्हणूनच क्रमिक भक्ति मार्गाने जाणाऱ्यांची दिशाभूल होऊ नये म्हणून ज्याला जी साधना योग्य त्या साधकाला आपआपल्या दैवतांची भक्ति करण्यासाठी संतांनी वेळोवेळी बजावले आहे. जनार्दन स्वामींना गुरु करूनही नाथ म्हणतात — वेळोवेळां सांगे जना मागे दाना सर्वांसी। मंगल श्री दत्तराज। स्मरा गुरूराज समर्थ॥ गुरूमूर्तीत आणि आपल्या दैवतांत ज्ञानानंतर फरक रहात नाही. श्री साईबाबा स्वयं सद्‌गुरू दत्तावतार असूनही नानांना ओरडले होते की बिनीवाल्यांना दत्ताचे दर्शन घ्यायचे असतांना वाटेत टांगा न थांबवता कां आणलात म्हणून. खरे सद्‌गुरू जे असतात ते कधीच भक्तिच्या आड येत नाहीत उलट त्या भक्तिप्रेमाचे बळ वाढावे म्हणून दुजोराच देत असतात. श्री एकनाथी भागवतात तिसऱ्या अध्यायांत सद्‌गुरूभक्तीने मुक्ति, विविध गुरूंची लक्षणे, सद्‌गुरूंची लक्षणे सच्छिष्याची लक्षणे याचे सर्व वर्णन अतिशय सुरेखपणे एकनाथांनी मांडले आहेत ती माहितीखातर ज्ञानप्रिय वाचकांनी पहाण्यासारखी आहेत.

आपआपल्या अधिकार पात्रतेनुसार गुरु लाभत असतात गुरुमार्गात 'साधन-चतुष्टय' संपन्नता ही अधिकार प्राप्तीसाठी लागणारी प्राथमिक तयारी म्हणून सांगितली आहे. (संदर्भः श्री विद्यारण्य भारतीतीर्थ विरचित पंचदशी किंवा पंडित निश्चलदासजी का विचार सागर) परंतु ह्या संपन्नतेची देणगी काहींना जन्मजातच प्राप्त असते. जसे ज्ञानेश्वर, श्री साईनाथ, रमण महर्षी किंवा श्री. रामकृष्ण परमहंस त्यामुळे त्यांना गुरुंची खूण सहजतेने लाभून ते जन्मतःच गुरुपदी विराजमान झालेले असतात. ज्यांच्याकडे अशी जन्मोजन्मीची पूर्वपुण्याई नसते त्यांना नामस्मरणाचा भक्तिमार्ग अवलंबन करणे अधिक हितावह ठरते ह्या स्मरणांतूनच त्यांना स्मर्तृगामीं गुरुदेवांची भेट होते आणि कळत नकळत आपल्या

चिन्मयस्वरूपाची जाणीव होऊन अंतीम समाधान लाभते.

गुरुदीक्षेचे नानाविध प्रकार आहेत. शाक्ती दीक्षेत चेतनरूपी कुण्डलिनी शक्ति जागृति श्री गुरुदेव योगमार्गाने करतात तर शाम्भवी दीक्षेत श्री गुरु आपल्या प्रसन्न दृष्टिक्षेपांतून अथवा स्पर्शातून शिष्याला एका क्षणात स्वस्वरुपी स्थित करतात. मांत्री दीक्षेमध्ये स्मार्त, चाक्षुषी, स्पर्श, होत्री, अभिषेचिका आदि अनेक उपप्रकार आहेत ज्यामध्ये मंत्रदेवताना वेगवेगळ्या अधिकृत शिष्यांना गुरुंकडून प्रदान केली जाते. शारदा पटल दीक्षेत कर्मकांडाला प्राधान्य आहे जसे की न्यास, पूजा, अर्चा आदि. या सर्व दीक्षाचे ठराविक नियम आणि नीतिबन्धने आहेत. आत्मस्वरुपाने स्वतंत्र असूनही शरीरमर्यादेतून ही नियमाची पथ्ये सांभाळावी लागतातच. नाही तर साधकाची अधोगति होण्याची शक्यता असते. जे परम पुरूषोत्तम सहजानंदी ज्ञानी स्वयंसिद्ध असतात अशांचे केवळ सान्निध्यच महत्त्वाचे असते आणि अशा ज्ञानी तत्ववेत्त्या गुरुंचा सहवास मिळणे ह्यासही परमभाग्य असावे लागते. म्हणूनच संतांनी परमेश्वराकडे मागितले आहे. 'न लग धन मुक्ति संपदा। संतसंगति देई सदा॥' मुक्ति संपदेच्या संपन्नतेचा सोहळा सत्संगातून भोगता येतो. परंतु सर्वांनाच ज्ञानी महात्म्यांची गाठभेट होते असे नाही आणि यदाकदाचित झालीच तर गुरु मार्गातील खुणा पटण्याइतकी चित्त शुद्धि नसते आणि ती केवळ शुद्ध संवेदनक्षमतारूपी सात्विक वृत्ति नसेल तर परमार्थप्राप्तीमध्ये अनेक अडचणी उभ्या राहतात. सर्वसाधारण साधकांना आपली, पूर्वजन्मीचे संस्कार, प्रवृत्ति आणि अधिकार यांची जाणीव नसल्याने गुरु लाभूनही बुद्धच्या चंचलतेने कधी कधी दुसऱ्या कोणाची साधना स्वतःहून उगाचच अधिक चांगली असावी असे वाटते आणि मग साधनेतील स्थित्यंतरांमुळे अधिकच बुद्धि विक्षेप होण्याचा संभव असतो म्हणूनच ज्याच्या त्याच्या अधिकारपात्रतेनुरूप ज्ञानी महात्मे त्यांना मार्ग दाखवून देतात. श्री साईबाबांनी साठे यांना गुरुचरित्राचा पाठ तर शामाला विष्णूसहस्त्रनाम्,, नानासाहेब चांदोरकरांना श्रीमत् भगवद्गीतेतील 'तद्विद्धि प्रणिपातेन...' याचा गर्भित अर्थ सांगून तर दासगणूंना नारदीय कीर्तनपद्धती स्वीकारण्याचा आदेश दिला आणि ज्ञानप्रिय भक्ताचे शंकानिवारण वेगवेगळ्या पद्धतीने केले. श्री साईबाबा सर्वसाधारणपणे भक्तिमार्गाचा अवलंब करायला लावीत. म्हणून साईदयाधन। बहुधा निज शिष्यालागून। भक्ति आणि नामस्मरण। याचेच विवरण करीत॥ ३२ अ. १९ साईचरित.

ज्यांना ज्ञानी महात्म्यांचा सहवास लाभला नसेल अगर दुर्मिळ सतसंगति कधीच मिळाली नसेल त्यांनी गुरुभेट म्हणून आपआपल्या कुलदेवतेची आराधना करावी आणि त्यांचेच नामस्मरण करावे. आपण सारे नित्यनैमित्तिक व्यापांनी आणि कटकटींनी इतके घेरलेलो असतो की खरोखरीच आपणाला काय हवे आहे याचे नेमके उत्तरही आपल्यापाशी नसते परमार्थी ज्ञानी चेतनस्वरूप सद्‌गुरुभेटीची आपण मागणी करावी ही आठवणही आपणाला रहात नाही. वेळोवेळी संकटातून सोडविण्यासाठी निरनिराळ्या देवतांना निरनिराळे नवस करीत रहायचे सोईचे असेल तर फेडायचे नाहीतर "सवडशास्त्र" काढून विसरून जायचे! आणि जेव्हां 'संध्याछाया भिववितीं हृदया' ही वेळ येऊन ठेपते तेव्हां तो म्हणतो, "चला आता दुकानाचे हिशेब मिटले आहेत चला आँता एक गुरु

करून टाकू झालं!" आणि मग त्यानेच पकडलेला गुरु त्यालाच टाकून देतो!! अशा ह्या विचित्र दैवगतिपासून सावध रहाण्यासाठी श्री साईंनी कमीत कमी निष्ठा आणि सबूरि हे दोन गुण आपल्या भक्तांना अंगी बाणायला लावलेत. परमार्थात यश येण्यासाठी गुरुकृपा हवी. पण ती हवी म्हणून ईश्वर आराधनेची आवश्यकता असते त्या वाचून सद्‌गुरुंची भेटच घडत नाही. योगवासिष्ठातही असाच उल्लेख आहे. 'गुरुद्वारा पाविजे ज्ञान! तेथ ईश्वराचा आभार कोण! येथे ईश्वरकृपेवीण! सद्‌गुरु जाण भेटेना! (ए.भा.अ. २२), म्हणून ईश्वरकृपेसाठी सर्वप्रथम आपल्या आराध्य दैवताची उपासना (मग श्रीसाई असोत वा पंचायतनातील शीव, शक्ति, विष्णु, गणेश, सूर्य कोणतेही दैवत असो पण त्यावर आपली नितांत श्रद्धा असायला हवी) आपल्या घरातील चालीरितीनुसार करायची असते. ज्यांची आराधना पूर्वसुकृतामुळे पूर्ण झालेली असेल त्यांना सहजतेने सद्‌गुरुंची भेट होऊन स्वानंद सुखाचे साम्राज्य लाभते शाश्वत सुखाची न संपणारी शिदोरी सदैव त्यांच्या गाठीशी असते. "तीळा तीळा दार उघड" म्हटल्याबरोबर अगणित संपत्ति पाहून जसे व्हावे तसे अमर्याद सुखाचा साठा नित्य स्वतःपाशीच असूनही आपलं अनंतदर्शि भांडार आपलं आपल्यालाच कसं माहिती नाही याचा अचंबा वाटू लागतो गुरुकृपेने जेव्हा ते अनंतदर्शी अनंत सुख तो स्वरूपात पाहू लागताच 'आ' वासून नुसताच राहतो! तेव्हा गुरुच त्याला भानावर आणतात त्या वेळी त्याचे ओठ मिटतात ते स्तब्धतेतच मन चूप होऊन मौन धरतं. शब्द वितळतात. तो स्वतःच जेव्हा गुरुमय होतो तेव्हां शरीरमर्यादेतून त्याला त्याच्या वेगळेपणाचं अस्तित्वही जाणवत नाही. जाणीव आणि नेणीव याच्या पलिकडे तो स्वस्वरूप होतो गुरोस्तु मौनं व्याख्यानं। शिष्यस्तु छिन्नसंशयः याची प्रचीति एकाच वेळी त्याला येत असते ते व्यक्त करण्यासाठी शब्द तोकडे पडतात. अव्यक्तादिनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत (गीता) हे तो स्वतःच पाहतो. आणि जेव्हा स्मृति होते त्या संकुचित 'मी' या वेष्टणाची (शरीराची) तेव्हा त्या अमर्याद आत्मस्वरूप 'मी' चा आठव होऊन तो स्तिमित होत असतो प्रचंड समुद्राचं पाणी परीक्षा नलिकेतून तपासत रहावे तसे या 'मी' चे त्या 'मी' शी जुळणारे धागेदोरे पहात खेळत बसावे असे वाटू लागते, आणि म्हणूनच ज्ञान होऊनही ज्ञानोत्तर भक्तितच सदैव राहणं किती श्रेयस्कर आहे हे त्याला उमगतं. खरा तत्ववेत्ता जगाचं रहस्य समजूनही त्यांत ढवळाढवळ करून चमत्काराचं ओझं डोक्यावर बाळगत नाही आणि यदाकदाचित कधी तस घडलंच तर परमेश्वराकडे बोट दांखवून अभिमानाचं कोळिष्टक झटकून टाकून भ्रान्तीच्या फाफटपसाऱ्यातून अगदी सहजतेने अलिप्त राहतो, आणि असे ज्ञानी सामान्य जनांच्या नजरेसमोर येत नाहीत कारण त्यांना कसलीच अभिलाषा किंवा लालूच नसते. किर्ती, धन, मानपान ही येणारी जाणारी वावटळ अगदी निर्लेप मनानं सद्‌गुरुमुळे त्याला प्राप्त असल्याने त्याला सुखदुःखाचं वावडं रहात नाही. खऱ्या सद्‌गुरुची पारख करण्याची पात्रता सर्वांच्याच अंगी नसते त्यामुळे फसवणूक होते पण त्यात फसवणारा दोषी नसून फसला जाणारा त्याच्या कर्मबंधातील त्रुटिमुळे दोषी असू शकतो. म्हणून तर्जनीने जेव्हा 'तो दोषी आहे' असे कोणा गुरुकडे बोट दाखवणे म्हणजे ते एक गुरुबोट सोडून

उरलेली ३ बोटे स्वतःचे दोष काय सांगत आहे हे पहाणे होय. ज्यात दोषदर्शन करावे तेथेही तोच 'मी' आणि ज्याने ते करावे त्यांतही तोच 'मी' असे असता त्रिगुणांनी पछाडलेले मन कसे हिंदकळते आहे हे लक्षात आले की हसू येते. विश्वव्यापक 'मी' चा पसारा ज्ञानी महात्म्यांच्या कृपेने दृष्टिने, स्पर्शाने अगर वाणीने शिष्याकडून पाहिला गेला की अहंकार संपून ॐ कार राहतो. "मी-माझे" भ्रान्तिचे ओझे सहजतेने विरून जाते धुके वितळावे तसे! ज्ञानी सत्पुरूष शिष्यांना 'आपल्यासारिखे करिती तत्काळ नाही काळ वेळ तयालागी!' हे प्रत्ययास आणून देतात पण ती अवस्था मिळण्यासाठी कल्हईला भांडे जसे तापायला ठेवतात आणि कल्हईवाला एखादी कथलाची चकचकीत छोटीशी उभी आडवी रेघ मारून नंतर ते भांडे घासून पुसून निखाऱ्यावर तापून (होरपळून) निघालेल्या मनावरच ज्ञानी सद्‌गुरुंच्या वचनाची कल्हई चटकन बसते आणि एकदा कां ती उत्तम बसली मग त्यांत कोणता का पदार्थ राहिना आंबट असो वा स्वादिष्ट भांडे कधीच कळकणार नाही. एकदा का 'मी देह नाही' याची कल्हई लागली की त्या मनांत येईना का कोणताही विकार ते मनालाही साक्षीभूत असणारं तत्व कधीच कलंकित होत नसतं! पण त्यासाठी सद्‌गुरु हा वीतरागी (वासना व द्वेषरहित) सहजानंदी ज्ञानी व्यक्ति असेल तर त्याच्या तेजोमय वाणीच्या शक्तिनं स्वतःतील सच्चिदानन्द स्थितीची (नित्य, मुक्त, शुद्ध, बुद्ध, अनंतदर्शी ज्ञानस्वरूप परमात्म्याची) स्मृति होते आणि ती कधीच विसरली जात नाही. म्हणून अशांचा सहवास हा महत्त्वाचा असतो. अशा ज्ञानी महात्म्यांच्या गुरुमालिकेतील मेरूमणी म्हणजे श्री साई होत. ते प्रवचने, व्याख्याने देत बसले नाहीत ज्याच्या त्याच्या योग्यतेनुरूपच त्याला परमार्थाचा मार्ग दाखवित. एकनिष्ठ मेधाला शीव भक्तिच्या कर्मकांडातून मोक्ष दिला तर ज्ञानप्रिय नानासाहेबांना "नेति नेति" (न इति न इति "हे ते नव्हे") दत्त हा जाणा, भगवद्गीतेतील श्लोकाच्या निमित्ताने दाखवले. ज्ञानी म्हटल्यावर चर्चा करून, सेवा अथवा प्रणाम करून काय साधते? कोणत्या ज्ञानाचा उपदेश होतो? पारमार्थिक दृष्टिने पाहू गेल्यास ज्ञान कधी उपदेशिले जाते काय? जर तसे झाले तर उपदेश करणारा आणि उपदेशिला जाणारा वेगळा होत असेल तर ते द्वैत आले आणि मग अद्वैत तत्वज्ञानाला बाध येईल. म्हणून बाबांनी जे उपदेशिले जाते ते ज्ञान नव्हे यासाठी त्या ठिकाणी 'ऽ' (अवग्रह) घालून नानासाहेबांना मजा पहा म्हणून उघडपणे दर्शवले. बाबांच्यात एकतत्वामुळे सहजतेने नांदत असणारी निर्भयता होती त्या उच्चतम कोटीच्या स्तरातूनच पाहिले तरच अनुभवास येईल की बाबांनी 'एकोऽहं बहुस्याम्' चा प्रत्यय नानासाहेबांना कसा आणून दिला. सत्य उघड करीत असता भगवान श्रीकृष्णाच्या वचनाची त्यांत यत्किंचितही उपेक्षा नव्हती तर 'धर्मस्य तत्वं निहितं गुहाया' अशा गुह्य धर्मतत्वाचं सत्यदर्शन करून देण्यासाठी त्यांनी 'अवग्रहा'ची किल्ली वापरून नानासाहेबांचेच भक्तिकवाड खोलून त्यांचा त्यांनाच अनंततत्वाचा खजाना त्या अल्लाच्या फकीरानं दाखवला यात नवल मात्र नाही हं. कारण स्वानंद साम्राज्य सुख भोगणाऱ्या त्या सम्राटाची सहज किमयाच अशी होती की सारे त्याला फकीर समजत! ज्यांच्याकडे बाबांचे २ पैसे जसेच्या तसे असतील त्यावर विस्मृतीचा गंज

नसेल तर त्यालाही तो अर्थ समजेल पण आमची ही. नाणी कधी कधी गहाळ होतात तर कधी सांपडत नाही अशी आमुची स्थिती! "बाबा, आमच्या वाटचालीत आम्हाला सदैव तुम्ही दिलेल्या त्या दोन पैशांचा विसर न व्हावा" हीच प्रार्थना पुन्हा पुन्हा करावीशी वाटते. ज्यांच्या कृपेमुळे मला दादा भगवान गुरुनी सांगितले शब्दब्रह्म आकळले ते साईरूप मी विसरायचे ठरवूनही विसरू शकत नाही. श्री साईबाबा आणि गुरु यात अभेदता दृष्टिस आल्यावर नाथांचे म्हणणे पटते — गुरु ईश्वरा भिन्नपण। देखे तो नागवला आपण॥ (ए.भा.अ. २१) श्री साईची गुरुकिल्ली अगदी अगदी निराळी आहे ज्याला साईभक्तीच्या कुलुपाचं कोडं ठावूक असेल त्यालाच ती साईकृपेची किल्ली लावता येईल. गाईच्या पाठीवर बसलेला असतो कावळा स्तनापाशी असतात गोचिड पण त्या साई कामधेनुच्या अमृतमय पयोधारा प्याव्यात त्या फक्त हुंदडत येणाऱ्या निरागस निष्पाप ढुशी देत कांसेला लागणाऱ्या साईच्या बछड्यांनी त्याचे कारण काय वेगळे सांगायला हवे? ते केवळ निष्ठावंत साईभक्तांनाच ठावे! आता हे गुरु तत्व सांगण्याचा इवलासा प्रयत्न म्हणजे खारीची रामाला सेतु बांधण्यासाठी केलेली मदतच जणू.

"मोक्ष मार्गस्य नेतारं, छेत्तारं कर्मभूभ्रताम्!
दातारं विश्वतत्वानां, वन्दे सर्वज्ञ सद्गुरुम्॥'

(अर्थ — पर्वताना छेदून टाकणाऱ्या विश्वतत्वाना (करताल आमलकाप्रमाणे हाती देणाऱ्या) सर्वज्ञ सद्गुरु (दादा भगवानना') मी नमस्कार करीत आहे.

तसेच 'साईलीला' वाचकांतील सच्चिदानंद स्वरूप आत्मभावाने स्थित असणाऱ्या साईला मनोभावे प्रणाम सर्व नानाविध पंथ व गुरुप्रणालीतून वहाणाऱ्या त्या एकाच साई (गुरु) तत्वाला अभेदतेने वन्दन.

न गुरोरधिकं तत्वं न गुरोरधिकं तपः।
तत्वज्ञानात्परं नास्ति तस्मै श्री गुरवे नमः॥

(या पुढील भाग पृष्ठ क्रमांक ३५ वर)

## श्री साईनाथांची शिरडी

शिरडी पावन जाहली।
बाबाच्या पदस्पर्शाने॥
द्वारकामाई जाहली।
बाबाच्या हस्तस्पर्शाने॥
गुरुस्थान जाहले।
बाबाच्या गुरुमाऊलीने॥
समाधिमंदीर जाहले।
बाबाच्या देहामुळे॥
भक्तगण जाहले।
बाबाच्या कृपा आशिर्वादाने॥

— श्री. सुधाकर एम्. चव्हाण
३/३५ गोवर्धनदास मॅनशन,
डॉ. बाबासाहेब रोड,
परेल, मुं.नं. - १२.

ॐ तत् सत्॥ श्री साई प्रेरणेने शेवटी हे साईतत्वज्ञान १५ कडव्यांच्या काव्यरूपी महाप्रसादाचे ताट साईचा नैवेद्य म्हणून भक्तांपुढे ठेवत आहे :—

ॐ कारी पाहसी
जरी अहंकार
सर्वत्र नकार
वाजतसे ॥१॥

"अहंकाराचा वारा
न लागो राजसा"
सन्ताचा हा वसा
आठवावा ॥२॥

नकार होकार
दोन्ही हे विकार
पंचांगी आकार
तो तू नव्हे ॥३॥

पुण्ये आणि पापे
नका धरू खंत
सांगती महन्त
भक्तांसाठी ॥४॥

अज्ञान विज्ञान
आपुल्या प्रवृत्ति
यांतून निवृत्ति
साधावी ती ॥५॥

साधतां साधतां
सर्वही साधेल
साईच म्हणती
"बनतां बनेल" ॥६॥

नानांची ती वृत्ति
साईना दिधली
शुद्ध हारपली
आत्मरंगी ॥७॥

साईरंगी त्यानी
खेळुनिया खेळ
लावली ती वेळ
सार्थकीच ॥८॥

ज्ञानाचा कां होतो
कधी उपदेश
साईचा आदेश
पहा जरा ॥९॥

मातेचिया लग्नी
लेकरू जेवले
प्रत्ययाला आले
कैसे कोणा ॥१०॥

अशा ज्ञानमुद्रा
साई चरित्रात
पाही आपल्यांत
साईभक्ता ॥११॥

सन्ताच्या ह्या खुणा
जप जप मना
सर्वस्व अर्पूनि
साईचे चरण ॥१२॥

सद्गुरुचे पाय
ज्याना नाही ठावे
माणुस म्हणावे
कैसे बरे? ॥१३॥

बाबांनि मजसि
गुरु दाखविला
कसा आकळला
साई जाणे ॥१४॥

वेडी साईप्रिया
म्हणजे खुदा साई
"शालिनी देसाई"
नावाचीच ॥१५॥

नमो नमः
नमो नमः
नमो नमः

# देवास जागृत करा

— प्रा. र. श्री. पुजारी
९९२ सदाशिव पेठ
पुणे-३०.

वेदांती माणसाला वेदांताचे वेड असते. वेदांतविषयक ग्रंथांचे वाचन हा त्याच्या मनाचा छंद असतो. या छंदापोटी शेकडो ग्रंथ तो वाचतो. शेकडो मतमतांतरे तो बोलतो. ही सर्व त्याची हुकुमी आयुधे असतात. त्यांच्या बळावर तो सभा जिंकतो. सर्वशक्तिमान ईश्वर सगुणात नसून निर्गुणात आहे असे तो ठामपणे सांगतो. इतकेच नव्हे तर ईश्वर सगुणात आहे असे म्हणणारांना तो वेड्यात काढतो! अज्ञ जीव समजतो. पुढे अहंकारामुळे त्यांच्या सगुण उपासनेची म्हणजे पूजा-भक्तीची कुचेष्टाही करू लागतो.

निर्गुणाच्या उपासकांची मनोधारणा ही अशी आग्रही असते. तिच्यात योग्य तो पालट घडविणे केवळ अवतारी पुरुषांनाच शक्य असते. श्रीबाबांनी निर्गुणाच्या आग्रही उपासकांत असा पालट घडविल्याची उदाहरणे श्रीसाईसच्चरितात आढळतात.

मंदिर, मूर्ती, गंधफूल, धूपदीप, नैवेद्य, आरती, गीतवाद्य, ध्वज— ही सर्व सगुणपूजेची साधने होत. ही सगुणपूजा अर्थातच निर्गुणाच्या उपासकाला वर्ज्य असते. अशा पूजेला तो 'काष्ठपाषाणपूजा' असे म्हणतो, "दगडाची पूजा करून देव कधी भेटणार आहे का?" असा खोचक प्रश्न तो विचारतो. आपल्या प्रश्नाचे उत्तर एखाद्या भक्ताला देता न आल्यास "एका दगडाने दुसऱ्या दगडाची पूजा केली! असे हे देव आणि भक्त!" असा कुत्सित भाव व्यक्त करून, सगुणपूजेवर अखेरचा प्रहार करून तो निघून जातो.

निर्गुणाच्या अशाच एका कुत्सित उपासकाने एकदा रामकृष्ण परमहंस यांना प्रश्न केला. तो म्हणाला, "महाराज, संडासाचा धोंडा आणि देवाच्या मूर्तीचा धोंडा हे दोन्ही मूलतः एकच ना? धोंडेच ना? मग त्या दुसऱ्या धोंड्याचा देव कधी झाला? कसा झाला?"

रामकृष्ण म्हणाले, "अरे, ज्या क्षणी दुसऱ्या धोंड्यावर भक्तांनी गंधफूल वाहिले त्याचक्षणी त्या धोंड्याचा देव झाला. भक्तांनी धूप, आरती-निरांजन, गीतवाद्य, नैवेद्य, इत्यादी केले त्याच क्षणी त्या धोंड्यातील देव जागृत झाला. भक्तीच्या प्रेमळ, पवित्र संस्कारांमुळे देवास त्या धोंड्यात अवतरणे भागच पडले. तसे कोणते पवित्र संस्कार संडासामधील धोंडयावर होतात सांग. होत नाहीत ना? म्हणून तो धोंडा धोंडाच राहिला. देवत्वाची पायरी मूर्तीप्रमाणे त्याला गाठता आली नाही."

पंढरीतील पांडुरंगाची मूर्ती म्हणजे मूलतः जड असलेला एक धोंडाच. त्या धोंड्याला कोणा एका मूर्तिकाराच्या हातांनी घडविले. त्याची मूर्ती केली. पण त्या जड मूर्तीत देवपण कोणी निर्माण केले? भक्तांनी भक्तीचे विविध संस्कार त्या मूर्तीवर रात्रंदिवस केले. त्यामुळे त्या मूर्तीची जडता जणू गळून पडली. ती चैतन्यरूप झाली. सजीव झाली. भक्तांचे मनोगत जाणू लागली. त्यांच्या आर्त हाकेला ओ देऊ लागली. नामदेव, जनाबाई, सखू, कान्होपात्रा यांच्या जीवीची ती जिवलग झाली.

म्हणून भक्त जेवढा भक्तीने आर्त, व्याकूळ, देवाच्या भेटीसाठी आक्रोश करणारा तेवढा त्याचा देव कनवाळू. त्याच्या हाकेमुळे कावराबावरा होणारा प्रेमळ मातेप्रमाणे त्याच्याकडे धाव घेणारा मनोकामना पुरी करणारा. अर्थात भक्ताचा बालकाप्रमाणे असलेला निरागस भावच जड मूर्तीला चैतन्याचा हा पाझर फोडू शकतो. त्याला बोलता, हसता, जेवता करू शकतो.

जेथे ध्वनी आहे तेथे प्रतिध्वनी आहेच. बोलता तंबोरा समोरील अबोल तंबोऱ्यास बोलता करू शकतो. मातीची क्षुद्र बाहुली एखाद्या आर्त हाकेमुळेही जागृत होऊ शकते. सर्व मानवी भावभावना प्रकट करू शकते.

योगीराज श्रीगुळवणीमहाराज यांना एका मुमुक्षू भक्ताने प्रश्न केला, "महाराज, प्रपंच म्हणजे नेमके काय? परमार्थ म्हणजे नेमके काय?"

यावर श्रीमहाराज म्हणाले, "प्रपंच म्हणजे देहबुद्धी. देहभाव देहाची सेवा. परमार्थ म्हणजे देवाठायी असलेली बुद्धी. देवभाव, देवाची सेवा. पहिली देहाची सेवा तर दुसरी देवाची सेवा."

प्रपंच देहबुद्धी वाढवितो. पोसतो. राग लोभांचे स्तोम माजवितो. अहंकाराचे राज्य करू लागतो. ऐहिक ऐश्वर्याची पूजा करू लागतो. याउलट परमार्थ देवबुद्धी वाढवितो. राजस आणि तामस भावांऐवजी सात्विक भावांची वृद्धी करतो. पुढे पुढे ती वृद्धी इतकी होते की प्रपंच रामरूप होऊन जातो! दया, क्षमा, शांती यांचीच पूजा तेथे सुरू होते.

प्रापंचिकाना भगवंत हवा असेल तर त्यांचा प्रपंच हळूहळू परमार्थरूप झाला पाहिजे. येथे कर्ता, भोक्ता एक श्रीराम अशी भावना दृढ झाली पाहिजे. असा रामरूप प्रपंच कसा होईल या मुमुक्षूच्या प्रश्नास नामयोगी श्रीगोंदवलेकर महाराज उत्तर देतात. ते म्हणतात, "भाकरी करताना तिच्या पिठात मीठ केवढे घालावे? तर केवळ चवीपुरते! मिठामुळे भाकरीस चव येते म्हणून कोणी मिठाची भाकरी करते का? म्हणून परमार्थाला चव येईल एवढाच प्रपंच आपण करावा. म्हणजे त्याचा व्याप कमीत कमी असावा. म्हणजे राम भेटेल."

वस्तुतः रामास शोधण्यास कोठे बाहेर जावे लागत नाही. तो आपल्या अंतःकरणातच असतो. मात्र तो निद्रितावस्थेत असतो. त्याला जागृत करावे लागते. हेच आपले काम. किंबहुना हीच आपली नैसर्गिक गरज तिच्या पोटी आपले सर्व व्यवहार चालतात. परंतु त्यांचे स्वरुप वाट चुकलेल्या वाटसरूप्रमाणे असते. ती वाट सापडली की परमार्थरूप प्रवास आनंददायी होतो.

स्त्रीच्या अंतःकरणात वात्सल्यभाव जन्मतःच असतो. बीजरूपाने असतो. अपत्यप्राप्तीमुळे तो तीव्रतम होतो. अपत्यास स्नान घालणे, भरविणे, खेळविणे, त्याची अंगीटोपडी शिवणे — यावरच तिचे सर्व जीवन केंद्रीत होते. जणू लोकरीच्या गुंड्याप्रमाणे तिचे जीवन आपल्या अपत्याभोवती गुरफटते! बाळ रडण्याचा अवकाश, हातातील शंभर कामे टाकून ती आपल्या बाळाकडे धावते. फार काय, तिची तहान, भूक, करमणूक म्हणजे एकमेव तिचे बाळच! अपत्यच!

हाच कोमल भाव पुढे जीवनप्रवासात विविध रूपांनी नटतो. प्रेम, सेवा, करुणा या रूपांनी विनटतो. भोवती वावरणाऱ्या व्यक्तींपैकी कोणी मातापितरांप्रमाणे वाटतात. कोणी आजोबा-आजींप्रमाणे वाटतात. कोणी बंधु भगिनींप्रमाणे वाटतात. कोणी अपत्यांप्रमाणे प्रिय होतात.

श्रीबाबांना आजोबांच्या ठिकाणी पाहाणे आणि आजोबांना श्रीबाबांच्या ठिकाणी पाहाणे हीच या भाववृत्तींची परमावधी. निष्पाप मुले आणि भोळे भाविक या वृत्तीचे होत. ते श्रीबाबांच्या मूर्तीच्या गळी पडतात. चरणाला मिठी घालतात. हसतात.

निर्गुणाचे उपासक त्यांना श्रीबाबा म्हणतात ''माझ्या लेकरा, ऊठ. तुला काय हवे सांग ते मी तुला देईन.

---

## —: साई महिमा :—

एक आहे छोटे गांव
शिर्डी आहे त्याचे नांव
शिर्डी आहे पवित्र देवस्थान
तेथे जाता हरपते देहभान
ठेवा श्रद्धा मनीच्या गाभा
दुःख हरती साईबाबा
हृदय मंदिरात ठेवा भक्ती
नयनी दिसेल साईमूर्ती
पठण करा तुम्ही साईगाथा
ठेवा साई चरणी माथा
साई बोल हे श्रद्धा सबुरी
प्रत्यय येईल तुम्हा खरोखरी
साईच्या उदीचा महिमा थोर
जाणून घ्या तुम्ही सत्वर
करा जप हो साई-साई
नाही पडणार कमी काही
साई दर्शन घ्या झडकरी
सर्व सुखाचे व्हा मानकरी
साई ठायी नाही भेद
असो चिरंतर आशिर्वाद

**— सौ. वसुधा गानू**
एन. १०/५, गणपती निवास,
बांगुर नगर, गोरेगाव.

# श्री साईनाथांचा शरणार्थी — १५

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि.बा. खेर

शाळेला रजा पडल्यानंतर जहांगीर गुलाबभाई व बिलीमोरिया या सॉलिसिटर पेढीचे भागीदार गुलाबभाई यांना भेटलो असता त्यांनी जहांगीर सॉलिसिटर यांच्या ताकिदीस न जुमानता मला हायकोर्टकडे अर्ज करण्यास सांगितले. म्हणून नवसारीला जाऊन हेडमास्तरला रजेनंतर शाळा उघडताच माझा नोकरी सोडण्याचा इरादा सांगितला. थोड्या आडकाठीनंतर माझ्या जागी नवीन शिक्षक मिळताच मला त्यांनी मोकळे केले. नंतर मुंबईला जाऊन गुलाबभाईंच्या सल्ल्याप्रमाणे अर्ज तयार करून तो मी जहांगीर सॉलिसिटरना दाखविला. ते म्हणाले, "जरूर अर्ज करा परंतु दोन वर्षाचा खंड पडूनही पहिली भरलेली टर्म धरण्यात येते अशी एकही केस आजवर हायकोर्टच्या इतिहासात झाली नाही. जहांगीर अर्ज पुढे पाठविण्यास तयार झाल्यामुळे अर्ज टाइप करवून पेढीमार्फत तो हायकोर्टकडे पाठविला. काही दिवसांनी प्रोथनोटरीने मला भेटीस बोलावले. मला पाहून त्यांची खात्री झाली की माझी गैरहजेरी माझ्या बिघडलेल्या तबियतीमुळे असली पाहिजे. त्यांनी हायकोर्टच्या सरन्यायाधीशांकडे माझ्या अर्जाची शिफारस केली व माझी तेरा महिन्यांची उमेदवारी गणण्यात येऊन उरलेली फक्त अकरा महिन्यांची उमेदवारी मी पुरी करावी असा हुकूम सरन्यायाधीशांनी केला. हा हुकूम जहांगीरजींना दाखविल्यावर त्यांनी मला उरलेली टर्म भरण्याची परवानगी दिली. म्हणून मी बाकीची टर्म भरून सॉलिसिटरच्या परीक्षेच्या अभ्यासाला सुरुवात केली.

याच सुमारास राधाकृष्ण आईने शिरडीतील माझ्याकडे असलेल्या भाड्याच्या जागेची मागणी केली. ती मला म्हणाली "तू शिरडीला येशील तेव्हा माझे घर आहेच. तेव्हा तू उगीच भाडे कशाला भरतोस? शिवाय बाबांच्यासाठी असलेले सामान ठेवण्यासाठी सध्याची जागा कमी पडते. तुझी जागा आम्हाला मिळाल्यास आमची जागा मोठी होईल." मी होकार दिला, त्यासंबंधी तात्या पाटलांना बोललो व नंतर त्या जागेचा कब्जा राधाकृष्णआईस मिळाला. त्या योगे तिची एकांतात गुप्त मंत्र व साधना करण्यासाठी चांगली सोय झाली.

डिसेंबरमध्ये शिरडीत मी राधाकृष्ण आईकडे मुक्काम केला. माझी छोटी बहीण मला पहाटे हाक मारून उठवे तसेच राधाकृष्णआई सुद्धा "वामन्या उठ, चहा झाला तयार, सहा वाजले," अशा शब्दांनी मला जागा करीत असे. माझ्या घरी काय पद्धत आहे ती मी तिला सांगितल्याशिवाय तिने माझी संवय जाणली व मी दोन तीन दिवस शिरडीत राहिलो. त्या दरम्यान रोज ठीक सहा वाजता माझ्या धाकट्या बहिणीचे शब्द उच्चारून मला उठवे. मुंबई-शिरडीत केवढे अंतर! परंतु माझ्या घरचा व्यवहार अचुक जाणून तसेच माझे अतिथ्य करावे ही सामान्य कोटीची शक्ति नव्हे. असे तिचे अनेक अनुभव मला आले. साहजिकच माझे मस्तक सदैव तिच्या चरणी नमलेले असे.

लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य या सुमारास प्रसिद्ध झाले ते मागवून मी वाचू लागलो. ते वाचताना अनेक गूढ प्रश्न उद्भवत आणि असा काही प्रश्न डोक्यात असताना मी राधाकृष्णआईकडे गेल्यास ती काही सामान्य व्यवहाराची गोष्ट बोलून माझ्या न सुटणाऱ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळे. कित्येकदा तिच्याकडे जाऊन उभे राहिल्यास आपोआप उत्तर स्फुरे. राधाकृष्णआईच्या शब्दद्वारा अथवा आपोआप प्रश्नाचा उकल होई. त्या अंधाऱ्या खोलीत विजेसारखे तेज चमके. आता मला समजते की या प्रकारे बाबा दिव्य रूपाने येऊन माझ्या प्रश्नाचे उत्तर देत.

या काळी माझे जेवढे आध्यात्मासंबंधी वाचन झाले होते त्यावरून व काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर व दुसऱ्या विद्वानांच्या समागमाने माझे निश्चित मत झाले की तत्वज्ञानात शंकराचार्यांचे अद्वैत दर्शन हेच ग्राह्य व निर्दोष आहे, बाकीच्या सर्व दर्शनात काही तरी उणीवा असल्यामुळे ती ग्राह्य नाहीत. मणिभाई नमुभाईंचे सिद्धांतसार या वेळी मी नीट वाचून काढले. त्यांची 'भगवद्गीता' पण वाचली. त्यावरून अद्वैत मत श्रेष्ठ आहे असे मी मानत असे. पूजा-अर्चा-तिलक वगैरे रामानुजांची चिन्हे पाहून भक्ति फक्त द्वैतातच आहे असा चित्तात संशय असे. कदाचित मला कोणीतरी द्वैत संप्रदायात जखडून टाकेल अशी धास्ती त्याकाळी मला असे. राधाकृष्णआईची भक्ती, चावडीसमयी सर्वांना तिलक लावण्याची तिची रीत पाहून ही अद्वैतपंथी नसून विशिष्टाद्वैती किंवा व्रल्लभसंप्रदायी असावी असे वाटले. सर्व संतांचे भक्तिरसाने ओथंबलेले ग्रंथ वाचे तेव्हा पण अशीच शंका येई. ज्ञानेश्वर महाराजांसारख्या विषयी सुद्धा मी साशंक असे. नंतर अमृतानुभव वरील शिवाची टिका मी वाचली. ज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तिनाथ यांची गुरुपरंपरा पाहून हा संशय कित्येक अंशी दूर झाला. बाबांचे कडक वैराग्य, सर्वज्ञता, अनुद्वेगकर सत्य व प्रिय वचन, येणाऱ्या जाणाऱ्यांच्या कल्याणाची चिंता, आर्त भक्तांसाठी कष्ट सहन करून दुःख टाळण्याचा त्यांचा नित्य स्वभाव बघून मी त्यांना साकार ईश्वर लेखत असे. बाबा स्वतः 'अल्ला मालिक अल्लासे कोई बडा नहीं. गरीबोंका अल्ला वाली. करेल तो भरेल. स्वर्ग नरक काही आहे,' वगैरे म्हणत. त्यांचे एकही वचन मला मिथ्या वाटले नाही. त्यांनी हसत हसत सांगितलेली गोष्ट खरीच होई. त्यामुळे त्यांच्याविषयी वाटले की जो मार्ग ते दाखवतील तो सत्यच असेल व त्याच रीतीने मला ईश्वर साक्षात्कार होईल. तरीही त्यांच्या प्रार्थना लोकांना नामस्मरणाचा उपदेश करताना वारंवार काही चांगले केले अथवा चांगले घडले तर ते म्हणत हे तर ईश्वराने केले. यावरून बाबांचे प्रबोधन द्वैत आहे की अद्वैत अशा प्रकारची शंका माझ्यासमोर उभी राहली तेव्हा बाबांनी मला सेवेसाठी राधाकृष्णआईकडे पाठविले त्यावेळी एकदा तिने स्वतःचा इतिहास सांगून 'शाळा' शब्द वापरला ती म्हणाली,

"साईबाबांचे नाव मी विधवा झाल्यानंतर ऐकले. माझा विवाह झाल्यावर तीनचार किंवा आठ दिवसांतच मी विधवा झाले. नंतर मी माझ्या मामाकडे रहात असे. ते पंढरपुरात वकिली करत. मी धार्मिक ग्रंथ वाचे, भजन-पूजनात वेळ खर्च करी आणि

दुपारी गर्दी नसे तेव्हा देवाच्या दर्शनाला जात असे. बाबांचे नाव ऐकल्यानंतर त्यांची भक्ति करू लागले. त्या काळी मी खूप खाई व पोट फुगून तडस लागे तेव्हा 'साईबाबा, साईबाबा' नावाने पुकार करी व जमीनीवर लोळे. एका रात्री मला काही स्वप्न पडले व माझे वैराग्य जागृत झाले. उठल्यावर माझ्या शरीरावरचे दागिने उतरून मी इकडे तिकडे फेकले व घर सोडण्याची तयारी केली. सर्वांनी मला पुष्कळ समजावले परंतु मी माझ्या निश्चयापासून ढळले नाही. नेसत्या वस्त्राने मी घराबाहेर पडले व चारी धामांची यात्रा अयाचित व्रत पाळून केली. क्वचित प्रसंगी खायला मिळत नसे तेव्हा शेण खाऊन मी मनाचे समाधान करी. पैशाला शिवत नसे. दान करू इच्छिणाऱ्याला तिकिट काढून देण्यास सांगे. पांडुरंगाने हे कठीण व्रत माझ्याकडून पाळवून चारी धामांची यात्रा करून घेतली. नंतर येथे आले व बाबांसमोर तुकारामाचे अभंग गाऊ लागले. त्या काळी बाबांच्या लेंडीला जाणाऱ्या रस्त्याची तसेच चावडीची साफसफाई बाबांचा एक परम भक्त नेवासकर करी. नेवासकरांचे साफसफाईचे काम मी हळुहळू हाती घेतले व त्यांचा मृत्यू झाल्यावर मी एकटीच ते काम करू लागले. ग्रामस्थ जायच्या वाटेवर रस्त्याच्या बाजूला शौचाला बसत, मुलांना बसवत, कचरा टाकत, ती सर्व घाण मी नेवासकरांप्रमाणे साफ करी. मी शाळेत राही. तेथे तुलसी लावल्यामुळे त्या जागेला शाळा अथवा वृंदावन या नावाने लोक ओळखत. मी बाबांसमोर जात नसे. पण दुरून ही साफसफाई करे. एकदा मी खूपच आजारी झाले. थंडीने ताप आला व अशक्तपणा येऊन मी झोपले होते तेव्हा बाबा तेथे आले व माझ्या कपाळाला उदी लावून 'एवढी मेहनत करू नये. आता आराम करा, वगैरे म्हणाले.'

या नेवासकरांचे जीवन अत्यंत बोधप्रद आहे. ते बाबांचे अनन्य शरणार्थी होते. त्यांच्या शेतात जे पीक निघे ते सर्व गाडीत भरून शिरडीला घेऊन येत व त्यातील जेवढे धान्य बाबा त्यांना देत ते आपल्या घरी घेऊन जात. घरी पत्नीला, मुलाबाळांना कपडेलत्ते जे करायचे ते सर्व बाबांच्या आज्ञेनुसार करीत. पुढे एकदा सर्व सोडून ते शिरडीला आले परंतु बाबांच्या सांगण्यावरून घरी परतले. शेवटी शेवटी त्यांनी अन्नपाणी वर्ज केले. बाबांनी पाठविलेला भाकरीचा प्रसाद तेवढाच ते खात व बाबांच्या चरणाचे तीर्थच पाण्याऐवजी पीत. अंतकाली भगवद्‌गीतेतील आठव्या अध्यायातील १३ व्या श्लोकात 'ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्' या पंक्तीत सांगितल्याप्रमाणे देह ठेवून ते परम गति पावले. धन्य ते जीवन.

एकदा बोलता बोलता राधाकृष्णआई म्हणाली, "तू बाबांची खरी नक्कल आहेस" त्याने मला संतोष झाला नाही. मला विचार आला की नक्कल असण्यात काय पुरुषार्थ, आपण तर अस्सल असले पाहिजे. अंतर्साक्षी राधाकृष्ण आई लगेच म्हणाली, "आपण सर्व त्यांची नक्कलच आहो. अस्सल तर तेच (बाबाच) आहेत."

(क्रमशः)

# "साक्षात्कारी स्वप्ने"

— श्रीमती ताराबाई ह. मांजरेका
झरीहर भैय्याची चाळ, कोलडोंगरी
सहार रोड, गल्ली नं. १
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०६९.

मी गेली ११ वर्षे प्रकाशानंद आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये मसाजीस्ट नर्स म्हणून काम करीत आहे. त्यापूर्वी माझा मोठा मुलगा बांद्रा कॉलेजमधून घरी येते वेळी रेल्वे अपघातात देवाघरी गेला. आता मला २ मुलगे व १ मुलगी आहे. मुलाला देवाघरी जाऊन १ वर्षे व्हायच्या आत माझे पती बहारीन येथे कामासाठी गेले असता स्वर्गवासी झाले. त्यामुळे मी खूप खचून गेले होते. पण त्यानंतर हिंमत करून मी मसाजचा कोर्स केला व वरील हॉस्पिटलमध्ये काम करू लागले. पण १ वर्षानंतर आम्हाला कामावरून कमी करण्याची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा मी दुःखाने वेडीपिशी झाले. कारण मुलं लहान होती. त्यांचे शिक्षण व्हायचे होते. मी रात्रंदिवस मनात चिंतन करू लागले.

अशीच चिंतेत एके रात्री झोपले असता मला अद्‌भूत व आनंदाचे स्वप्न पडले. सकाळची वेळ, मी रस्त्याने रडत रडत चालले आहे. पूर्व दिशेने भगवी कफनी घातलेला, चोहोबाजूला प्रकाशाचे वलय असलेला, हातात कमंडलू व खाकेत झोळी असलेला एक फकीर येत होता. मी त्याच्याकडे दुर्लक्ष करून पुढे चालले आहे. पण त्यानेच मला थांबविले व हिंदीत म्हणाला "बेटी क्यूं रो रही है" मी म्हटले "तुम्हे क्या करना है? मेरी चिंता मुझे है" तेव्हा तो फकीर म्हणाला "जा बेटी घर जा मुझे सब मालूम है। पीपलके पेडके निचे हनुमान है उसे तेल डाल दे जा तेरी सब चिंता मीट जायेगी।" स्वप्न संपले. तो फकीर म्हणजे प्रत्यक्ष साईबाबाच होते. त्यानंतर एके दिवशी हॉस्पिटलच्या विश्वस्तांनी मला बोलावून सांगितले की, हॉस्पिटलमधील आतील विभाग बंद करून ओ.पी.डी. चालू ठेवण्याचा त्यांनी निर्णय केला आहे, व त्यात मसाज स्टिमबाथ डिपार्टमेंट चालू ठेवण्याचा विचार पक्का केला आहे. तेव्हा माझ्या व्यतिरिक्त मला हव्या त्या व्यक्तीस मी मदतनीस म्हणून घेऊ शकते. तेव्हा मी वॉर्ड बॉयजमधल्या एका वृद्ध इसमाला निवडून दिले व तो आताही माझ्याबरोबर काम करतो. अशाप्रकारे माझी नोकरी स्थिर राहीली. मुलेही मोठी होऊन, मोठा मुलगा रंजन हा म्युनिसिपालटी वर्कशॉपमध्ये मॅकेनिकल स्टाफ आहे. दुसरी मुलगी छाया के.इ.एम. हॉस्पिटलमध्ये नर्सींग करत आहे व धाकटा प्रेमनाथ १२ वीत आहे. अशा तऱ्हेने साईंनी आपले वचन पूर्ण केले.

त्यानंतरचे स्वप्न म्हणजे, तोपर्यंत आम्ही शिरडीला गेलो नव्हतो. पण जेव्हा माझे पती देवास प्रिय झाले व नंतर वरील स्वप्नाप्रमाणे साईंनी वचन पूर्ण केले. तेव्हा शिर्डीला जाऊन त्यांचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. पण पैशाची टंचाई तीन मुले व मी मिळून चौघांचा खर्च करण्याची त्यावेळी माझी ऐपत नव्हती. पण मनाने साईदर्शनाचा ध्यास घेतला होता. एके रात्री स्वप्न पडले की, आम्ही सर्व शिर्डीला गेलो

आहोत व समाधीमंदिरात प्रवेश केला तोच साई महाराज समाधीच्या खालच्या पायरीवर उभे राहून स्वतः "या" या" म्हणून आमचे स्वागत करत होते. हे स्वप्न पाहून मी शिर्डीला जायचा विचार पक्का केला, व माझे सोन्याचे मंगळसूत्र जे माझ्या कामाचे नव्हते ते गहाण ठेवून मी सर्वांना घेऊन शिर्डीला गेले व सांगायची विशेष गोष्ट म्हणजे स्वप्नातील समाधीमंदिरात व प्रत्यक्ष मंदिरात काहीच फरक नव्हता. साईचे डोळे भरून दर्शन घेऊन माझे जीवन कृतार्थ झाले. त्यानंतर दरवर्षी मी शिर्डीला जाते व बाबांचे अमाप आशिर्वाद् घेऊन येते. शिर्डी सोडताना मला माहेर सोडल्यासारखे वाटते मी रडत यायला निघते. तेव्हा मुलं मला बघतच रहातात. शिर्डी पाहिल्यानंतर मी पंढरपूर, गाणगापूर, तुळजापूर, सर्वत्र जाऊन दर्शन घेऊन आले व गेल्या महिन्यातच मी काशी, प्रयाग, अयोध्या व हरीद्वारला जाऊन आले. ही सर्व साईबाबांची कृपा आहे. तसेच यात लिहिण्यासारखे विशेष म्हणजे प्रयागला जाण्याच्या २ वर्षापूर्वी मला स्वप्न पडले होते. त्यात श्री. हनुमंतानी मला स्वतःच्या खांद्यावरून सर्व डोंगरातून फिरवून मोठमोठी देवळे दाखविली होती आणि आता मी सध्या जी देवळे अयोध्या, काशीला पाहून आले ती अगदी तशीच्या तशीच होती. संकटमोचतनेच (हनुमान) दर्शन घेऊन व रामजन्मस्थान पाहून मी जीवनात धन्य झाले.

असेच एका स्वप्नात श्रीराम प्रभू व साईबाबा दोघे माझ्या घरात आजूबाजूला बसले आहेत. मी साईबाबांना शेंडीवाला नारळ दिला. साईंनी लगेच मला बिनशेंडीचा नारळ परत केला. साईंनी मला विचारले तुला काय पाहिजे? मी म्हणाले, आता मलां कसलीच अभिलाषा नाही मी तृप्त झाले आहे. पण तुंम्ही मला आपल्या हृदयात ठेऊन घ्या व कधीच अंतर देऊ नका. त्याप्रमाणे सद्गुरूंनी मला आपल्या छातीशी घट्ट कवटाळले. तेव्हा खरोखरच श्वास कोंडल्यामुळे मी जागी झाले. तो अनुभव अक्षरशः खरोखर वाटत होता.

माझ्याप्रमाणेच सर्व साईभक्तांवर त्यांची अशीच कृपादृष्टी राहो.

# आरती श्री साईची

जय जय आरती साईनाथा॥धृ० ॥
तूचि ब्रम्हा सृष्टी निर्मित। विष्णुरूपे पोषिसी जगता
त्रिपुरांतक तू सृष्टिहर्ता। तूचि देवाधिदेव साईनाथा॥१ ॥
कलियुग साईरूपात। प्रकटुनी जगा उद्धरीत
तूच भक्तजनात। शिरडीनिवासी साईनाथ॥२ ॥
विश्वरूपे तूचि नटलासी। चित्‌रूपे जीवांत राहसी॥
देसी आनंद सुनंदासी। सच्चिदानंदा साईनाथा॥३ ॥

— डॉ. सुनंदा कुलकर्णी
१/वसंतबहार, नामदेव वाडीसमोर,
नौपाडा, ठाणे.

# श्री. खापर्डे यांची शिरडी दैनंदिनी

अनुवादक - साईनंद

शुक्रवार दिनांक २९-१२-१९११

मी आज उशिरा उठलो व नंतर श्री. नाटेकर यांचेबरोबर बोलत वसलो. त्यांना आम्ही 'हंसा' आणि 'स्वामी' या नावाने हाक मारीत असू. यामुळे मी माझी सकाळची प्रार्थना इ. आटपू शकलो नाही आणि साई महाराजांना ते बाहेर पडल्यावर वेळेवर मी पाहू शकलो नाही. ते मशिदीत परतले तेव्हा मी त्यांचे दर्शन घेतले. हंसा माझे बरोबर होता. साई महाराज चांगल्या मनस्थितीत होते त्यांनी एक सूचनात्मक गोष्ट सांगावयास सुरुवात केली खरी पण एवढ्यात त्रिंबकराव ज्यांना आम्ही 'मारुती' म्हणतो ते दुर्दैवाने कडमडले. अगदी मूर्खपणाने आणि मग साईमहाराजांनी विषयाचा रोख बदलला. ते म्हणाले, एक तरुण होता. तो भुकेलेला होता त्याला जे दिसेल ते हवे हवेसे वाटे. एकदा तो तरुण हिंडता हिंडता साई साहेबांच्या वडीलांच्या घरी गेला तिथे त्याचे स्वागत होऊन त्याला जे हवे हवे ते सारे काही देण्यात आले. त्या तरुण मुलाने काही काळ तिथे घालविला तो लट्ठ झाला. त्याने तिथे काही वस्तू गोळा केल्या. दागदागिने चोरले आणि त्या सर्व वस्तूंचे एक गाठोडे करून तो जिथून आला होता त्या ठिकाणी परत जाण्याची इच्छा त्याने प्रदर्शित केली. वास्तविक खरोखरच तो तिथेच जन्मला होता आणि साईबाबांच्या वडीलांच्या घराशी संबंधित होता. पण हे त्याला माहित नव्हते. त्या मुलाने ते गाठोडे रस्त्यावर येऊन एका कोपऱ्यात आडोशाला ठेवले. परंतु तो प्रत्यक्ष निघण्यापूर्वीच ते सारे काही त्यापूर्वीच दिसण्यात आले. म्हणून त्याला निघावयास उशीर झाला. इतक्यात दरम्यानच्या वेळात काही चोरांनी ते गाठोडे उघडून त्यातील दागिने पळविले. तो आता एवढ्यात निघणार तोच त्या चोरांनी पलायन केल्यामुळे तो त्यांना पकडू शकला नाही. म्हणून तो पुन्हा घरात आला. आणखीन दागिने गोळा केले आणि प्रत्यक्षच ते घेऊन निघाला. पण रस्त्यात त्या लोकांनी चोरी करून आणलेल्या त्या दागिन्यांच्या संशयामुळे त्याला पकडून ठेवले. अगदी याच वेळी या गोष्टीला निराळे वळण लागले आणि ती थोडक्यात आटोपली पण!

दुपारच्या आरतीहून आल्यावर मी हंसाला मजबरोबर त्याचेही भोजन घेण्याची विनंती केली, व ती त्याने मान्य केली. माझे निमंत्रण त्याने स्विकारले. तो एक अतिशय साधा माणूस आहे. भोजनानंतर आपल्या हिमालयातील प्रवासाची हकीगत तो सांगू लागला. आपण मानस सरोवराला कशी भेट दिली. तिथे 'गाईले जाणारे' उपनिषदांचे स्वर आपण कसे काय ऐकले. पावलांच्या ठशावरून आपण पुढील वाटचाल कशी केली. एका गुहेत कसे काय जाऊन पोचले नि तिथे महात्म्यांचे दर्शन कसे काय झाले. तो महात्मा लो. टिळकांना त्या दिवशी मुंबईत झालेल्या अटकेच्या आरोपाबद्दल काय काय बोलला, त्या महात्म्याने आपल्या बंधूची (आपल्या बरोबरीच्या वयस्क विद्यार्थ्याची) ओळख कशी करून दिली, सरतेशेवटी तो आपल्या गुरुला कसा काय भेटला नि 'कृतार्थ' झाला.

नंतर आम्ही साईबाबांकडे गेलो आणि मशिदीत त्यांचे दर्शन घेतले. त्यांनी मला आज दुपारी निरोप पाठवून सांगितले की तुला आणखीन दोन महिने येथेच रहावे लागणार आहे. त्यांनी पाठविलेला निरोप तो दुपारीच पक्का करून घेतला आणि म्हणाले की आपल्या 'उदीत' फार मोठे आध्यात्मिक गुणधर्म आहेत. ते माझ्या पत्नीला म्हणाले एकदा एक राज्यपाल भाला घेऊन आले. साई महाराजांची व त्यांची झोंबाझोंबी झाली त्यामधे त्यांनी त्यांना बाहेर हाकलले शेवटी त्यांची व गव्हर्नरांची तडजोड झाली. ती भाषा मोठी अलंकारिक होती व समजण्यासही काहीशी कठीण होती.

सायंकाळी आम्ही शेजारतीला हजर होतो. तेथून परतल्यावर भीष्मांचे भजन व दीक्षितांच्या रामायणाचे कार्यक्रम ऐकले.

## शनिवार ता. ३०-१२-१९११

मी सकाळी उठलो. प्रार्थना केली व त्यानंतर दोन पत्रे लिहीली. एक माझा मुलगा बाबा याला. व दुसरे भाऊ दुराणी यांना. आपण आता आणखीन दोन महिने येऊ शकणार नाही असे त्यांना कळविले. श्री. नाटेकर राधाकृष्णा आईकडे गेले. पण ती कुठेतरी त्यावेळी बाहेर गेली होती म्हणे. तेव्हा ते तिथेच बसून राहिले ते कमालीचे शांत होते. त्यांनी आपला संपूर्ण दिवस तिथेच घालविला. सकाळी मी रामायण वाचले आणि दुपारी भागवत ऐकले आणि सायंकाळ होण्यापूर्वी साई महाराजांचे दर्शनास गेलो. त्यांनी मला चांगल्या रितीने वागविले. माझ्या नावाने त्यांनी हाक मारली आणि एक छोटीशी गोष्ट सबुरीच्या पुष्टी दाखल जोर देऊन सांगितली.

ते म्हणाले, आपण औरंगाबाद येथे गेलो होतो. आपल्या तिथल्या फेरीत आपण एक फकीर मशिदीत बसलेला पाहिला. त्याच्या लगतच एक उंचच उंच चिंचेचे झाड होते. तो फकीर प्रथम त्यांना मशिदीत प्रवेश करू देईना पण मग शेवटी त्यांना तिथे उतरण्यास मान्यता दिली. तो फकीर तिथे एका चतकोर भाकरीच्या तुकड्यावर राहिलेला होता. तो तुकडा त्याला एक म्हातारी बाई दररोज दुपारी आणून घालत असे. साईमहाराजांनी केवळ त्याचेसाठी भिक्षा मागायला सुरुवात केली. बारा वर्षे असे करून त्यांनी त्याला भरपूर खाऊपिऊ घातले आणि मग त्यांनी तेथून निघण्याचा विचार केला. त्या म्हाताऱ्या फकीराचे डोळ्यात त्यावेळी अश्रू उभे राहिले. तेव्हा त्याचे त्यांनी मृदू शब्दात सांत्वन केले. पुन्हा साई महाराजांनी नंतर चार वर्षांनी तिथे भेट दिली आणि त्या फकीराचे तिथे ठीक चालले आहे हे पाहिले. काही वर्षापूर्वी तो फकीर शिरडीस आला आणि चावडीत राहिला. आईच्या निष्ठेने तो फकीर श्री साईबाबांची काळजी घेऊ लागला. बाबा जे काही म्हणाले त्यावरून मी असा तर्क केला की बाबा औरंगाबादच्या या फकीराची काळजी वहाण्याकरिता बारा वर्षे औरंगाबादेस होते आणि मग त्यांनीच पूर्णपणे त्याला आध्यात्मिक क्षेत्रात आणले. रात्री भीष्मांचे भजन आणि दीक्षितांच्या रामायणाचा कार्यक्रम होता. नाटेकर तिथे होते त्यांनीही एक अध्याय वाचला.

## रविवार दि. ३१-१२-१९११

आज मी सकाळी फार लौकर उठलो. प्रार्थना केली आणि व्हरांड्यात येरझारा घालीत होतो तोच हंसा खालच्या तळ मजल्यावरून म्हणाले, आपल्याला रात्री झोपच मुळी लागली नाही आणि म्हणून फिरत फिरत खंडोबाच्या देवळात गेलो, आणि मग तेथून राधाकृष्ण आईच्या घरी तिथे तिची प्रार्थना ऐकायला मिळेल या आशेने गेलो. पण घरात कुणीच नसल्याची चाहुल लागली. तेव्हा ते गावाच्या फाटकापर्यंतच जाऊन माघारी आले. नंतर ते पुन्हा राधाकृष्णा आईच्या घरी जाऊन तिला भेटून आले. तिने कृपाळू होऊन त्यांना मदत केली. नंतर त्यांनी स्नान उरकले, प्रार्थना केली आणि राधाकृष्ण आईकडे बाबांनी जो प्रसाद पाठविला होता त्यातील प्रसाद खाऊन न्याहारी केली. त्यांचेशी बोलता बोलता मी उभा राहिलो. तो ते राधाकृष्ण आईकडे जातो म्हणून सांगण्यासाठी गेले. तेव्हा तिने त्यांना प्रसादादाखल धोतर आणि सदऱ्यासाठी कापड दिले. नंतर ते आपल्याबरोबरच्या तीन तरुणांबरोबर मुंबईला परतले. त्यापैकी एकाचे नाव होते रेगे. या सर्व प्रकारामुळे मला माझी नित्याची कामे उरकायला काहीसा वेळच झाला आणि मग न्हावी येऊन बसला होता त्याचेमुळे पुढे आणखीन उशीर झाला. मी बाबांना बाहेर जातांना पाहिले परंतु त्यांनी आपल्या जवळपास कुणालाच नमन करण्यासाठी सुद्धा जवळ येऊ दिले नाही. नंतर मी मशिदीत गेलो आणि दुपारची आरतीची पुजेची वाट पाहात बसलो. आज आरतीच्या वेळी सर्व पुरुषांना चौथऱ्याच्या खाली उघड्यावर उभे रहावे लागले व संपूर्ण मशिद महिलांसाठी खुली करून ठेवली. ही व्यवस्था फारच छान होती. आरतीहून परतल्यावर मी कोपरगावच्या येथे आलेल्या मामलेदार साहेबांबरोबर बोलत बसलो. नंतर डहाणूचे देव मामलेदार आले. आरती पूर्वीच नानासाहेब चांदोरकरही आले होते. आमचे भोजन नित्याप्रमाणे दुपारी २ वाजता झाले. त्यानंतर मी आज आलेली वर्तमानपत्रे वाचत बसलो. संध्याकाळचे सुमारास मी मशिदीत गेलो. परंतु साई महाराजांनी सर्वांना उदी दिली म्हणून मग मी नव्या इमारतीच्या जोत्यावर (पायावर) गोवर्धनदास यांचे बरोबरच्या गुजराथी शास्त्री बरोबर बोलत बसलो. साई महाराजांना ते नित्याप्रमाणे फेरफटका करण्यासाठी बाहेर पडले तेव्हा व शेजारतीचे वेळी आम्ही वंदन केले. नंतर भीष्मांचा भजनाचा व दीक्षितांचा रामायणाचा कार्यक्रम झाला.

## साईदरबारातील नवरत्ने — २

# परमसाईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर



**श्री. नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर हे श्री साईबाबांचे काळातले बाबांचे अतिशय लाडके असे परमभक्त होते. श्री बाबांचा त्यांचेवर वरदहस्त होता. नानांनी बाबांची फार मोठी हयातभर सेवा केली. २१ ऑगस्ट रोजी येणाऱ्या त्यांच्या ६५ व्या पुण्यतिथीनिमित्त नानांच्या संबंधीचा लेख प्रसिद्ध करून त्यांना आदरांजली वाहात आहोत.**

**— का. संपादक**



## परम साईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर

साईबाबांचे अतिनिकटचे स्नेही व भक्त म्हणून श्री. नानासाहेब चांदोरकर यांचे नावे घेतले जाते. त्यांचे संपूर्ण नाव श्री. नारायण गोविंद चांदोरकर. त्यांचा जन्म ठाणे येथे शके १७८२ इ.स. १८६० च्या पौष महिन्यातील मकरसंक्रांतीच्या दिवशी झाला. त्यांचे मराठी शिक्षण कल्याण येथे व इंग्रजी शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन विद्यालयात व त्या पुढचे एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. ते मुंबई विद्यापीठाचे बी.ए. पदवीधर. संस्कृत हा त्यांचा अतिशय आवडीचा विषय.

बी.ए. नंतर त्यांची नेमणूक प्रथम संगमनेर येथे मामलतदार कचेरीत कारकुनाचे जागेवर झाली. नंतर ते काही दिवसांनी नगर जिल्ह्यातील कोपरगावी अव्वल कारकून म्हणून नेमले गेले. १८९२ साली नगर येथे ते कलेक्टरसाहेबांचे चिटणीस झाले. पुढे १८९३ साली त्यांना पुणे जिल्ह्यात घोडनदी तालुक्याचे मामलतदार नेमण्यात आले. नंतर पुन्हा १८९४ ते १९०१ पर्यंत नगर जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांचे चिटणीस नेमण्यात आले. १९०२ मध्ये त्यांना जामनेर तालुक्याचे मामलेदार नेमले गेले. नंतर त्यांची बदली अनुक्रमे नंदुरबार, पंढरपूर इ. ठिकाणी मामलतदार म्हणून करण्यात आली होती. १९०८ साली त्यांची बदली ठाणे येथे डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर म्हणून झाली व १९१५ साली ते डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर या पदावरूनच सेवानिवृत्त झाले.

श्री. नानासाहेब यांचा विवाह १८७८ साली कल्याण येथे झाला. अलिबाग जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील पळसपे गावातील प्रसिद्ध श्रीमान सावकार व जमीनदार ओझे घराण्यातील श्री. विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे यांची कन्या बयाबाई यांच्याशी झाला. त्यांचे सासरचे नाव राधाबाई. नानांना बरीच अपत्ये झाली. पण अलीकडच्या काळापर्यंत चारच हयात होती. दोन चिरंजीव व दोन कन्यका. वडील चिरंजीव वासुदेव उर्फ बाबुराव बी.ए. असून ते विलेपारले येथील खाजगी आंग्ल विद्यालयात गणिताचे शिक्षक होते. धाकटे चिरंजीव महादेव उर्फ बापूराव पुणे येथील कृषिकर्म आंग्ल विद्यालयात शेतकीचे शिक्षण घेऊन घरची शेतीवाडी पहात असत. वासुदेवांचा विवाह ग्वाल्हेर येथील प्रसिद्ध जहागिरदार श्री. रामराव कृष्ण उर्फ काकासाहेब जठार यांची कन्या इंदिरा हिजबरोबर झाला होता व बाबुरावांचा विवाह धारवाड येथील वकील त्रिविक्रम काशिनाथ उर्फ तात्यासाहेब पित्रे यांची कन्या गिरीजाबाईशी झाला होता. वडील कन्यका सौ. मैनाबाई कुवळेकर या पुण्यास व धाकटी कन्या सौ. द्वारकाबाई पेंढारकर या सातारला दिल्या होत्या.

नानासाहेब कोपरगावी अव्वल कारकून असताना त्यांचा लहान मुलगा आजारी पडला. पण त्या वेळी तिथे रुग्णालय नसल्याने व वेळेवर औषधपाण्याची सोय न झाल्याने तो मरण पावला. औषधपाण्यावाचून येथल्या लोकांची बरीच गैरसोय होत असते, म्हणून की काय, नानांनी १८९० साली आपले स्वतःचे पैसे खर्च करून एक खाजगी रुग्णालय कोपरगावी काढले व ते १८ वर्षे चालवून पुढे लोकल बोर्डाच्या ताब्यात दिले.

## नानासाहेबांचे वडील

नानासाहेबांच्या वडलांचे नाव गोविंदपंत नाना उर्फ नानासाहेब असे होते. तेही डे. कलेक्टर होते. ते परसनल असिस्टंट होते. त्यावेळी त्यांना दप्तरदार ही पदवी होती. अद्यापही कल्याणास त्यांचे वाड्यास दप्तरदारांचा वाडा असे म्हणतात. ते फार सदाचारी, सत्त्वशील, व स्नानसंध्यादिकर्मनिष्ठ असत. त्यांचा रोजचा दानधर्म पुष्कळ असे.

## वडलांस संतानुग्रह

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कवाड क्षेत्र निवासी श्री समर्थ सद्‌गुरु सखाराम महाराज यांचे ते अनुग्रहीत होते. ते कवाडास नेहमी जात, व महाराजांची हरतऱ्हेची सेवा करीत. त्यांच्यावर महाराजांची कृपा असे. श्री. शंकरराव महाजनांचे सहवासाने ते महाराजांकडे जाऊ लागले. (आपटे कृत सखाराम म. चरित्र पान ९९).

पण नानासाहेब यांचे अंतःकरण ते नोकरीत असतानाच परमार्थाकडे वळून ते कवाडास श्री. सखाराम महाराज यांचेकडे न जाता शिरडीस बाबांकडे जाऊ लागले. हा तरी अनुवंशिक संस्कारच होय.

## बाबांचे आकर्षण

जरी नानासाहेबांचे वडिलांची सखाराम महाराजांवर अप्रतिम श्रद्धा व अलौकिक भक्ति होती तरी नानासाहेब हे सन् १८९२ सालापासून त्यांचे वडील हयात असतानाच बाबांकडे जाऊ लागले, नव्हे बाबांनीच त्यांना आपल्याकडे ओढले.

## नानासाहेब बाबांकडे येण्यापूर्वी मशिदीची व बाबांची स्थिती

जिकडे तिकडे खाच खळगे पडून ढोपर ढोपर कचरा साचलेल्या मोडक्या तोडक्या मशिदींत बसून रात्रंदिवस चिलीम फुंकणाऱ्या, गावात ३-४ विवक्षित घरी शिळ्या भाकरीचे तुकडे मागून खाणाऱ्या, अंगावर फाटके तुटके कपडे घालणाऱ्या फकिरास हे निर्गुण परमात्माचे सगुणावतार चिद्रत्न प्रतीक आहे असे कोण समजणार? आपल्यास लोकांनी मान द्यावा, किंवा ही एक अमुक विभूती आहे असे जगास ज्ञात व्हावे अशी ज्यांची इच्छाच नाही, कधी कधी गुप्त, तर कधी कधी कंटकमय बाभळीचे जंगलात वास करून वेड्याचे सोंग घेणाऱ्या फकिराकडे कोण येणार व त्यांचे सूक्ष्म निरीक्षण कोण करणार?

नानासाहेब शिरडीस बाबांकडे येण्यापूर्वी बाबा सिद्ध किंवा साधु पुरुष म्हणून कोणास माहीत नव्हते. गांवकरी व बाहेर गावचे लोकही त्यांना त्याप्रमाणे मानीत नसत. लोकांना दवा देणारा, धुनी पेटवून चिलीम फुंकणारा व मशिदींत बसून भीक मागून पोट भरणारा असा एक फकीर आहे यापेक्षा कोणासही त्यांच्या ऐश्वरी सामर्थ्याची जाणीव नव्हती.

फक्त श्री. गंगागीर बुवा व आनंदनाथ महाराज यांनी शिरडीस आल्यावेळी "अरे हा उकिरड्यावर पडलेला अमोल हिरा आहे व तुमच्या अद्वितीय भाग्याने तो तुम्हास लाभलेला आहे" असे मुक्त कंठाने लोकांना सांगितले होते. पण तिकडे लक्ष देतो कोण?

पुढे काही कालाने निमगांवचे नानासाहेब डेंगळे व निमोणचे नानासाहेब (देशपांडे) निमोणकर बाबांकडे येऊ जाऊ लागले.

## नानासाहेबापूर्वी सुशिक्षितांपैकी प्रथम कोण आले

सुशिक्षितांपैकी अगदी प्रथम कै. श्री. चिदंबरराव गाडगीळ, सिन्नरचे मामलेदार, रावसाहेब सीताराम विश्वनाथ पटवर्धन, बी.ए. शाळाखात्याचे मुख्याधिकारी व रावसाहेब वामनराव बोडस स्पेशल जज्ज. हे बाबांच्या दर्शनास आले होते.

श्री. चिदंबरराव गाडगीळ हे नगरास कलेक्टर साहेबांचे चिटणीस होते. त्यांची बदली पुढे मामलतदाराचे जागी झाली. व त्यांच्या चिटणिसीचे जागेवर नानासाहेब चांदोरकर नगरास आले.

## संत समागम परिणाम

नानासाहेब आपले वडिलांबरोबर लहानपणी कधी कधी कवाडास सखाराम महाराजांकडे जात असत. नोकरी लागल्यापासून मात्र ते तिकडे फारसे गेले नाहीत. आंग्ल विद्यादीप्तीने डोळे दिपून गेल्यामुळे पदवीधर सुशिक्षितांच्या मनाचा कल संताकडे कमीच. तथापि वडिलांच्या संगतीने संतसमागमाचा प्रभावशाली परिणाम नानासाहेबांचे मनावर झाल्याखेरीज राहिला नाही.

तालुक्याची जमाबंदी करण्याचे काम एकसाल प्रांताधिकारी यांजकडे व एकसाल जिल्हाधिकारी यांजकडे असते. नानासाहेब चिटणीसीचे कामावर असता कोपरगाव तालुक्याची जमाबंदी त्यांचेकडे होती. शिरडीचे आप्पा कुळकर्णी हे बाबांची आज्ञा घेऊन जमाबंदी करता नगरास जावयास निघाले. कलेक्टरचे चिटणीस कोण आहेत याबद्दल बाबांनी आप्पाजवळ चौकशी करून बाबांनी तुला बोलाविले आहे. असा माझा निरोप नानास सांग असे आप्पास सांगितले. आप्पांनी नगरास गेल्यावर बाबांचा निरोप नानासाहेबांस सांगितला. नानासाहेबांनी येत नाही म्हणून जबाब दिला; आप्पा परत आल्यावर त्यांनी ही हकीकत बाबांना सांगितली. बाबा म्हणाले बरे पुन्हा जाशील तेव्हां हाच निरोप नानाला सांग; या प्रमाणे तीन वेळा झाले. शेवटी नानासाहेबांनी येण्याचे कबूल केले.

पुष्कळ दिवस रद्दी म्हणून गाठोड्यात बांधून ठेवलेला व मानेवर थोडा फाटलेला अलपाकाचा कोट घालून ते एके दिवशी बाबांकडे यावयास निघाले. पण आपण एखाद्या संताकडे जात आहोत, की अप्पांच्या नादी लागून एखाद्या भणंग फकिराकडे जात आहोत; व संताकडे जात असू तर त्यांच्या पुढे ठेवण्यासाठी आपल्याजवळ काहीच नाही, अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनात डोकावू लागले. पुढे शिरडी जवळ जात असता सहज म्हणून त्यांचे हात खिशात गेले तो काय आश्चर्य! एक पुडी त्यांना सापडली. ती उघडून पाहाता तीत तीन-चार बदामबिया व तीन चार खडीसाखरेचे खडे त्यांना आढळून आले. त्यांना आनंद झाला. ते बाबांकडे गेले व बाबांना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्यापुढे ती पुडी ठेवून ते बाबांजवळ बसले व मला कां बोलावलं, म्हणून त्यांनी बाबांना विचारले,

"अरे, जगात एकच का नाना आहे व मी तुलाच कां बोलावले, याचं काही कारण असेलच, की नाही. तुझी व माझी चार जन्मांची संगती आहे. तुला माहीत नाही, पण मला माहीत आहे."

नानांचा या गोष्टीवर विश्वास बसेना. नानांच्या आग्रहावरून बाबांनी त्या पुडीतील थोडासा बदामाचा तुकडा व खडीसाखरेचा खडा ठेवून बाकीची पुडी नानांना परत दिली व आता असेच येत जा, असे नानांना परत जाताना सांगितले.

## प्लेग

पुढे काही दिवसांनी नगरास प्लेग सुरू झाला. व प्लेगची लस टोचून घेण्याकरिता कलेक्टर साहेबांनी नानासाहेबांस सुचविले. नानासाहेबांनी बाबांना विचारले. बाबा म्हणाले टोचून घ्यावे "आपल्याला काही होणार नाही." नानासाहेबांनी टोचून घेतले. त्यामुळे त्यांच्या कचेरीतील सर्व मंडळींनी टोचून घेतले व इतर सुमारे २-३ शे मंडळींनी टोचून घेतले. कोणास कांही झाले नाही. साहेबही खूष झाले. असे झाल्यावर नानासाहेबांची बाबांवर थोडीथोडी भक्ती बसूं लागली व बाबा म्हणजे नुसते फकीर नव्हेत असे त्यांना वाटू लागले.

एकदा नानासाहेब हरिश्चंद्राचे डोंगरावर देवीच्या दर्शनासाठी म्हणून गेले, पण डोंगराच्या मध्यावर आल्यावर त्यांना वरती चढवेना व खालीही उतरवेना, यातच तहानेने ते व्याकूळ झाले. ते एका दगडावर थकलेल्या अवस्थेत बसले. एवढ्यात एक मोळीविक्या आला. त्याच्याकडे पाण्याची त्यांनी विचारपूस केली, तेव्हा तू जिथे बसला आहेस, तिथे पाणी आहे, असे सांगितले व खरोखरच नाना जिथे बसले होते, तिथे पाणी मिळाले.

काही दिवसांनी नाना बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस गेले तेव्हा बाबांनी त्यांना य गोष्टीची आठवण करून दिली. तेव्हा नानांना बाबांचे खूप कौतुक वाटले व बाबांवरील त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊ लागली.

## वडिलांचे गुरु ब्राह्मण व चिरंजीवांचे मुसलमान. दिसण्यात विचित्र दृश्य.

नानासाहेबांचे वडील कवाडचे सखाराम महाराजांकडे जाणारे व नानासाहेब शिरडी बाबांकडे जाणारे. सखाराम महाराज ब्राह्मण व बाबा मुसलमान असा त्या वेळचा सम होता. या दोन गोष्टींचा मेळ बसावा कसा? बरे नानासाहेबही त्यावेळी लहान नव्ह बी.ए. होऊन नोकरी करीत होते. एकावेळी तर अशी मजा आली की नानासाहेबां वडिलांचा व कल्याणातील मुसलमान लोकांचा कांही कारणावरून बेबनाव झाला, म्ह त्या दिवसापासून आपण कोणाही मुसलमानाचे घरी जावयाचे नाही व कोणाही मुसलमा आपले घरी येऊ द्यायचे नाही असा त्यांनी निश्चय केला. त्याचवेळी नानासाहेब किरव रजा घेऊन कल्याणास आले होते. गावात नानासाहेबांचे पुष्कळ मुसलमान स नानासाहेब घरी आल्यावर त्यांना वडिलांचा निश्चय कळला. तेव्हा त्यांनी हळूच वड विचारले की मी मुसलमानांकडे जाऊ का नको. वडील म्हणाले तू त्यांचे घरी जा, पण त्यांना आपले घरी आणत जाऊ नकोस. नानासाहेब म्हणाले बरे प शिरडीस साईबाबांकडे जातो व ते तर मुसलमान आहेत मग मी त्यांच्याकडे जाऊ

नको! वडील म्हणाले त्यांचेकडे जात जा. तेच तुझे गुरु आहेत. वडलांनी असे सांगितल्यावर अर्थात नानासाहेबांना फार आनंद झाला.

## नाताळचे सुट्टीत सुशिक्षित भक्तांची बाबांकडे गर्दी व बाबांचे प्रसिद्धी करण

तोपर्यंत बाबा मुसलमान आहेत. असाच नानासाहेबांचा ग्रह होता. पण पुढे अतिसहवासाने व सूक्ष्म निरीक्षणाने तो साफ बदलला व बाबा हिंदु ब्राह्मण संन्यासी आहेत असा पूर्ण विश्वास बसून तो शेवटपर्यंत कायम राहिला.

नानासाहेबांना बाबांचे वारंवार अनुभव येऊ लागले व त्यामुळे नानासाहेब आपल्या बरोबर बाबांकडे येण्यास व सांसारिक व पारमार्थिक लाभ करून घेण्यास आपल्या पैकी ओळखीच्या पुष्कळ सुशिक्षित स्नेही व अधिकारी मंडळीस प्रेमाची व आग्रहाची विनंती करीत व त्याचप्रमाणे त्यांना आपले स्वानुभव व इतर भक्तांच्या संबंधाने बाबांनी केलेल्या अगम्य लीलावर ठिकठिकाणी प्रवचने करून त्यांचे मन बाबांकडे येण्यास वळवीत. हळू हळू पण अल्प काळातच हा सद्भक्तजन संमर्द गंगौघ शैलधीप रत्नाकराकडे झपाट्याने जाऊ लागला. विशेष करून हा स्वादु सरित्सागरसंगम बाबांचे पुण्य नगरीत प्रथम प्रथम कांही वर्षे नाताळचे सुट्टीत होत असे.

पुढे नानांनी शिरडीस एक छोटेसे घर बांधले व ते तिथे रहावयास जात. त्यांनी ठिकठिकाणी तंबू बांधून बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची सोय प्रथम केली. आपल्या पदरच्या खर्चाने त्यांनी एक खाणावळ काढली. बाबा निरनिराळ्या लोकांकडून, मारवाड्यांकडून रकमा आणून आपल्या भक्तांची योग्य ती संभावना करीत असत व नानासाहेब शिरडीस आले, म्हणजे त्यांना त्या रकमेची भरपाई करण्यास सांगत असत व नाना पण न कुरकुरता सारे पैसे चुकते करीत व मारवाड्यांच्या पोहोच पावत्या घेऊन त्या बाबांच्या चरणी अर्पण करीत. या व्यवहारानिमित्त बाबांनी नानासाहेबांना अनेक प्रकारचा उपदेश करून अनेक अनुभव दिले. नानांना बाबांच्याकरिता शिरडी कार्यासाठी अत्युकृष्ट भावनेने व अमर्याद प्रेमाने कमीत कमी दहा हजार रुपये खर्च केले. नानांनी बाबांची फार मोठी हयातभर सेवा केली. ता. २१-८-१९२१ रोजी श्रावण कृ. ४ शके १८४३ रोजी नानासाहेब कल्याण येथे आपल्या स्वतःच्या घरी श्रीसाईचरणी विलीन झाले.

श्रीसाईबाबा नानासाहेबांच्या जवळ स्पष्ट व मनमुराद बोलत असत. बाबांना प्रख्यातीस आणण्यास व त्यांची सुकीर्ती वाढविण्यास नानासाहेबच कारणीभूत आहेत, असे म्हणावे लागल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. बाबा मूळचेच अमोलरत्न; परंतु हे अमोल रत्न शिरडीसारख्या लहानग्या गावात पडले, त्यामुळे त्यावेळी त्यांची प्रसिद्धी जेवढी व्हायला पाहिजे होती. तेवढी झाली नव्हती; पण नानासाहेबांच्यामुळे अनेक पदवीधर व बडी बडी मंडळी शिर्डीस फार मोठ्या प्रमाणावर येऊ लागली व बाबांची उज्ज्वल अशी कीर्ती सगळीकडे पसरली. बाबांनी नानांना परमार्थाचे अनेक घडे दिले, अनुभव दिले, दृष्टांत पण दिले.

एकदा श्री बाबांनी नानांना 'तद्विद्धि प्रणिपातेन' या गीतेतील श्लोकाचे स्वतः विवरण करून सांगितले, ती घटना अशी :

एकदा नाना बाबांचे पादसंवाहन करीत असताना तोंडाने काहीतरी गुणगुणत असल्याचे पाहून श्रीबाबांनी त्यांना विचारले,

"अरे नाना, काय गुणगुणतो आहेस, जरा मोठ्याने तरी म्हण, आम्हाला पण ऐकू दे."

यावर नाना अदबीने म्हणाले,

"काही नाही, बाबा सहज गीतेचा पाठ म्हणत होतो,"

"असे का? छान?" श्रीबाबा उद्‌गारले व जो श्लोक नाना गुणगुणत होते, तो मोठ्याने म्हणण्यास व त्याचा अर्थ विशद करण्यास त्यांना सांगितले. तेव्हा बाबांच्या आज्ञेनुसार नानांनी पुढील गीताश्लोक मोठ्याने म्हणून दाखविला तो असा —

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः॥

(अ. ४ श्लोक ३४)

हा मूळ श्लोक म्हणून झाल्यावर नानांनी आपल्या परीने अर्थ सांगण्यास सुरूवात केली. ते म्हणाले,

"जो कुणी गुरुपदी प्रणिपात करून, स्वतःचे जीवित गुरुसेवेस वाहातो व आदराने प्रश्न पुसून स्वतःचे समाधान करून घेतो, त्याला ज्ञानीजन ज्ञानोपदेश करतात." असे सांगून नाना पुढे म्हणाले, बाबा माझ्या माहितीप्रमाणे गीतेच्या सर्व भाष्यकारांनी गुरुसेवा, गुरुप्रणति ही ज्ञानसंवित्तिदायक असल्याचे स्पष्टपणे सांगून जो कुणी या मार्गाने जाईल, त्याला तत्त्वदर्शी ज्ञानी ज्ञानाचा रस्ता जरूर दाखवितील, असे स्पष्टपणे आश्वासन दिले आहे.

श्रीबाबांनी हे स्पष्टीकरण ऐकून घेतले व म्हणाले,

"पहिल्या दोन चरणांचा अर्थ मला मान्य आहे; पण उत्तर श्लोकाचा जो अर्थ तू सांगितलास, तो माझ्या मते बरोबर नाही. 'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनं स्वत्त्वदर्शिनः या चरणात 'ज्ञान' शब्दाऐवजी 'अज्ञान' हा शब्द घेतला पाहिजे. वास्तविक हा चरणच उपदेक्ष्यन्ति तेऽज्ञानं ज्ञानि स्तत्व दर्शिनः असा असावयास हवा होता, अरे, असे पाहा, 'ज्ञान' हा काय बोलाचा विषय आहे, म्हणून त्याचा उपदेश करता येईल? 'ज्ञान' हे शब्दातीत असून 'अज्ञान' मात्र उपदेशाचा विषय होऊ शकते. भगवंतांनी गीतेत स्पष्टपणे सांगून ठेवले आहे, की ज्याप्रमाणे गर्भ वारेने वेष्टिलेला असतो किंवा आरशावर मळ, धूळ, साचलेली असते, तसेच ज्ञान हे अज्ञानाने वेष्टिलेले असते. ज्ञान दूर केले गेले, की ज्ञान स्वयंप्रकाशू लागेल. लक्षात ठेव, की 'ज्ञान' ही जाणावयाची वस्तू नाही, तसेच ती उपदेशांची पण नाही. फक्त प्रणिपात, परिप्रश्न सेवा ह्या गुरुकृपेच्या साधनांच्या माध्यमाने त्याचा उदय प्रत्येकाच्या अंतःकरणात होऊ शकेल."

आपल्या ह्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ रज्जू-सर्प, सुवर्ण-काट (सुवर्ण गंज) वगैरे उदाहरणे देऊन श्रीबाबा शेवटी म्हणाले,

"सारांश, अज्ञानाचा समूळ नाश झाल्यावर जे उरेल, ते शुद्ध ज्ञान असेल, हेच वर उद्‌धृत केलेल्या श्लोकाचे हद्‌गत आहे."

हे गोड निरूपण ऐकून नानासाहेब चांदोरकरांनी श्रीबाबांच्या चरणी लोटांगण घातले व दोन्ही हातांनी त्यांचे चरण वंदिले.

ही कथा श्रीसाईसच्चरित या साईबाबांच्या चरित्रग्रंथात अध्याय ३९ मध्ये आलेली आहे. ज्या अभिनव पद्धतीने वरील श्लोकाचा श्रीबाबांनी अर्थ विशद केला, त्यावरून त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व दिसून येते.

## कीर्तन रूपाने बाबांचे प्रसिद्धीकरण

श्री. गणपतराव सहस्त्रबुद्धे उर्फ दास गणूमहाराज त्यावेळी नगर येथे पोलीस खात्यात कारकून होते. त्यांना लावण्या करण्याचा फार नाद असे, नानासाहेबांचे लक्षात ही गोष्ट आली. नानासाहेबांनी त्यांचे मन कीर्तने करून बाबांची प्रसिद्धी करण्याकडे वळविले. नानासाहेबांचे घरी श्री. दामु अण्णा आठवले म्हणून लहान वयाचे पण गोड आवाजाचे ब्राह्मण होते. त्यांना दासगणू महाराजां मागे कीर्तनात साथीदार म्हणून दिले. या दुकलीमुळे कीर्तनात रंग चढून दासगणू महाराजांचा महाराष्ट्रभर जिकडे तिकडे बोलबोला झाला. या उपायाने बाबांच्या प्रसिद्धीकरणाचे सर्व श्रेय नानासाहेबांनाच आहे.

## भक्त लीलामृत व संतकथामृत रूपाने बाबांचे प्रसिद्धीकरण

पुढे कांही काळांनी बाबांनी श्री. दासगणू महाराजांना श्री. महिपती यांनी वर्णिलेल्या संताच्या चरित्रानंतरच्या संतांची चरित्रे वर्णन करण्यास आज्ञा केली व त्या चरित्राच्या छपाईचे काम करण्यास नानासाहेबांना आज्ञा केली. त्याप्रमाणे श्री. दासगणू महाराजांनी शक्य तितकी खटपट करून व जिवापाड श्रम करून ती चरित्रे त्यांच्या भक्तलीलामृत, संत लीलामृत व संत कथामृत या नावाच्या प्रसिद्ध ग्रंथात वर्णिली व त्यांच्या छपाईचे व प्रसिद्धीकरणाचे सर्व काम नानासाहेबांनी आपल्या पदर खर्चाने केले.

श्री. दासगणूकृत भक्तलीलामृत ३२-३३ या दोन अध्यायात व संत कथामृत अ. ५७ यात बाबांनी नानासाहेबांस केलेल्या व्यावहारिक व पारमार्थिक वेदांतोपदेशाचे अत्यंत सुरस, सुंदर व रसाळ वर्णन आहे. हे ही एक प्रकारचे बाबांचे स्वतंत्र प्रसिद्धीकरण आहे.

## साठे साहेब यांचा वाडा

बाबांची प्रसिद्धी जसजशी जास्त होऊ लागली तसतशी नानासाहेबांनी भक्तगणांकरता केलेल्या उतरण्याच्या व खाण्यापिण्याच्या सोई अपुऱ्या पडू लागल्या. श्री. हरी विनायक उर्फ तात्यासाहेब साठे जमीन महसूल स्मृतिकार यांना बाबांचा अनुभव आल्यामुळे व वरील गैरसोय त्यांच्या नजरेस आल्यामुळे त्यानी भक्तांच्या उतरण्याच्या सोयीसाठी शिरडीस एक चौसोपी वाडा बांधला. नंतर पुढे काही कारणांनी त्यांनी तो श्री. रामकृष्णपंत नवलकर मुंबई हायकोर्ट वकील यांना विकला.

## काकासाहेब दीक्षितांचा वाडा

तसेच नानासाहेबांचे अत्यंत व जिवलग आंग्लविद्या उच्चपीठ स्नेही कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित हे १९०९ सालात नानासाहेबांच्या विनंतीवरून बाबांच्या दर्शनास

शिरडीस आले. त्यांच्याही लक्षात भक्तगणांच्या उतरण्याची गैरसोय आली व त्यांनी लागलीच तेथे एक दोन चौसोपी वाडा बांधला व त्यात पुष्कळसे भक्तगण सहकुटुंब अल्पकाळ राहतील अशी व्यवस्था केली.

## नानासाहेबांवरील बाबांचे अद्वितीय प्रेम

बाबांचे नानासाहेबांवर व नानासाहेबांचे बाबांवर अलोट व अप्रतिम प्रेम असे, हे वरील विवेचनावरून लक्षात येईलच व अशा सद्गुरु व सच्छिष्यांची जोडी सापडणे अति दुर्लभ.

**''मनुष्याणां सहस्रेषु कश्चित् यतति सिद्धये ॥**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः ॥**

**अर्थ** :— हजारो मनुष्यात मत्प्राप्तिसिध्यर्थ एखादाच प्रयत्न करतो व असा प्रयत्न करणाऱ्या हजारो सिद्ध पुरुषात मला एखादाच खरोखर जाणतो॥ श्री. भ. गी. श्लो. ३ अ. ७ त्याचप्रमाणे.

**बहूनांजन्मना मंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ॥**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः'' ॥**

**अर्थ** :— पुष्कळ जन्मानंतर मला ज्ञानी भक्त मिळतो. व वासुदेवमय सर्व विश्व आहे असे जाणणारा महात्मा भक्त तर अतिशयच दुर्लभ असतो. श्री. भ. गी. अ. ७ श्लो. १९.

वरील जोडी पुष्कळांशी तशीच दुर्मिळ समजण्यात अतिशयोक्ति होणार नाही.

बाबांनी नानासाहेबांस काय काय अनुभव दिले आहेत व अमोल उपदेश केला आहे त्याचे वर्णन जितके करावे तितके थोडेच. परंतु चार पाचशे वर्षांपूर्वीच्या संत चरित्रात ज्या आपण सद्गुरुंच्या लीला ऐकतो की नाथांचे घरी पैठणास पांडुरंग हे श्रीखंड्या या नावाने श्री गोदावरीचे पाणी कावडीने वाहून देव पूजेकरता गंध उगाळून ठेवीत असत, सद्भक्त दामाजीपंताकरता पांडुरंगांनी मंगळवेढ्याच्या विठू महाराचे सोंग घेऊन बेदरचे बादशहाकडे पैसे पोचवून बादशहाची पावती दामाजीपंतांना दिली, सांवता माळ्याचे बागेत पांडुरंगांनी माळ्याचे काम केले, जनाबाईची लुगडी धुतली, त्याचप्रमाणे जामनेर गावी नानासाहेब मामलेदार असता त्यांच्या मुलीची (मैनाताई) बाळंतपणातून सुटका होण्याकरता नानासाहेब-बाबांचा धावा करीत असता बाबांनी शिरडीचे बापुगीर गोसाव्या बरोबर आरती व उदी देऊन बापुगिरास जळगाव स्टेशनवर पाठवून बाबा स्वतः आपणच तांगा, तांग्याचे घोडे, तांगेवाला, गुळपापडीचे लाडू, आंबे व पेढे घेऊन, बापुगिराजवळ ते फराळाचे सामान देऊन तांगा-घोडे तांगेवाल्यासह पुढे अंतर्धान पावले ही हकीकत अगदी अलीकडची आहे. ती श्री साईचरित्राचे ३३ अध्यायात वर्णिली आहे. त्यावरून नानासाहेबांवरील अलौकिक प्रेमाची ही बाबांची लीला आहे हे दिसून येईल. नानासाहेबांचे जिव्हेवर निरंतर बाबांचे नाव नाचत असे. ते बाबामय झाले होते.

नानासाहेबांच्या २१ ऑगस्ट रोजी येणाऱ्या ६५ व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांना भक्तांचे कोटी कोटी प्रणाम.

# संत सावतामाळी



बाल साईभक्तांनो, शके १२१७ आषाढ वद्य १४ ता. १२ जुलै १२९५ या दिवशी पंढरपूर जवळच्या अरणभेंडी येथील भगवद्भक्त सावतामाळी यांनी समाधी घेतली. लौकीक दृष्टीने त्यांचा देहान्त नवज्वरामुळे झालेला असला तरी ते महापुरुषाचे प्रयाणच होय. कारण अवतार संपवून देह सोडतांना त्यांनी आसन मांडून ध्यानमुद्रेत व समाधीमग्न अवस्थेत तो मांडला होता यामुळे अंती मती तीच गती या न्यायाने -ईश्वर चिंतनात मग्न असताना हे प्रयाण घडले असल्यामुळे असले महापुरुष ब्रह्मीभूत होतात - ते मर्त्य जीव उरत नाहीत.

इ.स. १२५० शके, ११७२ च्या सुमारास त्यांचा जन्म झाला. मुलाचे जातक पहाण्याकरिता पिता परसोबा आणि माता नागिता हे जोडपे शूचिर्भूत होऊन ब्राह्मणाकडे गेले असताना ज्योतिषानी "हे मूल मूळ नक्षत्रावर जन्मले असून ते तुमच्या मूळावर जन्मास आले आहे" असे भविष्य सांगितले. या मूळ नक्षत्राची भीति सामान्यतः सर्वांनाच वाटते म्हणून आईबाप घाबरले. त्यांना ज्योतिषांनी हे मूल टाकून देण्याचा सल्ला दिला.

पंढरपूरच्या यात्रेत नदी किनारी मूल सोडले तर कुणीतरी ते नेईल व त्याचा सांभाळ करील या हेतूने त्यांनी ते मूल दुपट्यात गुंडाळून वाळवंटी ठेवले. इतक्यात म्हाताऱ्या ब्राह्मणाचे रूप घेऊन भगवान त्यांच्या पाठीशी प्रगटले व त्यांना म्हणाले, अहो हे काय करीत आहांत?

त्यावर परसोबांनी हे मूल आमच्या मुळावर आलेले आहे म्हणून आम्ही ते सोडत आहोत असे उत्तर दिले. तेव्हा देव म्हणाले "असे न करता ते तुम्ही एखाद्या ब्राह्मणाला

किंवा मलाच दान कां देत नाही! दान दिल्याने मुलगा तुमचा उरणार नाही व मग तुम्हाला मूळ नक्षत्राचे भयही राहणार नाही. ते त्याच्या नव्या पित्याला राहील''

भगवंतांचा हा युक्तिवाद मातापित्यांना पटला, त्यांनी संकल्प सोडून ते मूल ब्राह्मणाच्या ओटीत घातले. त्याचा स्वीकार करून देव नागिता बाईस म्हणाले, ''आता हा मुलगा तुझा नव्हे. माझा झाला पण मी याला कसे काय पाजणार? तेव्हा मुलाची दाई म्हणून तू याला पाजण्यापुरते म्हणून मुलास घरी ने आणि एवीतेवी तुम्ही याचा त्यागच केला आहे तेव्हा तो तुम्ही 'सवता' (वेगळा) केला असल्यामुळे त्याचे नाव 'सवता' असे ठेवा व त्याचा प्रतिपाळ करा'' असे म्हणून देव अंतर्धान पावले.

इतक्यात तो ब्राह्मण अदृश्य झाला. मातापिता चकीत झाले. साक्षात् पांडुरंगानेच आपली काळजी दूर केली व त्यानेच आपल्या मुलाचा स्वीकार केला हे जाणून आईबापांनी मूल घरी नेले व ते देवास सोडल्याची खूण म्हणून त्याचे नाव 'सावता' ठेवले. यामुळे आपोआपच देव माझा मी देवाचा हा भक्ताचा अनन्यभाव सावता याच्या मनात बाळपणापासून पक्का रूजला व ते देवाचे अनन्य भक्त बनले. ते माळी जातीतले त्यामुळे मळ्यात शेतीचे काम करीत. पण ते करता करता विठ्ठलाचे नामस्मरण करीत. साक्षात् देव सावताबरोबर बोलत असत. एकदा मळ्यात काम करीत असताना त्यांनी हातातील विळ्याने आपली छाती चिरली. तो तीत देव प्रवेश करते झाले. पण मुद्दामच शेल्याचा पदर थोडासा बाहेर राखून. प्रेमाचा सागर असलेल्या सावतांनी जखम झाकली म्हणून धोतर गुंडाळले व वरती घोंगडी लपेटून ते आपल्या मळ्यातील मोटेकडे गात गात निघाले.

''लाडक्या हरी यावे माझ्याच मोटेवरी''

सावता माळ्यांच्या हृदयात प्रवेश करण्यापूर्वी नामदेव-ज्ञानदेव व विठोबा बोलत येत होते व सावतांच्या मळ्याकडे येताच देव म्हणाले मी सावताला मिनिटभरात बघून येतो पण थोडावेळ झाला तरी देव आले नाहीत म्हणून नामदेव-ज्ञानदेव मळ्यात आले व सावतांना म्हणाले, महाराज देव कुठे आहेत? तुम्हाला भेटण्याकरिता श्री हरी येथवर आले होते. तेव्हा सावता म्हणाले,

आले लिंबु कोथिंबिरी। अवघा झाला हरी।
कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।

नामदेवा मला तुझा देव कोठे दिसतच नाही. माझा मळाच मला देव आहे. नामदेव म्हणाले, काका! थट्टेवारी नेऊ नका! तुमच्याकडे गूळपाणी घेऊन येतो म्हणून ते म्हणाले व आम्हाला दोघांना झाडाखाली बसवून ते येथवर आले.''

सावता म्हणाले, ''विश्वव्यापक विठोबा! त्याला मी रे कोठे दडविणार! पहा साऱ्या कणगी, उतरंडी भांडीकुंडी॥ मी काही त्याला लपविला नाही. नामदेवांनी चोहोकडे बघितले मग त्यांच्या ध्यानी आले की सावताने घोंगडी पोटाशी लपेटली आहे. देव त्या घोंगडीत लपले असावेत. त्यांनी घोंगडी आढेवेढे घेऊन दूर केली. देवाच्या शेल्याचा पदर बाहेर

डोकावत असल्याचे पाहून हसत हसत नामदेव म्हणाले काका! धोतर दूर करा. देव त्यात लपले आहेत.

धोतराची पट्टी दूर करताच जखम उघडी पडली व ती पहाताच नामदेव भयचकीत झाले. ते म्हणाले "काका! कशाला हे धारिष्ट्य केलेत?"

यावर ज्ञानदेव म्हणाले, नामदेवा हे तुमच्याचसाठी, गुरु केल्यानंतरही ज्ञानी भक्ताचे भक्ती प्रेम नाश पावत तर नाहीच उलट ते भरभरून वाढते. याचा रोकडा प्रत्यय तुम्हास देण्यासाठी सावताकाकांनी देव पोटी साठवून आपले देवावरचे प्रेम मूर्त स्वरूपात व्यक्त केले.

नामदेव म्हणाले, "बाबांनो हे मला सारे पटले पण आता देवांना बाहेर काढा ना!" एवढे म्हणून त्यांनी सावता महाराजांपुढे धन्य धन्य म्हणत लोटांगण घातले. नामदेवांचा भ्रमनिरास झाला हे पाहून देव सावतांच्या पोटातून बाहेर आले आणि आपल्या करस्पर्शाने त्यांचे पोट होते तसे करीत नामदेवांना म्हणाले, नामदेव तुझी चिंता संपली ना! आता तू गुरु कर कसा!" यावर नामदेव म्हणाले, "देवा येथे तर दोघे गुरुच आहेत. मी कोणाला निवडू?" देव म्हणाले "तू आत विसोबा खेचरांकडे जा त्यांचा अनुग्रह तू घे." आणि म्हणून नामदेवांनी मोठ्या भक्तिभावाने व प्रेमाने

धन्य ते अरण चिद्रलाची खाण। जन्मला निधान सावता तो॥१ ॥
सावता सागर प्रेमाचा आगर। धरिला अवतार माळ्यावरी ॥ २ ॥
धन्य त्याची माता धन्य त्याचा पिता। साठविला त्राता त्रैलोक्याचा ॥३ ॥
नामा म्हणे त्याचा जन्म सुफळ झाला। वंश उद्धरला माळियाचा ॥४ ॥

या उद्‌गारात त्यांचे चरित्र गुणगान केले आहे.

तेराव्या शतकात पंढरीचा विठ्ठल लेकुरवाळा झाला होता. ज्ञानेश्वर, नामदेव, यांचे नेतृत्व लाभून प्रत्येक ज्ञातीमध्ये एक महान संत निर्माण झाला. 'देव भावाचा भुकेला। प्रतिकुल नाही त्याला।' असा सर्वांचा भाव असल्यामुळे जातिभेदाचे स्वरूप कमी होत होते. सावता माळी बागकामाचे आपले कर्तव्यकर्म करीत असतानाच वैकुंठीचा देव आणू या किर्तनी। विठ्ठल गाऊनी नाचे रंगी॥ एवढा आत्मविश्वास त्यांचेमध्ये निर्माण झाला. बागकाम करीत असताना 'माझी विठाई, कांदा मूळा, भाजी, लसूण, मिरची, कोथंबिरी' या रूपाने नटून आली आहे अशी ह्यांची भावना असे. मुलांनो, सावता माळ्यांनी खूप अभंग रचले. उदाहरणादाखल एक अभंग पहा.

सुखाचा सोहळा करूनी दिवाळी
प्रेम वनमाळी चित्ती धरू॥
सावंता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा॥
तेणे मुक्ति द्वारा वोळंगती

सावता माळी ज्ञानदेव व नामदेवांचे समकालीन होते. पंढरीस भागवत धर्म वाढीस लागला होता. तेव्हा सावताही पंढरपूरास येऊ लागले. नामदेवांचे किर्तन ऐकून ते पण अरणगावी किर्तन करू लागले. पण किर्तन किंवा उपदेश करण्याचा अधिकार काय तो ब्राह्मणाचाच असे म्हणून लोकांनी त्यांचा छळ करण्यास सुरुवात केली व त्यांनी

सावतोबांना कीर्तन बंद करावे अशी विनंती केली. पण सावतोबा ऐकेचनात तेव्हा लोकांनी त्यांची झोपडी, मळा ही पेटवून दिली. आपल्या सोन्यासारख्या मळ्याची राखरांगोळी झाली तरी सावतोबा आपले शांतच होते.

सावताबुवांच्या घरी जाऊन ज्ञानदेव-नामदेवांनी व पांडूरंगानी दर्शन दिल्यामुळे सावताबुवांची योग्यता मोठी यात शंकाच नाही. त्यांची समाधी अरणभेंडी येथे आहे. सोलापूर जिल्ह्यात मोडनिंब स्टेशन नजिक पुणे-सोलापूर मोटार मार्गावर हे लहानसे गाव आहे. आज तिथे सावतोबांचे मोठे मंदिर व मंडप आहे. सावताबुवांनी स्वतः फोडलेली विहिर मंदिरास चिकटून आहे. दरवर्षी तिथे पुण्यतिथीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो; व चैत्र वद्य एकादशीस द्वादशीस समाधीस्थानी चंदनाच्या उटीची यात्राही असते.

सदाचार, सदविचार व सत्कर्म यायोगे परमेश्वर प्राप्त होतो असा सावता बुवांचा दृढविश्वास होता, मुलांनो, हा सावता बुवांचा संदेश त्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने आपण आचरणात आणण्याचा प्रयत्न करू या.

# साईनाम ते गावे

साई नाम ते गावे, अंतरा तोषवावे
साई रूप पहावे, लोचना सुखवावे
साई तीर्थ प्राशावे, अमृत ते जाणावे
साई मूर्ति स्पर्शावे, धन्य धन्य हो व्हावे
साई तुमची कीर्ति, ऐकिली मी दिगंती
यावी मज प्रचीति, पटविती महती
म्हणूनि आलो शिर्डी तीर्थासि, तार म्हणे रे ह्या बालकासी
नको मजला मोह व माया, व्यर्थ ही रे कष्टण्यासी काया
देह न माझा, आत्मा न माझा, किंतु अहंकार मात्र माझा
अहंकाराचा व्हावा ॐकार, परमात्माचि व्हावा साकार
आत्मा अंशचि परमात्म्याचा, विलीन व्हावा अंतरी त्याच्या
ओढ ही जीवा ह्या साईदासा, तवदर्शनासी जो हा प्यासा

— श्री. गजानन मुरलीधर कुळकर्णी
पूजा ३/त/१९, जवाहरनगर,
जयपूर - ३०२ ००४.

# नमस्कार साष्टांग श्री साईबाबा

श्री. जनार्दन बांदेकर
रायगड निवास,
मुंबई.

श्री साईबाबांचे नाव न ऐकलेली अशी व्यक्ति हजारात एक मिळेल! सध्या बाबांचे लाखो भक्त (सेवक) आज भारतात नव्हे, तर बाहेर देशातही आहेत. ह्याची सत्यता जाणवते.

श्री साईबाबांचे चरित्र थोर लेखकांनी/भक्तांनी लिहिलेली आहेत, तर बाबांबद्दल अधिक ते असे माझ्यासारख्याने लिहिणे म्हणजे योग्य नाही तरी मला इच्छा झाली, आणि बाबांनी स्फूर्ती दिली म्हणून साईभक्तांपर्यंत हा माझा लेख पोहोचावा म्हणून साईलीला मासिकामधून पाठवीत आहे.

आजपर्यंत साईभक्तांची संख्या एवढी वाढली आहे, की शिर्डी क्षेत्री जाऊन पाहिल्याशिवाय विश्वास बसणार नाही. बाबांचे कुणीही भक्त झाले नसून बाबांनी आपल्या शक्तिने/मायेने माणसांना ओढून घेतलेले आहे. नोव्हें. १९७९ ज्यावेळी मी प्रथमच शिर्डीक्षेत्री गेलो त्यावेळेची भक्तांची गर्दी आणि मार्च १९८६ सालची भक्तांच्या शिर्डीला पाहिलेल्या रांगाच रांगा, आणि उत्सवांच्या दिवशी जमा झालेले भक्तगण पाहून डोळ्यांचे पारणे फिटून जाते. दिवसेंदिवस बाबांच्या भक्तांची संख्या वाढत आहे.

शिर्डी येथील समाधीला स्पर्श करताच बाबांचा मिळणारा आर्शिवाद जळत्या धुनी मधील भक्तांनी मस्तकाला लावलेल्या उदीची प्रचिती, शिर्डी क्षेत्री (गांवी) पाऊल ठेवताच मनाला होणारा आनंद शिवाय आज जो शिर्डी गांवाचा कायापालट झालेला दिसून येतो, अनेक मजली गगनचुंबी इमारती, (करोड रुपये किंमतीच्या) ह्या सगळ्या गोष्टी बाबांच्या आशिर्वादाशिवाय पूर्ण झाल्या नसत्या, मशिदीची द्वारकामाई झाली नसती हे सत्य आहे.

दुपारी/रात्रौ भक्तगण जो साईप्रसाद घेतात त्यानंतर कुणाही भक्ताची तक्रार नाही की, जेवणानंतर माझे पोट/डोके दुखते म्हणून आणि विशेष म्हणजे प्रसाद इतका स्वादिष्ट आणि रूचकर लागतो की खरोखरच बाबांच्या आशिर्वादाशिवाय हे शक्य नाही, हे भक्तांनी सत्य जाणावे. संसारात स्वतःच्या मेहनतीची चटणी-भाकरी खाऊन ज्याप्रमाणे मानसिक समाधान वाटते, त्याच प्रमाणे बाबांच्या आशिर्वादाने मिळालेला प्रसाद भक्षण केल्यानंतर एक प्रकारचा आनंद होतो.

भक्तांची बाबांवर जर पूर्ण श्रद्धा असेल तरच शिर्डी येथील बाबांच्या समाधीचे दर्शन मिळते अन्यथा नाही. बाबांची द्वारकामाई गुरूस्थान, गोड/कडू लिंबाचे झाड, लेंडीबाग, बागेतील बाबांची विहिर, ज्ञानदीप, दत्तमंदिर गणेश्वर मंदिर आणि खंडोबाचे देऊळ इत्यादींचे दर्शन झाल्यावर जो मनाला आनंद होतो त्याची किंमत करता येणार नाही आणि त्यामुळे भक्तांच्या व्याधी, दुःख, क्लेश इ. भार कमी होऊन मनाला समाधान

होते आणि एक प्रकारची शक्ति/उत्साह निर्माण होऊन बाबांच्या नावाने जप केल्याने मिळणारे गोड फळ!

कांही भक्त म्हणतात, आम्ही बाबांची रात्र-दिवस सेवा, भक्ती करतो परंतु आमच्यावर संकटे, दुःखे, कां यावीत? तर बाबांची मनोभावे सेवा, पूजा अर्चा, स्मरण, पूजापाठ केल्यामुळे, भक्तांवर येणारी संकटे कमी येतात आणि दुःखाची तीव्रता कमी होऊन मन खंबीर बनते. येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची ताकद येते. प्रसंग निघून जाऊन मानसीक सुख मिळते.

रामनवमी, गुरूपौर्णिमा, इ. बाबांनी चालू करून दिलेल्या उत्सवांना दिवसेंदिवस इतकी गर्दी लोटते की आकाशातील चांदण्या कमी पडतील. ह्याची शिर्डी गांवी गेल्याशिवाय सत्यता पटणार नाही.

शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी। हे जे बाबांचे वचन आहे हे त्रिकाल सत्य असून भक्तांनी श्रद्धा ठेऊन सबुरी घ्यावी म्हणजे मनातील सर्व हेतू सफल होतील.

श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरला जाणे म्हणजेच बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी शिर्डी गांवी येण्याइतकेच असून अशा थोर/महान संताला साष्टांग नमस्कार

# सर्वज्ञ, सर्वसाक्षी श्री साईबाबा!

**श्री. मधुसूदन अंबा**
अंबाडे हाऊ
लकडी पुलासमोर, बडो

(प्रत्यक्षात घडलेली एक सत्य घटना — साई चमत्कार! साई साक्षात्कार!)

श्रद्धा आणि सबुरी! श्रीबाबांनी आपणास दिलेला गुरुमंत्रच! जीवनरूपी रथाची वाकं! आध्यात्मिक जीवनाचे आधारस्तंभ! श्रीसाईबाबांचा चमत्कारा म्हणजे आत्म विशद करून सांगणारे अलौकिक उपायन! श्रीबाबा चमत्कारा द्वारे दृढ श्रद्धा, डो श्रद्धा निर्माण करीत असतात. चमत्कारचं बीजं, श्रद्धेचं रोपटं भक्तीच्या पाण्यानं अल्पाव आत्मस्थितीचा वृक्ष तयार करण्याचं कार्य स्वयम् बाबाच करीत असतात!

दृढ श्रद्धेअभावीच संकटसमयी आपण भयभीत होत असतो. पुन्हा भक्तीत होताच, श्रद्धा दृढ होताच भयरहितही होत असतो. किंबहुना श्रद्धेत भयमुक्त करण फार मोठं सामर्थ्य आहे! सबूरीचही सामर्थ्य तितकच! सबूरीने विचार नाही केला निर्णय चुकतो आणि मग अपयश पदरात पडतं. त्या अपयशाला तोंड देण्याचं सा पुन्हा श्रद्धेतच आहे. श्रीबाबांच्या ह्या अनमोल संदेशाचं महत्त्व आपल्या जीवनात आहे ते अंतरमूख होऊन जो जो विचार करावा तो तो आपोआप मनाला पटत

एखाद्या समर्थ ज्ञानी पुरुषाचं कथन वरवर विचार केला असता मनाला पटत नसलं तरी सबुरीमुळेच कालांतराने त्याचं आकलन होतं. विपूल संपत्ती, सत्ता, सामर्थ्य, स्वास्थ्य सर्व असून सुद्धा भयमुक्त होता येत नाही. संपत्ती येताच विपत्ती अनेक रीतीने येऊन उभी रहाते. कुणाला कसली तर कुणाला कसली, चिंता ही काही केल्या सुटत नाही. शेवटी बाबांनी दिलेला 'श्रद्धा-सबुरीचा मंत्र-दोर असेल तरच त्या आधारे भयरहित, चिंतारहित राहून आध्यात्मिक जीवनातील मुक्तीचं अत्युच्च शिखर सर करता येतं.

एखादा नास्तिक देवावर श्रद्धा ठेवत नाही, पण त्याचा आपल्या बुद्धीवर मात्र पूर्ण विश्वास असतो. त्याचा हट्ट असतो की आपल्या कुशाग्र बुद्धीला पटलं तरच त्यावर विश्वास ठेवावा; आणि मग अशा बुद्धीप्रधान वा नास्तिक व्यक्तीसाठी चमत्काराशिवाय दुसरा मार्ग कुठला?

आज आपण जी सत्यकथा वाचणार आहोत ती एका दाम्पत्याला आलेला अनुभव आहे. श्रीमती सरोजताई कस्तुरी (पत्ताः ५२/३३०, एलोरा पार्क, रेसकोर्स, बडोदे) ह्या मूळ आंध्रच्या रहाणाऱ्या. लहानपणापासून भाविक आणि सात्त्विक विचाराच्या. परम् श्रद्धा त्यांच्या हृदयमंदिरी नांदत आहे. बाबा आहेत, आणि ईश्वर आहेच असा भाव दृढ झालेला आहे. त्यांच्या निर्मळ आणि प्रेमळ वागणुकीतच श्रीबाबांचे सूक्ष्म अस्तित्व जाणवल्या वाचून रहात नाही!

सरोजताईंना बीना क्लिनीक, रेसकोर्स येथे दाखल करण्यात आलं होतं. आज लग्न होऊन सहा वर्षे होऊन सुद्धा पोटी मुलबाळ नाही. मुल व्हावं ही एकच दोघांचीही इच्छा. बाबांच्या कृपेने आपल्या घरात पाळणा का बरे हालू नये? बाबांचे नाव घेऊन त्यांनी डॉक्टरी ईलाज सुरू केले होते. 'मुला वाचून घर नाही' ह्या केवळ कल्पनेनं सामान्य बाईंच्या मनी सदैव आनंद! हीच भक्तीची सार्थकता! हेच नामस्मरण सामर्थ्य!! हाच श्रद्धेचा महिमा!!!

क्युरिटिन केल्यामुळे त्रास असह्य होत होता. तरीही नामस्मरण सतत चालू होतं. त्यांचा आपला संपूर्ण भरवसा फक्त बाबांवर होता. मुखावाटे सारखे 'साईराम-साईराम' असे भावपूर्ण शब्द पडत होते. थोड्याच वेळात खूप बरं वाटलं. रात्री घरी जाण्याची रजाही दिली. सरोजताई आपल्या पतीच्या स्कुटरवर बसल्या मात्र आणि त्यांनी अवघ्या पंधरा वीस फुटावर रीतसर एक पुसट पांढरी आकृती तयार होताना पाहिली. त्यांचाच त्यांच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता! दिव्य साक्षात्कार!

बाबांची असीम कृपा प्रत्यक्ष त्या आपल्या डोळ्यांनी पाहत होत्या! त्यांना प्रकर्षानं जाणवत होतं की हे बाबाच आहेत; पण त्या बोलू शकत नव्हत्या. पुसट आकृती आता ठळक झाली होती. वर्णनातीत दृष्य! साक्षात श्रीबाबाच तिथे प्रगट झाले होते. निर्गुण निराकार श्रीबाबा सगुण साकार होऊन उभे ठाकले होते. आज कलियुगातही साक्षात्कार घडू शकतो हे बाबांनी दाखवून दिलें होते. अति कष्ट नको. त्रास नको. कर्मकाण्ड नको. फक्त भाव हवा! 'भाव तेथे देव' ही संतवाणी सिद्ध झाली! सम्यक साधना साधण्यासाठी सरोजताईंचा सनातन सारथी सर्वेश्वर श्रीसाई साकारला!! श्रीबाबांनी

पहिलाच प्रश्न विचारला. "क्यों पुकार रही थी?" तरीही सरोजताईंनी सरळ उत्तर दिलं; "मैंने आपको नहीं बुलाया महाराज" त्यावर पुन्हा बाबा म्हणाले, "अभी दवाखाने में पुकार रही थी ना?" सरोजताई पटकन म्हणाल्या, "वो तो हम अपने शिरडी साईबाबा को बुला रहे थे, आपको नहीं बुलाया महाराज!"पुन्हा स्पष्टता करीत बाबा म्हणाले, "मैं शिरडीसे आया हुँ बेटी! फिकीर मत कर तुझे लडका जरूर होगा!" एवढं बोलून बाबांनी त्यांच्या पतीजवळ दोन रुपये मागितले. त्यांनी आपला पटकन पॅन्टच्या मागच्या खिशात हात घातला आणि एक रुपया तेवढाच सुट्टा होता, तो दिला. बाबांनी रुपया नको म्हणून म्हटलं, दोनच हवेत असं आग्रहानं सांगितलें. मनबुद्धीच्या पार असलेल्या बाबांच्या अगाध लीलेचं आकलन सामान्य मानव बुद्धीला कुठून होणार? त्यांना आपल्या पत्नीच्या प्रकृतीचीच काळजी लागून राहिली होती. म्हणून त्यांनी घाईत म्हटलं, "महाराज! इसकी तब्बेत ठीक नहीं, हमें घर जाना है, ये लेलो एक रुपिया" असं म्हणत रुपया झोळीत टाकला. आणि ते स्कुटर चालू करून निघाले, तोच बाबा थोडे मोठ्या आवाजात म्हणाले, "मेरा एक रुपिया बाकी है, मुझे शिरडी आकर दे जाना." एवढं बोलून श्रीबाबांची पांढरे वस्त्रधारी आकृती पूर्ववत पुसट होत चालली आणि शेवटी दिसेनाशी झाली.

श्री कस्तुरी ह्यांनी थोड्या वेळातच स्कुटर थांबवली. रात्रीच्या थंड वातारणात सुद्धा त्यांना खूप घाम आला होता. ते आपल्या पत्नीला म्हणाले, "कुणाला सांगूनही खरं वाटणार नाही, पण आज आपल्याला बाबांनी प्रत्यक्ष दर्शन दिलं, आपण त्यांचे पाय धरायला हवे होते, आपली फार मोठी चूक झाली." पश्चात्तापाने श्री कस्तुरी ह्यांच्या अंतरमनाला वाचा फुटली! अनुतप्त मन पुनीत होऊन बोलू लागलं...!

बाबा! आम्ही कायम म्हणत असतो की आम्ही तुझी भक्ती करतो आणि दाखवत असतो की आम्ही तुझी भक्ती करत आहोत; तरीही वास्तविकता मात्र निराळी आहे. बाबा! खरं पहाता आम्ही भक्ती करतच नसतो! तुझ्याकडे बघण्याचं आम्ही ढोंग करून बघत असतो कुठल्यातरी तुच्छ वस्तुकडे, केवळ भौतिक सुखाकडे, आणि त्यामुळे अज्ञानाच्या निबीड अंधकारात आम्ही भटकत असतो. ईश्वरा! दीनदयाळा! साईनाथा! जर आम्ही खऱ्या मनानं तुझ्यावर प्रेम केलं, तुझच होऊन रहाण्याचा जर आम्ही प्रयत्न केला, अनन्यभावे तुझ्या चरणी येऊन आम्ही आम्हाला तुझ्या हाती सोपवून जर दिलं; तर जगातली कुठलीही अशी शक्ति नाही जी आम्हाला तुझ्यापासून विन्मूख करू शकेल. मग तुझ्या अमोघ अशा कृपास्पर्शानं आमच्या जीवनातील अज्ञानानं निर्माण केलेली ही माया नष्ट होऊ शकेल. इंद्रीय दृष्टी नष्ट होऊ शकेल. मग स्वस्वरूप स्थितीत शुद्ध, मुक्त होऊन केवळ तुझ्याच हातातील एक साधन होऊन परम् लक्ष्याकडे वाटचाल सहज होऊ शकेल."

त्या पतीपत्नींची श्रद्धा साईठायी अधिक दृढ झाली. कारण सर्वव्यापी श्रीसाई भगवानचा लोकविलक्षण चमत्कार आज त्यांना प्रत्यक्ष नजरेनं पहाण्याचं सौभाग्य लाभलं होतं!!

जो जो मज भजे जैशा जैशा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ।।

# शिरडी वृत्त माहे — जून १९८६

जून महिन्यामध्ये बाहेरगावांहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पुष्कळ प्रमाणात होती. श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची तसेच पंढरपूर यात्रेला जाणारे साईभक्तांची खुपच गर्दी झाली होती.

काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः

**कीर्तन** — १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई —कीर्तनकार-प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.
२) ह.भ.प. विश्वनाथ महाराज सुराळेकर, ता. वैजापूर.

**प्रवचन** — १) ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी.

**भजन गायन** — १) जयवंतराव कुळकर्णी, मुंबई २) श्री. तपल, मुंबई ३) श्री. शरदराव गाळवणकर, मुंबई ४) श्री. विरकुमार शहा, मुंबई ५) श्री. सुबाश पोगम ६) श्री. सुनील देसाई, मुंबई ७) राम दिक्षीत, डोंबिवली ८) श्रीमती मालती सुमंत, बैरागपूर ९) सुजाता सुमंत १०) श्र. अनिलशेठ, दिल्ली ११) सौ. आसावरी वायकुळ, घाटकोपर १२) श्री. विलास वायकुळ १३) श्री. निनाद वायकुळ १४) रमेश नागपाल, गोरखपुर १५) श्री. राजेश नागजी, नासिक १६) श्री. रमेश दुबे, इंदोर १७) डॉ. बी. चंदर, दिल्ली १८) श्री. एम. एस. नारायण आचारी, भोपाळ १९) श्री. टी. नरसिंह, जग्गीयापेठ २०) श्री. रंगनाथ शंकर सस्तूर, संगमनेर २१) श्री. गुलाब महादेव घाटबिसावे, मुंबई २२) श्री. जयवंत सदाशिवराव डबली, छिंदवाडा २३) कु. भारती नायडू, धमतरी २४) श्री. संजय भोसले २६) श्री. देवेंद्र चंद्रकांत देवळणकर, पुणे २६) श्री. जितेंद्र गंगाधर जाधव, पुणे २७) श्री. राजेंद्र गंगाधर जाधव २८) श्री. एस. के. सक्सेना, दिल्ली २९) श्री. सी. आर. जाधव, सोलापूर.

**हवापाणी** — शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाला सुरुवात झालेली आहे. परंतु अगदी कमी प्रमाणात पाऊस पडला.

## साई छायाचित्रांचे छानदार प्रदर्शन

साईभक्त छायाचित्रकार श्री. शंकरराव खोपकर यांनी टिपलेल्या शिरडीतील श्री साईबाबांच्या विविध उत्सवांचे, स्थळांचे सुंदर प्रेक्षणीय असे प्रदर्शन समाधी मंदिर, वरील सभागृहात गुरुपौर्णिमा उत्सव प्रसंगी भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. एस. आर. शिंदे, विश्वस्त सदस्य, श्री. साईबाबा संस्थान शिर्डी यांनी केले. शेकडो साईभक्तांनी प्रदर्शनास भेट देऊन छायाचित्रकारांचे कौतुक केले.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलांमृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. | —"— | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. | —"— | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. | —"— | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. | —"— | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. | —"— | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. | —"— | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. | " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½" × ५½" | ०-६० | ३-५० |
| ११. | द्वारकामाई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. | —"— | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. | —"— | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. | समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. | —"— | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. | —"— | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. | कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. | ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. | —"— | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. | दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. | मूर्ती फोटो (बुस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

मुद्रक : श्री.एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक** :श्री.रा.द. बन्ने, साई निकेतन